ॐ

# अव्यक्तबोध.

हें पुस्तक

श्रीसद्गुरु गंगाधरनाथ महाराजांचे

बुद्धिप्रेरणेनुरूप

**रामराव कृष्ण जटार**

यांनीं लिहिलें, तें,

पुणें येथें 'जगद्धितेच्छु' छापखान्यांत छापवून

**गुरुचरणीं अर्पण करून**

प्रसिद्ध केलें.

**आवृत्ति पहिली**

शके १८१८, संवत् १९५३.

किंमत एक-रुपा-या.

ओ/१५४
32

# अव्यक्तबोध.

हें पुस्तक

श्रीसद्गुरु गंगाधरनाथ महाराजांचे

बुद्धिप्रेरणेनुरूप

**रामराव कृष्ण जटार**

यांनीं लिहिलें, तें,

**गुरुचरणीं अर्पण करून प्रसिद्ध केलें.**

**आवृत्ति पहिली.**

किंमत एक–रुपा–या.

हें पुस्तक पुणें येथें "जगद्धितेच्छु" छापखान्यांत छा०
शके १८१८, समत् १९५३.

सन १८६७ चे २५ वे अक्टाअन्वयें या पुस्तकाची
नोंदणी करवून पुस्तकस्वामित्वाचा सर्व हक्क पु-
स्तक कर्त्यानें आपलेकडे ठेविला आहे.

ਸ੍ਰੀ

~~[illegible]~~

~~[illegible]~~

~~[illegible]~~

~~[illegible]~~

~~[illegible]~~

~~[illegible]~~

~~[illegible]~~

~~[illegible]~~

श्री० सरकार महाराज माधवरावसाहेब शिंदे आलिजा बहाद्दर दाम इकबाल हू. जी. सी. एस. आय्.
यांचा अति नम्र सेवक.



रामराव कृष्ण जटार.
ममताजु दौला बहादर.
ग्वाल्हेर.




रामराव कृष्ण जटार ममताजु देलाबहादर ग्वाल्हेर.

श्री.

ॐ तत्सत्.

# अव्यक्तबोध.

## पुस्तकार्पणपत्रिका.

---

[illegible]

[illegible] यांचे सेवेशीं.

प्रेमादरपूर्वक आणि सविनय अशी प्रार्थना आहे कीं, सद्यःस्थिति व कालानुरूप थोरांपासून तों लहानांपर्यंत बहुतांशीं पुष्कळ जनसमूह आपापल्या योग्यतेप्रमाणें व्यावहारिक व प्रपंचाच्या काळजींत अगदीं निमग्न असलेला दिसत आहे, व त्यांतले त्यांत पूर्वसुकृतांशफलरूपानें जें कांहीं अल्प सुख मिळतें तेवढ्यानेंच आनंद मानीत आहे ! अशी जरी वस्तुस्थिति आहे, तथापि असेही सुज्ञ व विचारी लोक पुष्कळ आहेत कीं, ज्यांना खरें सुख कांहीं वेगळेंच आहे असें वाटत असून त्या सुखाच्या प्राप्तीची इच्छाही त्यांना आहे. कारण जगांतील सर्वच लोक आज केवळ अगदीं विचारशून्यच आहेत असेंही म्हणतां येत नाहीं. रोजच्या अनुभवावरून प्रत्येक व्यक्तीस, ह्मणजे संसारासक्त असलेल्या राजापासून तों रंकापर्यंत ही गोष्ट खास कबूल करावी लागेल कीं, व्यावहारिक काळजींत जितका पुष्कळ वेळ खर्च होतो तितका खऱ्या सुखाच्या लाभार्थ प्रयत्न करण्यांत होत नाहीं; ही ख-

रोखर मोठी खेद करण्यासाररखी गोष्ट आहे. अधिकार व द्रव्यबलावर मिळविलेल्या क्षणिक संसारसुखांत निमग्न झाल्यामुळें पारमार्थिक खऱ्या सुखाचा व आनंदाचा विसर पडावा ही गोष्ट साहजिक व नेहमींची आहे, आज ती नवी आहे असें म्हणतां येणार नाहीं !! आणि असें झालें ह्मणजे मनुष्य जन्मास येऊन तो आपल्या कर्तव्यास चुकला असेंच ह्मणणें भाग येतें. आतां त्यांतल्या त्यांत जे कोणी खरे जिज्ञासु असतात ते थोडाबहुत वेळ काढून क्षणोक्षणीं उद्भवणाऱ्या तरंगरूपी काळजीस एकीकडे सारून सुखाचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करूं लागतात. श्रुतिपथ अत्यंत अवघड व दुर्बोध असल्यानें संस्कृतज्ञ पुरुष फार परिश्रम सोसून—योगायोग असलाच—तर—मूळ ठिकाणीं पोंचून आनंदानुभव घेतात. कदाचित् प्रारब्ध प्रतिबंधानें त्या ठिकाणापर्यंत जाऊन नच पोंचले तर त्यांना या संपादन केलेल्या विद्येचा तरी आनंद मिळतो. पण ज्यांना श्रुत्यर्थ जाणण्यापुरती व्युत्पत्ति नाहीं, अथवा ज्यांना संस्कृताचा मुळीं गंधच नाहीं—पण जिज्ञासा आहे—अशा सज्जन लोकांना ज्ञानाचा मार्ग सुलभ रीतीनें सांपडावा ह्मणून—प्रत्यक्ष ईश्वरविभूती असे जे कोणी साधु पुरुष होऊन गेले—त्यांनीं अनेक प्राकृत ग्रंथ निर्माण करून ठेविले आहेत. ह्या त्यांच्या ग्रंथांचें अवलोकन करून मुमुक्षु लोक आपलीं अंतःकरणें शांत करून घेतात !

सांप्रत सुधारणेच्या कालांत शिक्षणपद्धतीच्या दिशेंत अजिबात बदल झाल्यामुळें नवीन होतकरू विद्वान् लोकांना प्राचीन पद्धतीच्या वर्णनशैलीची मुळींच अभिरुचि राहिली नाहीं असें म्हटल्यास फारसा प्रत्यवाय येईलसें मला वाटत नाहीं. पण युक्तीनें व अनुभवानें जर एखादी गोष्ट याच लो-

कांच्या अंतःकरणांत बिंबवून दिली तर ती गोष्ट ते कबूल करतात व असाच प्रकार बहुतकरून सर्वत्र चालू असल्याचें आढळूनही येत आहे. म्हणून प्राचीन पद्धतीस अविरुद्धता, व नवीन पद्धतिस अनुकूलता राहूनच एखादा ग्रंथ निर्माण व्हावा अशी बरेच दिवसांपासून माझ्या मनांत लालसा होती. पण कोरडी लालसा असून उपयोग कोणता? कारण माझ्याजवळ विद्येचा मुळींच अभाव असल्यानें हा मनोरथ पूर्ण होण्याची आशाच करावयास नको! आणि आतां विद्या संपादन करून इच्छा पूर्ण करून घेण्यास दुसरा जन्म घेण्याचीच वेळ येणार आहे; याशिवाय दुसरा इलाजच नाहीं! असें पुरतेपणीं समजल्यावर श्रीसद्गुरूचें अनन्यभावें चिंतन करून केवळ त्याच्याच प्रेरणेनें व त्याच्याच कृपे बलावर जशी कांहीं तुटकी मोडकी प्राकृत भाषा येत आहे तिच्यांतच सरळ निबंधरूपानें ग्रंथ लिहिण्यास आरंभ करून, सर्व ग्रंथांचें सारभूत असें एक "अव्यक्त बोध" या नांवाचें लहानसें पुस्तक तयार झालें आहे, तें आपणां सुज्ञ, विद्वान, आणि रसिकजनांच्या सेवेशीं सादर करीत आहें. यांत परमात्मा चराचरसृष्टींत कसा ओतप्रोत भरला आहे, सर्व सृष्टि ॐकाररूप परमात्म्यापासून कशी निर्माण झाली, आणि ॐकाराचें रूपही हेंच आहे इ० गोष्टी प्रत्यक्ष प्रमाणानें अगदीं डोळ्यांपुढें मांडून दाखविल्या आहेत. पुनर्जन्म होत नाहीं अशी जी पुष्कळ लोकांची दृढ समजूत झाली आहे ती अगदीं चुकीची असून या पुस्तकांत जन्मांतर सिद्ध करून दाखविलें आहे. इ० विषय सप्रमाण व रमणीय वाटण्याजोगे लिहिले आहेत. याविषयीं मला या ठिकाणीं जास्त वर्णन करण्याची अवश्यकता वाटत नाहीं, हें पुस्तक वाचलें

ह्मणजे आपली खात्री होईल. ह्या पुस्तकांत वेदांतशास्त्राचें संक्षिप्त सार लिहून याच विषयावर विस्तारपूर्वक एक मोठा ग्रंथ लिहिण्यास आरंभ केला आहे. पैकीं ब्रह्म व माया हीं दोन प्रकरणें लिहून तयार आहेत. पुढील पांच प्रकरणें तयार होण्यास निदान एक वर्ष तरी आणखी लागेल. हा ग्रंथ तयार झाल्यानंतर आपल्या सेवेशीं प्रविष्ट करीनच.

या पुस्तकांत आरंभींच एक " अनंत वृक्षाचें " चित्र घातलें आहे; त्यांत अखिल ब्रह्मांडांची अव्यक्तरचना, प्रवृत्ति निवृत्तीचे पृथक् मार्ग व त्या त्या मार्गांत असलेल्या जीवांच्या अवस्था इ० गोष्टी दाखविल्या आहेत. हेंच चित्र स्वतंत्र वेगळें काढवून, अवस्थेचीं मूर्तिमंत चित्रें त्या त्या स्थानीं घालून एक अवर्णनीय व अद्भुत दर्शन, असें प्रत्यक्ष ब्रंह्मांडदर्शनाचें चित्र पेंटरकडून काढविलें आहे, तें उत्तम व प्रसिद्ध चित्रवाल्याच्या छापखान्यांत छापवून प्रसिद्ध करावें असा हेतु आहे. याशिवाय आणखी भवसमुद्र, जगत्प्रपंचरचना इ० अगदीं नव्या चित्रांच्या कल्पना मनांत घोळून राहिल्या आहेत. हीं चित्रें सतत् नुसतीं दृष्टीसमोर जरी राहिलीं तरी अज्ञ जनांस देखील संसाराचें खरें स्वरूप कळून, त्याच्या मनांत खऱ्या कर्तव्याची जागृति झाल्यावांचून राहणार नाहीं. मग जे सुज्ञ असतील ते तर आनंदांत निमग्न झाल्यावांचून कधींच राहूं शकणार नाहींत.

हल्लीं या माझ्या लहानशा पुस्तकापासून आपल्यास कांहींना कांहीं तरी विशेष माहिती व थोडा बहुत आनंद झाल्यावांचून कधींच राहणार नाहीं अशी माझी तर पूर्ण खात्री आहे, पण आपण मात्र कृपा करून लक्ष पूर्वक व नीट समजेपर्यंत तकलीफ घेऊन तें वाचलें पाहिजे, किंवा ऐकलें

तरी पाहिजे. मोठ्या ग्रंथाची तयारी चालल्याप्रमाणें सद्गुरूनें जर तो माझ्या हातून पूर्ण लिहविला तर सद्गुरूच्याच कृपाबलावर मी आज अशी प्रतिज्ञा करूं शकतों कीं, विचारशील, विद्वान् व बुद्धिमान् लोकांना तो ग्रंथ आपल्या आनंदसमुद्रांत बुडविल्यावांचून कधींच सोडणार नाहीं.

या " अव्यक्तबोध " पुस्तकाचीं भाषांतरें मी हिंदी व बंगाली भाषेंत करविणार आहें; संस्कृत विद्वानांच्या पसंतीस हें पुस्तक उतरून, त्यांचीं अनुमोदनें आलीं तर संस्कृतांतही याचें भांषांतर करवीन. पुढें मोठा ग्रंथ पार पडून तो जर लोकप्रिय झालाच तर त्याचेंही भाषांतर चारी भाषेंत करविण्याचा माझा विचार अहे. परंतु हे सारे भविष्यकालाचे मनोरथ आहेत ! सद्गुरुकृपेनें जें जें कांहीं पार पडेल तेंच खरें ! असो.

प्रिय सुज्ञ जनहो, मीं जो ग्रंथ लिहिण्याच्या उद्योगास आरंभ करून पुस्तक बाहेर काढलें आहे, हा म्हणजे मीं एखादा पोट भरण्याचा अथवा लोकांना थापा देऊन पैसे उकळण्याचा धंदा उपस्थित केला आहे असें मात्र कोणी समजूं नये. 'श्री० सरकार महाराज माधवराव साहेब शिंदे आलीजाबहादर दामयक बालहू ' यांच्या कृपाकल्पवृक्षाखालीं मी आनंदांत बसलों असल्यामुळें, माझ्या स्वतःकरतां मला कशाचीच जरूर नाहीं; पण जगत्कल्याणाचें एखादें महत्कृत्य शिरावर उचलणें हें एकट्याचें सामर्थ्य नसून सर्वांच्या यथाशक्तीचें साहाय्य घ्यावें लागतें. त्यावांचून तें पार पडत नाहीं. पण यावरून मी आपल्यापाशीं याचना करावयास आलों आहे असें मात्र आपण समजूं नये. सर्वत्रांस माझी अशी विनंति आहे कीं,

हें पुस्तक म्हणजे खऱ्य सुखाची ठेव दाखविण्याचें एक बीज-कच असून तें आपल्या सेवेशीं प्रविष्ट करीत आहें; यास आपण मनःपूर्वक वाचा वाचून त्याचा शांतपणें नीट विचार करा आणि आत्मस्वरूपाचा पूर्ण आनंद घ्या. हें पुस्तक पसंत होऊन जर आपल्यास प्रिय वाटलें तर आपल्या पदरीं असलेले आश्रित लोक व आपले आप्त बंधू इष्टमित्र जे कोणी असतील त्यांच्यापैकीं प्रत्येकानें संग्रह करण्याजोगें हें पुस्तक आहे असें आपल्यास वाटल्यास त्यांच्याकरितां दोन, चार, दहा, पांच जितक्या पुस्तकांच्या प्रतींची जरूर वाटेल तितक्या मागवून त्यांना वाटा, म्हणजे त्यापासून त्यांचें जें कल्याण होईल त्याच्या यशाचे आपण अधिकारी होऊन, या माझ्या महत्कृत्याचे साह्यकर्ते व्हाल. या कृत्यासंबंधानें शारीरिक व मानसिक प्रयत्न करवतात तेवढे करून मी शक्त्यनुरूप खर्चही करीत आहें. यांत आपली सर्वांची मदत झाली तर या कार्याचें स्वरूप जगापुढें कांहीं तरी दिसूं लागेल यांत संशय नाहीं. पण या माझ्या लिहिण्यापासून कोणी विनाकारण भिडेंत मात्र पडूं नये. मीं नुसतें सुचविलें आहे; संकोचानें सहाय्य करण्याची जरूर नाहीं.

आतां विद्वज्जनांस नम्रतापूर्वक माझी एक अशी प्रार्थना आहे कीं, हें पुस्तक कोणत्याही ग्रंथाचें भाषांतर नसून दुसऱ्या एकाद्या ग्रंथाचें साह्यय घेऊनही लिहिलेलें नाहीं. केवळ सद्गुरूच्या प्रेरणेनें जसें कांहीं विचार बुद्धींत प्रकट झाले त्याप्रमाणें लिहून काढून कोणाकडूनही याचें परीक्षण न करवितां एकदम जगापुढें मांडण्याचें जें मीं एवढें धाडस केलें आहे, या मूर्खपणाची मात्र मला क्षमा करून यांतील गुणदोषांचें नीट परीक्षण करावें. एकाद्या ठिकाणीं शास्त्रविरुद्धता

अथवा चूक आढळून येईल तर ती काढून ठेवावी. मराठी भाषा मला चांगली अवगत नसल्यानें ग्रंथांत जेथें जेथें गांभीर्यपणा आणून भाषेची दुरुस्ती करावयाची असेल तीं तीं ठिकाणें टिपून ठेवावींत. सारांश अशा प्रकारच्या सर्व न्यूनतेबद्दल पृथक् सूचनापत्र मजकडे पाठविण्याची तसदी घेतल्यास मी आपला सर्वांचा फार आभारी होऊन, पुढील आवृत्तींत योग्य व्यवस्था करीन; आणि पुस्तक पसंत पडल्यास, वर्तमानपत्रांतून आपापल्या इच्छेनुरूप जगास या विषयाची माहिती व ओळख करून द्यावी. असो.

आतां हा लांबलेला लेख अटोपता घेऊन शेवटची अशी एक सूचना करितों कीं, हें पुस्तक आपल्यास अर्पण केलें आहे, तें पावल्याबद्दल उत्तरीं कार्डांतर कळविण्याची अवश्य कृपा करावी व स्वस्थपणांत हें पुस्तक वाचून "अभिप्रायपत्र" पाठविण्याची तसदी घ्यावी. पुस्तक निदान एकवार तरी वाचल्यावांचून त्याला कपाट अथवा केराची टोपली दाखवूं नये. ज्यांच्याकडे ही अर्पण-पत्रिकाच नुसती आली असेल त्यांनीं हिला अर्पण-पत्रिका न समजतां हें विनंतिपत्र आहे असें समजावें, व त्यांना जर पुस्तक घेण्याची इच्छा होईल तर या पुस्तकाच्या शेवटीं लिहिलेल्या सूचनेप्रमाणें पाहिजे त्या पत्त्यावर पत्र पाठवून पुस्तकें मागवून घ्यावींत. कळावें, लोभ असावा हे विनंति.

| | |
|---|---|
| तारीख माहे सन | आपला<br>**रामराव कृष्ण जटार,**<br>मुमताज़ु द्दौला बहादर.<br>छत्रीबाजार—लष्कर,<br>ग्वाल्हेर. |

# सूचना.

हीं पुस्तकें खालीं लिहिलेल्या पत्त्यांवर पत्रें पाठविलीं असतां व्ह्याल्युपेएबलनें पाठविण्यांत येतील.

रा० रा० बळवंतराव कमळाकर,
नाझर अदालत.
प्रांत माळवा, उज्जन.

रा० रा० गणपतराव अमृत कविटकर.
छत्रीबाजार–लष्कर,
ग्वाल्हेर.

रा० रा० विष्णु गोपाळ भोपटकर.
मंगळागौरी घाट, जटारांचें मंदिर,
बनारस–सिटी.

पुणें, " जगद्धितेच्छु " छापखान्यांत छापिलें.

ॐ

# अव्यक्तबोधानुक्रमणिका.*


| विषयानुक्रम. | पृष्ठ–संख्या |
|---|---|
| प्रस्तावना... .... .... .... | ....१—२६ |
| उपोद्घात.... .... .... .... | ....१—३ |

**प्रकरण पहिलें–पुरुष–( परमात्मा )**

| | |
|---|---|
| परमात्म्याचे सच्चिदानंद गुण–त्यांची भिन्ना-भिन्नता, व्यापकता आणि व्यक्त होण्या-च्या साधनांची न्यूनाधिकता .... .... | १–१० |
| परमात्म्याची व्यापकता–तिचे दोन प्रकार–व तिचा ओतप्रोत भाव.... .... .... | ११–१४ |
| परमात्म्याच्या अस्तित्वाविषयीं प्रबल शंका.. | –१५ |
| वरील शंकेचें समाधान–जीवनराव माधवरा-वांचा संवाद.... .... .... .... | १६–१८ |
| अव्यक्त परमात्म्यास व्यक्त होण्याचें कारण काय ? .... .... .... .... | –१९ |


---

* या पुस्तकांतील विषय निबंधरूपानें लिहिला गेला असल्यामुळें, विषयानुक्रम वेगवेगळा दाखवितां आला नाहीं. याची दुरुस्ती पुढील आवृत्तींत केली जाईल. सूज्ञ वाचकानीं पृष्ठांक पाहून विषयांतील मुद्दे शोधून घेण्याची तसदी घ्यावी अशी माझा त्यांना सविनय प्रार्थना आहे.

**रामराव कृष्ण जटार.**

विषयानुक्रम. पृष्ठ–संख्या
वरील शंकेचें उत्तर–परमात्म्याची इच्छा–तीच मूळप्रकृति. .... .... .... ....२०–२१

## प्रकरण–दुसरें–प्रकृति ( माया )

मायेची व्यक्ताव्यक्तता. नटाचा दृष्टांत–कारणामुळें प्रकृतीच्या स्वभावांत विरुद्ध गुण.२१–२३
मायेचें भिन्नाभिन्नस्वरूप .... .... .... –२३
मायेचे सत्व-रज-तम तीन गुण–सृष्टीचे तीन वर्ग व त्यांत परमात्म्याच्या सच्चिदानंद गुणांची व्यक्तता... .... .... .... –२४
मायेचें अव्यक्त रूप.... .... .... .... –२५
कार्यकारणभावसंबंध .... .... .... ....२५–२६
मायेचा व सृष्टिचा परमात्म्याशीं कार्यकारणभावसंबंधव या सर्वांचें परस्पर ऐक्य....२७–२८

## प्रकरण तिसरें–( नाम )

स्वरवर्णाची उत्पत्ति–ध्वनीचा भेद.... ....२९–३१
परमात्म्याचें निर्गुणनाम ॐ या नामाच्या, शब्द, अक्षर, आणि निर्गुण स्वरूपाचा विचार .... .... .... .... ....३२–३४
बिंदुपासून रेषा–अक्षर–शब्द. इत्यादिकांची उत्पत्ति व या सर्वांचें ऐक्य. .... ....३४–३६
ॐपासून संख्या, व वर्णमालेची उत्पत्ति. ..*३७–३९

* ३७ व ३९ पृष्ठांवर ( रूप ) हें हेडिंग चुकीनें घातलें गेलें आहे, त्याठिकाणीं ( नाम ) असें वाचावें.

विषयानुक्रम. पृष्ठ–संख्या
प्रकृति–पुरुषवाच्य, व ॐ वाचक यांचा अभेद..... .... .... .... ....— ४०
बिंदु व रेषेचें स्वरूप. .... .... ....४१–४२
बिंदुरूप ॐकार व प्रकृति–पुरुष–यांच्या गुणांचें ऐक्य.... .... .... ....४३–४४

---

## प्रकरण चवथें–( रूप )

रूपाचे व्यक्ताव्यक्त असे दोन प्रकार. ....— ४५
परमात्मबिंदुपासून अखिल जडचैतन्यात्मक सृष्टिची उत्पत्ति... .... .... ...४६–५१
बिंदुरूप ॐकारापासून सृष्ट पदार्थांस साकारता. .... .... .... ... ....५१–५४

---

## प्रकरण पांचवें–( कारण )

चित्रकार व नट यांची कल्पना. .... ....५४–५६
नटी आणि जीवनराव यांचा संवाद. ....५७–५९
जीवनराव आणि माधवराव यांचा संवाद....६०–६७
वासनेच्या क्षयानें जीवाची कृतार्थता. ....— ६८
जीवाच्या जन्ममरणाविषयीं प्रबल शंका....— ६९
वरील शंकेचें समाधान व वासनेचें स्वरूप....७०–७६
सृष्टीचें काल्पनिक स्वरूप–व सत्याच्या अभावाची प्रबल शंका.... .... ....७७–७८
वरील शंकेचें समाधान–बीज वृक्षाचा दृष्टांत व परमात्मभूमी शोधन.... .... ....७८ ८१

---

विषयानुक्रम. पृष्ठ–संख्या

**प्रकरण सहावें–( श्रुति )**

श्रुतींचें तटस्थ लक्षण–न्यायाधीशाचा दृष्टांत–
आणि श्रुतीची ईश्वररूपता .... ....८१–८९

---

**प्रकरण सातवें–( उपसंहार )**

जगाच्या मिथ्यत्वाविषयीं लोकांच्या कल्पना–
जिज्ञासूची आतुरता–सद्गुरुकृपेनें परमा-
त्मप्राप्ति. .... .... .... ....९०–९५

# प्रस्तावना.

मी गेल्या दोन वर्षांपूर्वी श्रीक्षेत्र उज्जन येथें सरकार-आज्ञेवरून कांहीं सरकारीच कामानिमित्त गेलों होतों. तेथें पांच वर्षे माझें राहणें होऊन पुढें माझ्याकडे सोंपविलेलें काम संपल्यामुळें मी ग्वाल्हेरीस परत आलों. श्रीक्षेत्र मजकुरीं असतांना मला सरकारी कामकाजांचा बराच अनुभव होऊन माझें वरिष्ठ अधिकारी मेहेरबान करनल–सर–मायकेल फीलोज–साहेब त्या वेळचे माळवा प्रांताचे सरसुभे–यांचीही मजवर पूर्ण कृपा असे व अजूनही ती तशीच कायम आहे. उज्जनींत राहिल्यापासून अत्यंत महत्त्वाचा जो मला लाभ झाला तो हाच कीं, तेथें नोकरीच्या संबंधानें राहणाऱ्या कित्येक विद्वान्, सज्जन आणि विचारशील अशा सद्‌गृहस्थांच्या गांठी पडून त्यांची कृपा व मैत्री संपादन झाली. यामुळें या क्षेत्रास " उज्जनी " हें नांव फार समर्पक दिलें गेलें आहे, असें माझ्या अनुभवास आलें. तेथें कालक्रमण करण्याचा असा नियम बांधून ठेवला होता कीं, आह्मी सर्व मित्रमंडळी अगदीं नियमित वेळीं एके विश्रांतस्थळीं नित्य जमून सवडीप्रमाणें आणि इच्छेनुरूप अनेक विषयांवर भाषणें करीत असूं. पण मला दुसऱ्या विषयांत गम्य कमी असल्यामुळें मी आपल्या आवडत्या विष-

यावरच संभाषण करीत असें, व तें माझी मित्रमंडळीही मोठ्या आदरबुद्धीनें ऐकत असत. अशा आनंदानें कालक्रमण करीत असतां—अमृतांत विषबिंदु पडावा—याप्रमाणें एकाएकीं या आमच्या मित्रवर्गांपैकींच एक आमचे अत्यंत प्रिय मित्र कै० विनायकरावजी साहेब भावे जहागीरदार यांच्यावर अकालिक मृत्यूनें आपली धाड आणली. यामुळें त्यांचें स्वतःचें तर घर सर्वस्वीं बुडालेंच, पण आमच्या मित्रवर्गांचीं अंतःकरणें देखील फार दिवसपर्यंत अगदीं खिन्न राहिलीं व अजूनही त्यांचें स्मरण झालें ह्मणजे अंगावर रोमांच आल्याशिवाय राहत नाहींत. अशा प्रकारच्या वियोगस्थितींत आह्मीं सर्वत्र मंडळी असतांना एके दिवशीं मी "मृत्यु" हा काय आहे, तो येतो कसा, यांत नष्ट काय होतें, आणि यांत दुःख आहे किंवा भीति आहे; हा विषय हातीं घेऊन बराच वेळ भाषण केलें. हें भाषण ऐकून सर्वांचीं अंतःकरणें शांत व प्रसन्न झालीं. पुढें क्रमाक्रमानें विरहदुःखही थोडथोडें कमी होत चाललें; परंतु त्या प्रिय मित्राचा विसर अजून पडत नाहीं अथवा पुढेंही विसर पडण्याचा संभव नाहीं. असो.—

त्या दिवसापासून, माझ्या मित्रवर्गांपैकीं प्रिय मित्र रा० रा० बळवंतराव कमळाकर माकोडे ( नाझर अदालत प्रांत माळवा ) व रा. रा. रामचंद्र बळवंत डोंगरे आणि प्रथम घरचे माझे प्रिय ज्येष्ठ बंधू तीं० रा. रा. रघुनाथराव रामचंद्र पोतनीस ( डि० माजिस्त्रेट व सुभे० जिल्हा आगर ) या त्रिवर्गांनीं माझा आवडता विषय जो मी आपल्या भाषणांत आणीत होतों, तोच

चिरकाल स्थाइक रहावा या हेतूनें—लिहून काढावा ह्मणून अत्यंत कळकळीनें, प्रेमानें आणि आग्रहपूर्वक बरेच वेळां सांगितलें. त्यांतून बळवंतरावजींनीं तर निबंध कसा लिहावा व त्यांत कोणकोणत्या गोष्टींची विशेष आवश्यकता लागते, इ० गोष्टींची माहिती करून देऊन त्यांचें वळण दाखविलें. तसेंच सद्य:स्थितींत आपल्या या भरतभूमींत या विषयाला तर अत्यंत ग्लानि आली आहे, व मोठमोठ्या आधुनिक विद्वान लोकांनीं या विचाराची अजीबात दिशाच सोडली आहे, म्हणून या निबंधास अगदीं निराळें स्वरूप देऊन श्रुति, स्मृति आणि शास्त्र इत्यादि—कांहीं विरुद्धता न यावी या हेतूनें प्राचीन विचारसरणी न सोडतां, प्रतिपाद्य प्रकरणांत थोडासा फेरबदल मात्र करावा, पूर्व रीतींत प्रथम **त्वं** पदाचा ह्म० जीवाचा विचार करून, नंतर **तत्पद्** ह्म० ब्रह्माचा विचार केला आहे, आणि **असि**पदानें दोघांचें ऐक्य दाखविलें आहे. परंतु प्रथम **तत्** पदाचा विचार करून नंतर **त्वं**-**पद** ह्म० जीवाचा विचार करावा आणि **असि**पदानें दोघांचें ऐक्य दाखवावें, इतकाच काय तो फेरबदल करावा, असा बळवंतरावजींचा आणि माझा संकेत ठरला. याप्रमाणें ब्रह्म, माया, जगत् आणि जीव यांचें स्वतंत्र रीतीनें प्रतिपादन करून, शेवटीं जीवाच्या कर्तव्यांत **असि**पदाचा मेळ घालून, चवघांचें ऐक्य दाखवावें; अशा पांच प्रकरणांचा निबंध लिहिण्याचें ठरून पोटविषयांची अनुक्रमणिकाही त्यांच्या व माझ्या विचारानें ठरली. पण मी पडलों आळशांचा शि-

रोमणी ! यामुळें माझ्या मित्राच्या एवढ्या मोठ्या खटपटीस मीं अगदीं व्यर्थता आणून नुसता चैनींत काल घालविला ! ! असें जरी होतें, तथापि हे माझे त्रिवर्ग मित्र आपल्या कर्तव्यास न विसरतां उत्तेजनार्थ मला नेहमीं टोंचीत व लाजवीत असत. पण उपयोग काय ? " पालथ्या घागरीवर पाणी " या म्हणीप्रमाणें झालें; कारण त्यांच्या म्हणण्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं ! पुढें मी इकडे आल्यानें त्यांच्या व माझ्या वियोगाबद्दल परस्परांना खेद तर झाला खराच, परंतु ते येथें येऊन कारणपरत्वें भेटी होण्याचा योग येत असल्यामुळें फारसा विभक्तपणा वाटत नाहीं.

येथें ( लष्कर मुक्कामीं ) श्री सद्गुरु ढोलीबावा महाराज यांचे मंदिरांतही या विषयाची नेहमीं चर्चा चालत असते, यामुळें माझा आवडता विषय मला बोलावयास व ऐकावयास पुष्कळ सांपडतो. श्रीसद्गुरु गंगाधरनाथ महाराज यांच्या समाधियोगानंतर माझे परमपूज्य आणि बाळमित्र गुरुबंधु श्री बाळकृष्णनाथ महाराज सिद्धपदारूढ झाले असतांही श्रीसद्गुरूप्रमाणेंच बंधुमहाराजांचीही मजवर पूर्ण कृपा असून बाळपणच्या प्रेमांत अंतर न पडल्यामुळें श्रीगुरूच्या वियोगाचें दुःख विशेष वाटत नाहीं. या विषयाचे ते फार मार्मिक व अनुभवी ज्ञाते असल्यानें माझ्या आवडत्या विषयास फार उत्तेजन मिळूं लागलें आहे, हें माझें महद्भाग्य आहे असें मी समजतों. असो. याप्रमाणें महाराजांच्या सत्समागमानें या विषयाची सदैव चर्चा चालू असतां एके दिवशीं ह्मणजे मिती माघ शुद्ध ३

शुक्रवार संमत् १९५२ रोजीं सायंकाळीं श्रीनाथ महाराजांची स्वारी माझ्या घरीं येऊन श्रीविचारसागर ग्रंथांतील कांहीं विषयावर प्रतिपादन चालू झालें. हें ऐकण्याकरितां त्यावेळीं माझे पूज्य गुरुबंधु श्रीकेशवनाथजी महाराज, श्रीकेशव तुकारामजी, आणि श्री गुरुभगिनी गंगाबाई मुजूमदार, असे त्रिवर्ग आणि माझे चुलत बंधु सीताराम दिनकर जटार व मित्र गणपतराव अमृत कविठकर असे पांच व मी सहावा असे मिळून श्रीनाथाची अमृतरसाळ वाणी श्रवणद्वारा अंतःकरणांत मुरतां मुरतां प्रदोषकाल होऊन असा कांहीं लोकोत्तर—अपूर्वानुभूत आनंद उसळला कीं, तो वाणीनें वर्णन होऊंच शकत नाहीं. एकदम सर्वत्रांचीं गात्रें शिथिल होऊन गेलीं, सरोमांच आनंदाश्रुप्रवाह सुरू झाले; देहाचें भान नाहींसें होऊन कंप सुटूं लागला, आमची आधारभूमी नाहींशी होऊन जणू काय आह्मी सारेजण अंतरिक्षांतच उभे आहोंत, अशा अनेक अवर्णनीय प्रकारांनीं सर्वांचीं अंतःकरणें त्यावेळीं कशीं एकदम व्याप्त झालीं हें सांगतां येत नाहीं; आनंदाचा अनुभव मात्र सर्वांचा सारखा होता. परंतु तो वाणीनें व्यक्त होऊंच शकत नाहीं. तो ह्या सर्वांस स्वसंवेद्य आहे. याप्रमाणें बरोबर तीन तासपावेतों सर्व मंडळी आनंदडोहांत अगदीं बुडून गेली. अनिच्छित बलात्कारानें श्रीगुरुनाथांनीं प्रत्येकास ओढओढून शुद्धीवर आणलें, व काय सांगावयाचें तेवढें उमजून सांगून बलात्कारानें माणसें बरोबर देऊन पुन्हां आपापले घरीं सांभाळून पोंहचविलें. त्या रात्रीची स्थिति अशी होती

कीं, जणू काय आह्मी सर्वत्र सूर्यबिंबांतच बसलों आ-होंत; आमच्या व्यवहारक्रिया अगदीं बंद पडल्या. या स्थितीचें अधिक वर्णन कदाचित् लोकोपहासास्पद होईल कीं काय अशी मला मोठी भीति आहे. तथापि मार्मिक ज्ञात्यांस एवढेंच जास्त आहे. असो.

दुसरे दिवशीं आमची सर्व मंडळी श्रीचरणाजवळ पुन्हां एकत्र होतांच सर्वांचीं अंतःकरणें प्रेमानें आणि आनंदानें उचंबळलेलीं प्रत्येकांचीं प्रत्येकांनीं पाहिलीं. नंतर श्रीगुरुबंधुपदाब्जीं मस्तकें अर्पण केल्यावर स-र्वांस मोठी धन्यता आणि कृतार्थता वाटली. पण माझें दुर्भाग्य पहा कसें ओढवलें तें ! ! मला त्या रात्रीं विलक्षण कल्पना येऊन, भलभलतेच विचार उत्पन्न होऊं लागले; त्यामुळें झालेला आनंद सर्व नष्ट होऊन पूर्वस्थितीवर पुन्हां येऊन थडकलों. या गोष्टीचा मला व माझ्या बंधुवर्गाला फारच खेद वाटला; पण प्रारब्धप्रतिबंधा-पुढें कोणाचेंच कांहीं चालत नाहीं हा अनुभव मात्र त्या वेळीं मला आला. त्यावर श्रीमहाराजांनीं पुष्कळ बोध केला, परंतु पूर्वस्थितीचा आनंद कांहीं केल्या येईना. तेव्हां आज्ञा झाली कीं, तुला मागें ओढून ठेवण्यांत सद्गुरूचा कांहीं तरी हेतु असावा ! ह्मणून गणितांत हिशेब चुकला ह्मणजे जसा पुन्हां पहिल्यापासून आरं-भ करून चूक धुंडून काढली ह्मणजे सांपडते, तसा तुझा आवडता विषय जो तूं तोंडानें बोलतोस तोच ले-खानें लिहून काढ ह्मणजे विचारांशांत कोठें चूक रा-हते ती सांपडेल, आणि तुझ्या लेखाचाही उपयोग दु-सऱ्यांस होईल. यावर मीं विनंति केली कीं, हें काम

माझ्या आटोक्याच्या बाहेरचें आहे, एवढें सामर्थ्य मला कोठून असणार ? हा विषय अत्यंत गहन महा दुर्बोध आणि महत्त्वाचा असल्यानें माझ्यासारख्या अज्ञानानें, शास्त्रव्युत्पत्तिशून्यानें, आणि विषयांधानें या विषयाकडे नुसतें तोंड फिरवणें देखील मोठें धाडसाचें आहे, मग असला विषय लिहिण्यास लेखणी उचलणें ह्मणजे आपल्या मूर्खत्वाची कमाल करून जगास दाखविण्यासारखें नव्हें काय ? मोठमोठ्या विद्वानांच्या समोर असा पोरकट भाषालेख जाणें किती हास्यास्पद होणार आहे बरें ? ज्यांस जसें वाटेल तशी ते माझी थट्टा उडवितील. माझ्या स्वयंसिद्ध स्थितीची विटंबना आहे तेवढीच पुरे आहे, त्यावर आणखी वेश्येच्या मुखानें पातिव्रत्यवर्णनाचा तुरा कशाला पाहिजे ? याप्रमाणें पुष्कळ विनंति केली, पण ती मान्य झाली नाहीं. श्रीगुरु गंगाधरनाथाची मर्जीच जर तुझ्या हातून आपलें निजरूप प्रकट करण्याची असेल तर उगाच माघार कां घेतोस ? सद्गुरूचें अगाध सामर्थ्य आहे. ज्यानें रेड्याच्या मुखानें वेद वदविले त्याला तुझ्या मानवी वाणीनें पाहिजे तें बोलवितां येणार नाहीं काय ? बुद्धिप्रकाशक तर तोच आहे; त्याच्या बलावर आपण पाहिजे तें करूं शकूं !! गुरुकृपेनें कोणतेंच कार्य दुर्घट नाहीं ! असें अनेक प्रकारें अमृतवाणीनें प्रोत्साहन देऊन हें महा दुर्घट कार्य करण्यास मोठ्या जबरदस्तीनें पुढें ढकललें. आणि सर्व बंधुवर्गांनींही अशीच उचल केली ! त्यामुळें मी तर अगदीं प्रचंड विचाररूपी गोंधळाच्या खड्ड्यांत पडलें

काय करावें हें कांहींच सुचेना! आणि असें वाटूं लागलें कीं, माझ्यासारख्या अल्पज्ञानें असल्या प्रचंड खटल्यांत पडणें ह्मणजे गांडुळानें भूगोल मस्तकावर घेण्याचा प्रयत्न करणें होय! अथवा पलंगडीवर निजलेल्या तान्ह्या मुलानें आकाशस्थ चंद्रबिंब धरण्याचा प्रयत्न करण्यासारखें होय! अशा अनेक संशयतरंगांचे हेलकावे थोडेच दिवस खात असतां एके दिवशीं अकस्मात् पुस्तकें चाळतां चाळतां उज्जनींत तयार केलेली अनुक्रमणिका मला आढळली. ती पाहतांच मला इतका आनंद झाला कीं, जणु काय माझे त्रिवर्ग उज्जनमित्र मला संशयतरंगांतून बाहेर निघण्याकरितां हस्तावलंबच देत आहेत कीं काय कोण जाणे! मग काय उशीर! दुधांत साखर पडतांच प्यायला आरंभ! अशा प्रसंगाला मात्र मित्रांचा वियोग फारच दुःखद वाटला! पण उपयोग काय? इतकें सुद्धां वाटलें कीं, आज माझ्या मित्रवर्गांपैकीं एकटे बळवंतरावजी जरी माझ्या जवळ असते तरी मला या कामांत त्यांची फारच मदत झाली असती! व लेखाचें स्वरूपही बरेंच चटकदार झालें असतें! पण ह्या नुसत्या कल्पनाच! कारण " न सदैकत्र संवासः कर्ममार्गानुवर्तिनां " हा नियम आठवल्याबरोबर खिन्न होऊन स्वस्थ बसावें लागलें. त्यांतून व्याकरणाच्या नियमाप्रमाणें मराठी भाषा मला मुळींच लिहितां येत नाहीं. म्हणून आतां व्याकरण पाठ करून एकादा लेख लिहिणें ह्मणजे तृषा लागल्यावर कूप खणण्यासारखें वेडगळपणाचें वाटूं लागलें.

या अशा चिंतेंत मी अगदीं निमग्न आहें तोंच मा-

ज्या प्रिय मित्रवर्गांतर्गत रा. रा. रामचंद्र गोविंद वेरुळकर वकील हे कांहीं स्वहेतुसंपादनार्थ उज्जनीहून जे येथें आले ते थेट माझ्याच घरीं येऊन दाखल झाले. त्यांच्या भेटीनें मला फारच आनंद होऊन थोडक्याच दिवसांनीं पण स्वस्थपणांत मीं आपला उद्देश, महाराजांची आज्ञा आणि बळवंत–रावजींचें असान्निध्यामुळें लेखांत उभ्या राहिलेल्या अडचणी, सर्व त्यांना कळविल्यानंतर त्यांनीं मला मोठ्या आनंदानें " आपण जो विषय लिहिणार आहांत तो जरी मला अगदींच अपरिचित आहे तथापि भाषेसंबंधानें मी आपल्यास होईल तितकी पूर्ण मदत करीन, "—असें अभिवचन त्यांनीं देतांच माझा लेखनोत्साह दुणावला. मग असें वाटूं लागलें कीं, श्रीसद्‌गुरूची मर्जीच जर अशी दिसत आहे आणि अनुकूल साह्यही मिळत आहे, तर मग लोकोपहासास भिऊन पिछेहाट तरी काय ह्मणून घ्यावी ? जो प्रेरणा करणारा आणि तदनुकूल साहाय्य करणारा श्रीसद्गुरु समर्थ आहे, तो माझ्या श्रमास व लेखास यश देणार नाहीं कीं काय ? असें पूर्ण धैर्य आणून त्या आनंदघनाची मूर्ति हृदयांत सांठवून लेखनास आरंभ केला.

या कामांत उज्जन–मित्रांची व वर सांगितलेले रामभाऊ साहेब वकील यांची पूर्ण मदत मला मिळाल्यामुळेंच हा लेख इतक्या लवकर जगापुढें मांडतां आला, याबद्दल मीं माझ्या प्रिय मित्रांचे किती आभार मानावेत हें माझें मलाच कळत नाहीं. तसेंच येथील श्रीनाथबंधू यांची वेळोवेळीं या लेखाची पहाणी व पु-

द्दील सूचना हीं नेहमीं होत असत, यामुळें त्यांच्या कृपेचें वर्णन या मांसमय वाणीनें होणें खरोखर मोठें अशक्य आहे. त्याचप्रमाणें माझे आतेबंधु रा. रा. सखाराम बाळकृष्ण करमळकर हे या विषयांत पारंगत असून ते येथील श्रीगुरुवर्य ब्रह्मनिष्ठ श्रीवामनबावा महाराज यांच्या चरणसेवेंत तत्पर राहून प्रस्थानत्रयाचा पाठ केवळ गुरुकृपाबलावर सांगत असतात. यांनींही या माझ्या लेखांत कोणत्याही अंशानें श्रुति व शास्त्रसंमतांशीं विरोध न येऊं देण्याविषयींची काळजी घेतली आहे, याबद्दल मी त्यांचाही फार आभारी आहें. याप्रमाणें सर्वांनीं सर्व काळज्या वांटून घेतल्यावर नुसता निमित्ताला पुढें होऊन फुकट कागद काळे करण्यांत घरबसल्या अनायासें यशसंपादन होत आहे, मग म्यां मूर्खानें अशी अमोल संधी फुकट काय ह्मणून दवडावी बरें ? मूर्खास दुसरा थट्टेनें पंडित ह्मणतो आणि तसें ह्मणून घेण्याची त्यास आवड असते; कारण ती असल्यावांचून तो खरा मूर्ख कसा ठरणार ? मग माझ्यासारख्यानें पंडित ह्मणवून घेण्यांत तरी कसर कां करावी? कारण शहाण्यांत तर तो मूर्ख स्वतःसिद्धच आहे, पण मूर्खांत तर तो अडनांवी पंडित ठरतोना ? कां होईना ! मूर्खास जगांत इतका मान तरी काय थोडा आहे ? असो.

याप्रमाणें सर्व अनुकूल साहित्यें एकत्र जमल्यावर आणि लेखनासही आरंभ झाल्यावर एके दिवशीं अकस्मात् माझ्या उज्जन येथील एका मित्राच्या सहवासजन्य बुद्धिसंस्कारानें हा ( Blind belief ) अंध विश्वास काय कामाचा—! सद्गुरूची इच्छा व कृपाही

आहे, इ० श्रीगुरुबंधूंनीं सांगितलेल्या गोष्टींचें मी प्रत्यंतर तरी काय मानावें? कीं ज्याच्या बलावर आपण आपला जीव असा धोक्यांत घालावा? अशा प्रबल अनास्थेनें बोकांडें धरलें! आणि लेखही ठरल्या दिशेनें प्रथम प्रकरण म्ह० ब्रह्मस्वरूप वर्णन करीत करीत "सच्चिदानंद" गुणांच्या व्यापकत्वाच्या विवेचनापर्यंत येऊन ठेपला.

आतां ब्रह्माचे चार पाद वर्णन करावयाचे, पण मायेच्या साह्यावांचून ते करतां येईनात. कारण ब्रह्म अक्रिय, अलिप्त आणि अव्यक्त असल्यानें त्याला मायेचा विकार लागल्यावांचून वाचारंभणच करतां येत नाहीं; तथापि मायेच्या जागीं सृष्टि हें नांव देऊन अव्यक्त गुणांस जितकें व्यक्त करतां आलें तेवढें केलें, पुढें मति कुंठित झाली. माया हें दुसरें प्रकरण असून तें पहिल्यानें घ्यावें तर ब्रह्माच्या आधारावांचून माया बोलतां येईना! शेवटीं प्राचीन रीतीप्रमाणें "जीव" वर्णनाचें चवथें प्रकरण हातीं घ्यावें असाच बेत केला, पण तेंही प्रशस्त वाटेना! कारण अर्वाचीन वाचक ह्मणतील कीं, यांनीं आणली आपली हेमाडपंथी तऱ्हा! पूर्वीचे संस्कृत व प्राकृत ग्रंथ थोडे का आहेत, यांत तुह्मी जास्त भर घालून काय सांगणार आहांत! या ग्रंथांनाच जर कोणी पहात नाहींत, मग तुमच्या या असल्या क्षुल्लक लेखाला पुसतो कोण? असे नानाविध तरंग मनांत येऊं लागले, व मित्रांच्या सल्लयानें ठरलेल्या गोष्टींत तर फेरबदल न करण्याचा आग्रह वाढला! ठीकच आहे. कारण, एका मित्राच्या "स्वा-

इंड बिलीफनें " ( Blind Belief ) जर अडविलें तर मग दुसऱ्या मित्राच्या ठरावानें कां न अडवावें ? अर्धींच उल्हास, त्यांत आला × × × × × या म्हणीप्रमाणें झालें. असो.

मग मीं हा आलेला अडथळा श्री गुरुबंधु महाराजांस व सर्व मित्रांस सांगितला, पण अमुकच रीतीनें लिहावें, असा कांहींच निकाल लागेना ! आणि माझा तर आग्रह कांहीं केल्या सुटेना ! तेव्हां सर्वांनाच मोठी चिंता उत्पन्न झाली. मी तर अगदीं निराश व निरुत्साह झालों. हातचा लेख टाकून स्वस्थ बसलों आणि माझ्या आरंभशूरपणाची मला फारच लज्जा उत्पन्न झाली ! अशा स्थितींत चार दिवस लोटले ! अंतःकरण कांहीं केल्यानें स्वस्थ होईना. असंभावना आणि विपरीतभावना यांचे लोटावर लोट येऊं लागले. पूज्य बुद्धि तर नाहींशीच होण्याचा प्रसंग येऊन ठेपला. स्वल्प नौकारूढ मनुष्याची प्रचंड वादळांत सांपडल्यावर जशी स्थिति होते, अथवा एखादा लहान मुलगा शिंक्यावरचा खाऊ गुपचूप काढून घेण्याच्या बेतानें घडवंचीवर चढून शिंकें हातीं धरतो, तोंच ती पायाखालून निसटून शिंक्याला लोंबल्यामुळें तेंही तुटून भांडें बोडक्यावर आपटतें; बिचारा दोन्हींकडून ठेंचला जाऊन खाऊही सर्व सांडून गेल्यावर पंचमस्वर काढतो; इतक्यांत आईनें येऊन तें कृत्य पाहिल्याबरोबर मूर्खा, ही उठाठेव तुला सांगितली होती कोणी ? असें ह्मणून जशा दोन श्रीमुखांत द्याव्यात, तद्वत् अगदीं अक्षरशः माझी स्थिति झाली ! पण किती जरी झालें तरी

ती आईच ! तिला जर आपल्या बालकाची दया न येऊन त्याची तशी स्थिति पाहून हृदयांत पीळ न पडेल, तर मग तिला " आई " कोण ह्मणेल ? तीच त्याला त्या संकटांतून काढून त्याच्या हातापायांची जोपासना करून पोटभर खाऊ देईल ! आणि आनंदानें कुरवाळून पोटाशीं धरील ! याप्रमाणें अक्षरशः माझी स्थिति झाली ! त्यामुळें ( Blind Belief ) " अंध विश्वास " ह्मणणाऱ्या माझ्या मित्राचे मी फार आभार मानतों; कारण ह्या त्याच्या शंकेनें जर मी व्यामोहित झालों नसतों, तर हा अगाध आनंदाचा साक्षात्कार आज झाला नसता ? जेव्हां होता तेव्हां होता. असो—

पांचवे दिवशीं रात्रीं तर चिंता आणि खेद फारच वाढले ! त्यामुळें निद्रा आली नाहीं. अगदीं उजाडतांच कांहीं वेळ उगाच थोडासा डोळा लागल्यावर पहातों तों तेजःपुंज, देदीप्यमान्, मनोहर, कृपाघन, श्रीसद्गुरूनाथाची मूर्ति किंचित् कोपायमान पण दयार्द्रदृष्टीनें अवलोकन करीत माझ्या अति सन्निध येऊन उभी राहून, " वेड्या, अरे माझें प्रत्यक्ष आत्मीयरूप असा जो तुझाही प्राण प्रिय गुरु-बंधु माझ्या खास प्रेरणेनें तुला आज्ञा करीत असतां आणि तदनुकूल सर्व साहित्य मिळत असतांही अविश्वासबुद्धि आलीना ? तूंच माझा अविश्वास धरलास तर तुझ्या वाणीचा विश्वास या जगांत कोण धरणार आहे ? " असें ह्मणून स्वारी जों जात आहे तोंच मीं दोन्ही हातांनीं पायांस गच्च मिठी मारून उच्च स्वरानें विनंति केली कीं, " गुरुमाय,

आपणच जर मला या संशयसमुद्रांत बुडता टाकून चाललांत, तर या त्रिभुवनांत दुसरा कोणी असा त्राता आहे काय, कीं जो मला या संशयसमुद्रांतून बाहेर काढील? मी महा मंदमति मूर्ख आहें. चुकलों. आतां या अपराधाची क्षमा आपल्यावांचून दुसरें कोण करणार आहे? आपण माझी उपेक्षा करूं नये." ही माझी दीन वाणी कानीं पडतांच कृपामृत पान्हा फुटून मला पोटाशीं लावून वरदहस्तानें कुरवाळून आज्ञा केली कीं, काय तुला अडचण कोणती पडली आहे? यावर मीं आपली अडचण कळविली. "बस्स!! हाच कां तो घोंटाळा? अरे यांत आहे काय? जसें ब्रह्माच्या गुणांचें अव्यक्तरूपानें वर्णन झालें, तसेंच मायेचे अव्यक्त गुण दाखवून अव्यक्त निर्गुण, 'नाम'–ॐ आणि बिंदूंत अव्यक्त सृष्टीचें 'रूप' दाखवून प्रकृति–पुरुष–आणि नाम-रूप असे अव्यक्त चतुष्टयाचें प्रकरणच वेगळें करून टाक, ह्मणजे ग्रंथाच्या शेवटपर्यंत कोठेंच अडथळा येणार नाहीं. मी सन्निध आहें." असें ह्मणून प्रभु गुप्त होतात तोंच मी खडबडून उठलों. प्रेमाश्रूंचा प्रवाह लोटला. आनंद हृदयांत मावेना!! सर्व आकाश अक्षरांच्या ढगांनीं गच्च भरलें आहे. बुद्धींत प्रकाशकाचीं किरणें फांकलीं जाऊन विचाराची गर्दी उडून राहिली आहे! असा जन्मांत अननुभूत देखावा नेत्रांनीं बाहेर आणि बुद्धीनें हृदयांत पाहिल्यानें मला झालेला अतिहर्ष माझा मलाच दावतां येईना.

माझ्याच शेजारच्या पलंगावर माझे प्रिय मित्र रा. रा. रामभाऊ साहेब वकील हे माझ्यापूर्वीं थोडा वेळ

जागे होऊन बसले होते. त्यांनीं ही माझी एकदम झालेली चमत्कारिक स्थिति पाहतांच प्रश्न केला, कां हो! आज ही आपली स्थिति अशी विलक्षण आणि अपूर्वदृष्ट कां दिसते? मीं सांगण्यास बरीच चुकवाचुकव केली. कारण हे पडले नवीन विचारपद्धतीचे गृहस्थ ! त्यामुळें माझीं हीं वेडगळ भाषणें ऐकून थट्टा व टर उडविल्याशिवाय ते कधीं राहणार नाहींत असें मला वाटलें. परंतु ईश्वरी चमत्कार तो काय? माझी खरी हकीकत अक्षरशः त्यांच्या कानीं पडतांच त्यांचीही स्थिति माझ्याप्रमाणेंच झाली. हें पाहून मात्र मला अत्यंत आश्चर्य वाटलें. यानंतर बरींच भाषणें झालीं. हल्लीं त्यांच्या अंतःकरणाची स्थिति कशी आहे हें त्यांचें त्यांनाच विचारलें पाहिजे. असो. हा झालेला वृत्तांत माझ्या आत्मीय बंधुवर्गांना कळतांच त्यांनाही जो आनंद झाला तो लिहितां येत नाहीं! त्याच दिवसापासून माझ्या लिहिण्याचा सपाटा चालू होऊन अगदीं अप्रयत्नानें व अक्लेशानें हा लेख शेवटास गेला.

हा लेख ज्येष्ठ वद्य १३ बुधवारपासून आरंभ होऊन श्रावण शुद्ध ४ बुधवारीं म्हणजे एक महिना सहा दिवसांत समाप्त झाला. याचें लोकांस वाटेल न वाटेल, पण माझें मलाच अत्यंत आश्चर्य वाटत आहे. कारण जन्मादारभ्य लेखणी हातांत धरण्याचा मला अगदीं प्रथम संस्कार काय तो एढवाच. (पत्रव्यवहार वगैरे नव्हे बरें? कारण एवढें तर लहान मुलें देखील करूं शकतात.) आरंभीं श्रीगणेशालाच एवढा मोठा प्रचंड विषय, आणि तोही सुधारणेच्या अशा प्रखर कालांत! माझ्यासार-

ख्या अल्पज्ञानें कीं ज्याला शास्त्राध्ययन मुळींच नाहीं, म्ह० एकाद्या शब्दाची विभक्ति कोणती आहे हें देखील समजण्याची मारामार, मग अन्वय आणि श्लोकार्थ तर दूरच आहे. अशा जाडद्या व्युत्पत्तीवरून श्रुत्यर्थ किती समजत असेल, याचें अनुमान वाचकांस सहज करतां येईल. वेदाध्ययन ह्मटल्यास संध्येच्या पलीकडे पुरुषसूक्त मात्र ठाऊक आहे. अशा अरण्यपंडितानें असला विषय हातीं धरणें म्हणजे जगांत आपल्या हातांनीं आपली फजिती करून घेण्यासारखें होय! ही माझी योग्यता जितके लोक माझ्याशीं परिचित आहेत, त्यांना विदित आहेच. व माझी मलाही पूर्णपणें समजत आहे. हिच्याशीं व या विषयाशीं प्रकाशअंधकाराप्रमाणें अगदीं उलट अंतर आहे. पण नकळे श्रीसद्गुरूच्या मनांत काय आलें आहे तें? ज्याप्रमाणें तो हृदयांत प्रेरणा करीत आहे, तशींच्या तशींच अक्षरें माझ्या लेखणींतून निघत आहेत. भारवाहक पशु जसा इकडून तिकडे नुसतें ओझें पोंचवितो, त्याप्रमाणें जीं अक्षरें नेत्रानें समोर व बुद्धीनें आंत प्रकाशरूप दिसतात, त्यांची ही मीं नुसती प्रत लिहिली आहे म्ह० नक्कल केली आहे. क्वचित् अडचणीच्या मुद्यावर बुद्धि कुंठित झाली म्ह० कानांत शब्द ऐकूं आल्यासारखा भास होऊं लागतो व त्याप्रमाणें वाक्यें लिहून काढतों. सारांश, लेखनकाळीं मी अगदीं पराधीन असतों. माझी मलाच शुद्ध नसते. सारखा आनंदाचा प्रवाह उसळत असतो. तो माझा मलाच स्वसंवेद्य असतो इतकेंच नाहीं, तर आत्मीय बंधूंपैकीं क्वचित् प्रसंगीं जे कोणी ज-

वळ असतात तेही त्याच प्रवाहांत बुचकळ्या खाऊं लागतात. तें असो. परंतु माझे सुधारलेले मित्र वकील-साहेब यांना देखील दोनचार बुचकळ्या खाव्या लाग-ल्या, हें पाहून सर्वांनाच मोठें आश्चर्य वाटत आहे. यासंबंधानें आतां जास्त मला कांहींच लिहितां येत नाहीं. पूर्व कालांत सद्गुरूंनीं रेड्याच्या मुखानें वेद बोलविल्याची हल्लींच्या लोकांस नुसती दंतकथा वाटत आहे! परंतु या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव माझ्या ठि-काणीं मी क्षणोक्षणीं घेत आहें ! त्यामुळें हल्लींचे माझे दिवस इतके आनंदानें जात आहेत कीं, आजपावेतों असे कधींच गेले नाहींत; व उरलेलें आयुष्य असेंच आनंदांत जावो, अशी माझी त्या जगन्नियंत्या परमेश्व-रापाशीं सविनय प्रार्थना आहे.

आतां या सर्व इमारतीचा मूळ पाया घालणाराचे उपकार प्रदर्शित केल्यावांचून पुढें जाववतच नाहीं ! माझी मातोश्री श्री० गोपिकाबाईसाहेब जटार ह्या स-दैव श्रीरामचंद्राचे अति उत्कट आणि निःसीम भ-क्तीनें, भजनप्रतापानें, आणि दयादाक्षिण्यशौर्यानें जगांत साधुवर्गांत अहिल्याबाई अथवा मिराबाईप्र-माणें आपलें नांव प्रसिद्ध करून आणि श्रीगुरु का-शिनाथमहाराज ( ढोलीबावा ) यांची आमरणपर्यंत सेवा करून, गुरुभक्तिमाहात्म्याचा ध्वज उभारून, संवत् १९४२ मध्यें पौष शुद्ध ११ स श्री गुरूच्या मंदिरांत भजन ऐकण्याकरितां म्हणून स्वतः चालत जाऊन कीर्तन सुरू असतां अकरा प्रदक्षणा घालून, समाधीपुढें नमस्कार करतांना जें गुरुपादुकेवर म-

स्तक अर्पण केलें तें पुन्हां न उचलतां त्यांतच लीन झाली; म्हणून तिला मेली असें म्हणतां येत नाहीं. कारण मरणाराचें मरण आपण नेहमींच्या अनुभवावरून पहातच आहोंत. हातावर टाळी देऊन जाणारे हे मरणारे नव्हत. त्यांना मेले असें म्हणणारे हेंच मरणारे होत. असो. माझे वडील श्री० ती० रा० रा० कृष्णराव बल्लाळ जटार हे आपल्या ऐश्वर्यानुरूप औदार्याची आणि लोकप्रियतेची कीर्ति संपादन करून माझ्या मातोश्रीच्या एक वर्ष पूर्वींच कै. वा. झाले होते. अशा मातापितरांच्या वियोगस्थितींत माझें वय २१ वर्षांचें होतें. अशा अल्प वयांत संस्थानिक प्रपंचाचें ओझें एकदम अंगावर पडलें म्हणजे कशी स्थिति होते हें आपआपल्या परी सर्वांस अनुभूत आहेच. यावेळीं वडील माणसांपैकीं, माझा सांभाळ करण्यास आधार ह्मणजे केवल दर्शनीं मूर्ति श्री० ती० राधाबाईसाहेब जटार माझी आजी मात्र शेष होती. तिच्या वयाच्या ऐशी व्यावर्षांत हा एवढा कहर तिच्यावर गुदरला. त्या वेळचा तो प्रकारच अवर्णनीय आहे. सारांश काय कीं, ती मला आणि मी तिला, असे परस्परांवर अवलंबून राहून कालक्रमणा चालली ! तिचें रहाणें श्रीक्षेत्र काशी येथें असे. मी वर्षांतून एकवार तिची भेट घेऊन येत असें. पण संवत् १९५१ सालीं तिचा अखंडचाच काशीवास झाला. ! माझ्या संगोपनार्थ इतके दिवस ती पुरली हें माझें मोठें सुदैवच समजलें पाहिजे ! असो.

माझ्या मातोश्रीनें तिच्या मरणाच्या दोन तीन वर्षांपूर्वींच तिचे श्रीगुरुबंधु–श्रीगंगाधरनाथ महाराज यांच्या चरणीं मजला बलात्कारें अर्पण केलें. बलात्कारें म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, तसें व्हावें अशी माझी मुळींच इच्छा नव्हती. पण तिच्या कडक तेजापुढें माझें कधींच कांहीं चाललें नाहीं! मला तिनें नाळासकट ओटींत घेतल्यामुळें आणि तेव्हांपासून तिनें माझें संगोपन केल्यामुळें खऱ्या मातृवात्सल्यांत कमीपणा असण्याचा संभवच राहिला नव्हता. तिनें श्रीक्षेत्र अयोध्येंत स्वर्गद्वारघाटावर श्रीरामाचें मंदीर बांधविलें आहे. त्या ठिकाणीं जे लोक दर्शनार्थ जातात ते त्या मंदिरांतील लोकोत्तर व मनोहर मूर्ति व त्या मंदिराची अपूर्व रचना हीं पाहिल्याबरोबर हें प्रत्यक्ष स्वर्गद्वारच आहे कीं काय असे उद्गार त्यांच्या मुखांतून ऐकूं येतात. या ठिकाणीं तिचें पुष्कळ राहणें असल्यानें, तिचा सर्वकाल भजन, पूजन आणि साधुसंतांच्या दर्शनांत व आतिथ्यांत जात असे व माझ्याकडूनही असल्या गोष्टी जबरदस्तीनें करवीत असे.—पण असल्या कृत्यांचा मला फार कंटाळा येत असे, हें पाहून तिला परमावधीचा खेद उत्पन्न होऊन ती मोठें दुःख करीत असे. आणि “ माझ्या पश्चात् तुझी काय स्थिति होईल आणि तुझा परिणाम कसा लागेल हें कांहीं कळत नाहीं ! चांडाळा तूं माझ्या पोटीं कोणी तरी राक्षस उत्पन्न झाला आहेस ! हीं सर्व संस्थानें तूं बुडवून देवधर्माला आंवळ्याएवढें पूज्य लावशील. मी जीवंत आहें तोंपावेतोंच या मं-

दिराचा उत्सर्ग करून टाकतें, ह्मणजे तूं निष्कंटक होऊन तुला यथेष्टाचारी होतां येईल ! " याप्रमाणें दयार्द्र अंतःकरणानें, खऱ्या मातृप्रेमानें व कळवळ्यानें माझी कानउघाडणी करीत असतांना तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा देखील येत असत ! पण मी काय खरोखरच पाषाण ! माझें मन यत्किंचितही तिच्या ह्मणण्याकडे वळत नसे. जणूं काय असें न करण्याविषयीं मीं शपथच वाहिली होती कीं काय कोण-जाणें, पण तिनेंही बलात्कारानें माझ्या हातून सत्कृत्येंच घडवावयाचीं, असा दृढ संकल्पच केला होता कीं काय ? नकळे ! ! असो. याप्रमाणें तिचें व माझें व्रत शेवटपर्यंत निभून, तिचा देहांत होतांच आह्मी स्त्रीपुरुष प्रपंचांत उघडे पडल्याबद्दल लौकिकी रीतीनें दुःख तर झालेंच, पण अनिच्छित कृत्याचा शूल नाहींसा झाल्याचा फार आनंद झाला ! ती खरी जननी आणि खरी गुरुभक्तशिरोमणी असल्यानें, मरणाच्या दोन महिने अगोदरच श्रीसद्गुरु ह्मणजे तिचे गुरुबंधु, आणि माझे गुरुबंधु जे हल्लीं पदारूढ आहेत, या उभयतांना माझ्या समक्ष जतावून सांगितलें कीं, " माझा समय जवळ आला आहे ! या मूर्खाला आपल्या ओटींत घातला असतांही याच्या बुद्धीला फेर पडत नाहीं, याचा मला मोठा खेद वाटतो ! आतां आपण यास सांभाळा " असें म्हणून तिच्या डोळ्यांला पाणी आलें. तिचें सांत्वन उभयतां महाराजांनीं त्यावेळीं केलें. हा संवाद ऐकून मला मनांत फार हसें येऊं लागलें. तिला मात्र जननी म्ह० पुत्राचें खरें हित क-

रणारी हें नांव शोभलें. जातां जातां असा कांहीं जादू घालून गेली कीं, त्याचें वर्णन माझ्या लेखणीनें बाहेर येऊंच शकत नाहीं ! सारांश काय कीं, एकदम पश्चिमेचा अमोघ प्रवाह पूर्वेस वळला ! मग मात्र तिच्या वियोगापासून झालेल्या दुःखाचा खरा उमाळा बाहेर कोसळला ! डोळे उघडले ! पण आतां त्याचा उपयोग काय ? ती तर गेलीच, पण चमत्कार हा कीं, पुढची सर्व योजना पूर्वींच ती करून गेली असें माझ्या पुढें अनुभवास आलें ! तिचे खासगी कारभारी रा. गोविंद विनायक पराडकर हे जालवणचे राहणारे असून तेथील राजाचे संबंधी होते. कालचक्र फिरल्यानें हें राज्य बिघडल्यामुळें हे गृहस्थ आमच्या संग्रहीं येऊन राहिले होते. अयोध्या येथील मंदीर वगैरे तयार करण्याचें कामांत मूळापासून यांच्याकडे देखरेख सोंपविल्यामुळें सर्व कामें यांच्याच हातून तयार झालीं. हे गृहस्थ मोठे विश्वासूक तर होतेच. पण त्यांतल्या त्यांत स्वतः निर्मल अंतःकरणाचे असून सद्गुणांचें भांडार आणि भक्तराजशिरोमणी असे होते. आणि याच अयोध्येच्या संस्थानांत वे०रा०रा० श्रीब्रह्मनिष्ठ धुंडीराज शास्त्रीबावा केळकर हेही असत. अशीं हीं दोन रत्नें बाळगून ठेविलीं होतीं. त्यांनीं ही माझ्या अंतःकरणाची दैन्यदशा पाहून मातोश्रीनें जातां जातां जें बीज पेरून ठेविलें होतें, त्याची भूमि शोधन करून तिच्यावर सगुणजल सिंचनानें अंकुर आणून हें माझें लहानसें रोंप लागवडीस आणलें. पुढें श्रीक्षेत्र काशी येथील श्री लक्ष्मीनारायणाच्या मंदिरांत वडिलांनीं आणून ठेविले-

त्या तपोनिधी, ज्ञानसागरविभूती, श्रीमत्परमहंस श्री गुरुपूर्णाश्रमस्वामी महाराज आणि श्री मत्परमहंस दक्षिणामूर्ति स्वामी महाराज या उभय ज्ञानवैराग्यसंपन्न साक्षात् ईश्वरमूर्तींची लहानपणापासून मजवर पूर्ण कृपा होतीच; त्यांनीं या माझ्या लहानशा वृक्षास आनंदानें किंचित् निर्गुण मसाल्याची योजना करून, कांसवदृष्टीप्रमाणें ते दुरूनच आपल्या कृपामृताचें सिंचन करीत असत. असा हा वृक्ष हळू हळू वृद्धिंगत होऊन पुढें फळें आलीं तीं आज परिपक्कदशेस येऊन त्यांतून श्रीसद्गुरूचे अमोघ कृपामृत बिंदु गळूं लागले. ज्यांच्या रसास्वादानें कांहीं लोक आपलीं अंतःकरणें तृप्त होतात असें ह्मणतात, पण मलाच तो रस कडू कां लागावा ? यांतलें इंगित माझें मलाच कळत नाहीं ! रस कडू ह्मणावा, तर लोक त्याला गोड ह्मणतात. यावरून माझ्याच जिव्हेला कांहीं तरी विकार झाला असावा अशी खात्री झाल्यानें गुरुबंधुवैद्यानें सांगितल्याप्रमाणें हें औषध सेवन करण्यास आरंभ केला आहे, पण पथ्य मात्र होत नाहीं ! यामुळें औषधापासून गुण येईल किंवा नाहीं ही शंका वाटत आहे ! पण पथ्य करूं नये आणि औषधाला दोष द्यावा ! हा तरी माझा केवढा मूर्खपणा आहे. असो, याचा परिणाम काय होईल तो पहातां येईल.

वृक्ष तयारीवर येईपर्यंत मध्यंतरीं हिंसक प्राण्यांपासून त्याचें संरक्षण कुंपण घालून करणें हें नेहमींच्या रक्षकाचें कर्तव्य कर्म आहे. त्याच्यावांचून दुसरा कोणी संरक्षण करूं शकणार नाहीं ! याच प्रमाणें या माझ्या

विचारवृक्षाचें बीज पेरलें जाण्यास आणि मातापितरांच्या वियोगानें प्रपंचरूप अनंतविध विध्वंसक उपाधींनीं आज मित्तीस या वृक्षाचा मागमूस देखील दिसण्याचा संभव नव्हता, पण मातोश्रींचा बंदोबस्त तो काय ! तिनें आपल्या जिवंतपणींच तिचे परम विश्वासुक कारभाऱ्यांनीं संन्यासाश्रम घेतल्यावर त्यांच्याच गुणांप्रमाणें अथवा त्यांची दुसरी प्रतिमाच असें ह्मटलें तरी चालेल, असे त्यांचे चिरंजीव रा. गोपाळराव पराडकर यांस सर्व संस्थानच्या कारभारावर मुख्य दिवाण नेमलें. यांनीं माझ्या बाल्यावस्थेंत माझ्या शिक्षणाची वगैरे उत्तम व्यवस्था ठेविली. वडीलमातोश्रींच्या वियोगानंतर सर्व कारभार आणि बरेंवाईटपणाचा एकंदर बोजा आपल्या शिरावर घेऊन प्रामाणिकपणानें आणि एकनिष्ठेनें आजपावेतों त्यांनीं काम केलें. त्यामुळें प्रपंचाची उपाधि कशी ती मला मुळींच समजली नाहीं ! असें प्रांजळपणें याठिकाणीं सांगितल्याशिवाय माझ्याच्यानें राहवत नाहीं. अशा प्रकारची माझ्या संस्थानची सुव्यवस्था राहत आहे, म्हणूनच माझ्या अंतःकरणास स्वस्थता राहून, या दिशेचा विचार करण्यास सवड सांपडून, येथवर मजल येऊन पोहोंचली. याबद्दल रा० गोपाळरावजींचे व त्यांच्या हाताखालीं संस्थानांत आणखी विश्वासूक व प्रामाणिक जे विष्णुपंत भोपटकर आणि माधवराव करमरकर इ० कामदार लोक आहेत, या सर्वांचे फार फार आभार मानल्याशिवाय माझ्याच्यानें राहवत नाहीं. तसेंच ज्या माझ्या आप्त स्वकीय मंडळीनें, चुलते व चुलत्या

इ. वडील माणसांनीं, माझें प्रापंचिक व शारीरिक संरक्षण केलें, त्यांचेही मजवर अनंत उपकार असून ते मला शिरोवंद्य आहेत.

आतां या संस्थानचे मूळ उत्पादक आणि त्याला नांवारूपास आणणारे यश, प्रताप, तेज, व पुण्यपुरुष श्री० बाळाजी चिमणाजी जटार दिवाणसाहेब मुमताजुदौला बहादर हे पूर्वी जालवण संस्थानचे फडणवीस होते. यांनीं ग्वाल्हेर संस्थानांत येऊन श्रीमंत सरकार जयाजीराव महाराजसाहेब शिंदे आलीजा बहादर यांच्या चरणसेवेंत तत्पर राहून त्यांची पूर्ण कृपा संपादन करून एका लहानशा हुद्यापासून तों अखेर शिंदेशाईच्या मुख्य दिवाणगिरीपावेतों कामें केलीं; व पुत्रपौत्रादि वंशपरंपरा जहागिरी व पालखी, अबदागीर इ० राजचिन्हें संपादन करून सर्व राष्ट्रीयांचीं अंतःकरणें आपल्याकडे वळवून घेतलीं. काशी व अयोध्या या क्षेत्रद्वयांत अजरामर कीर्तिरूप अशीं सुंदर व भव्य मंदिरें बांधून मनुष्यजन्मास आल्याचें पूर्ण सार्थक केलें. शेवटीं महाराजांची आज्ञा घेऊन काशीवास केला व अंतकालीं संन्यासदीक्षा घेऊन महान् योग्याप्रमाणें श्रीगंगेंत बसून नारायण नामाचा उच्चार करून समाधि घेतली. हा अपूर्व देखावा पहाण्याकरितां काशीच्या सर्व युरोपियन अधिकाऱ्यांसुद्धां एकत्र जमले होते. सारांश, यांच्या यशाचें जितकें वर्णन करावें तितकें थोडेंच आहे! यांनीं संपादन केलेल्या ऐश्वर्यास आज मित्तीपावेतों श्रीमंत महाराज माधवराव साहेब शिंदे सरकार आलीजा बहादर दामयकबालहू जी. सी.

एस.आय. यांनीं अत्यंत कृपाळू अंतःकरणानें चालवून सर्व प्रकारें पूर्वीप्रमाणेंच प्रतिष्ठा व इतमाम कायम ठेवून ते माझा सांभाळ करीत आहेत. हा देह केवळ त्यांच्याच अन्नानें व कृपेनें पोषण होत असल्यानें त्यांचें यश वर्णन करण्यास माझी जिव्हा अगदीं असमर्थ आहे. ह्मणून नम्रतापूर्वक व कायावाचामनेंकरून त्यांच्या चरणीं मस्तक ठेवणें एवढेंच माझें कर्तव्य बजावून मी हा लेख समाप्त करतोंः—

वाचक ह्मणतील कीं ही प्रस्तावना आहे किंवा इतिहास आहे? आहे तरी काय? ही प्रस्तावना वाचून सर्वांना एकवार हंसें तर येईल खरेंच! इतकेंच नव्हे, तर प्रत्येक वाचक कदाचित् थट्टा देखील उडविणार-नाहीं हें कशावरून! कारण सुधारणेच्या असल्या प्रखर ग्रीष्मकालांत हें माझ्या वेडगळ लेखनाचें रोंप मीं जगापुढें आणणें म्ह० मीं आपल्या मूर्खपणाचा कळस करून स्वतःला पूर्णपणें उपहासास्पद करून घेण्यासारखें होय! अशी माझी तर निदान पक्की खात्री आहे! पण असें समजून उमजून केवळ श्रीसद्गुरूच्याच बलावर निर्भयांतःकरणानें माझी जी खरी हकीकत आहे तीच अक्षरशः मी जगांपुढें मांडीत आहें. वाचकांना ही हकीकत वाचतांना अगदीं खोटी आहे असें वाटेल तर खरेंच, व प्रथम असें वाटणें हें मलाही कबूल आहे. पण त्यांना माझी अशी विनंति आहे कीं, जर परमेश्वरानें तुम्हांला सारासारविचार करण्याची शक्ति दिली असेल तर नुसता प्रस्तावनालेखच वाचून हातांतलें पुस्तक खालीं टाकून त्याचा व माझा उपहास करूं नका,

सर्व लेख शेवटपर्यंत नीट लक्षपूर्वक वाचा, न समजल्यास पुनः वाचा, यावरही न समजेल तर आणखी एकवार वाचा; ह्मणजे तुम्हीं आपल्या मुखानें जें काय म्हणाल तें तुमचें तुम्हींच ऐकाल. कारण मी तर तुमच्यापासून फार लांब आहें. ज्याला आपल्या बुद्धीच्या अगाध वैभवानें या माझ्या लेखापैकीं कांहींच कळणार नाहीं, अथवा यांत त्याला कांहींच सार वाटणार नाहीं, तर त्यानें यथेच्छ पाहिजे तें म्हणावें. त्याच्याही ह्मणण्याचा मी मोठ्या नम्रतेनें आणि आभारपूर्वक स्वीकार करीन. पण जे सारग्रहण करणारे असतील त्यांना या माझ्या भाषणाचें कौतुक वाटल्यावांचून कधींच राहणार नाहीं. आणि ते आपल्या प्रिय आपत्याप्रमाणें मजवरही प्रेम ठेवून माझ्या सुदैवानें समक्ष भेटीचा योग येईपर्यंत निदान पत्रद्वारानें तरी माझा समाचार घेतल्यावांचून राहणार नाहींत, अशी मला पूर्ण खात्री आहे. इतकें ह्मणून हा लांबलेला प्रस्तावनालेख आटोपतों. लोभ असावा हे विनंति.

**रामराव कृष्ण जटार;**
मुमताजु दौलाबहादर.

मुक्काम लष्कर–(ग्वालियर).
मिति श्रावण शुद्ध १३ शुक्रवार, संवत् १९५३.
तारीख २१ आगष्ट सन १८९६ इ०.

ॐ

# तत्सत्

## उपोद्घात.

**जगद्व्यापि परमेश्वरानें**, अनंतकोटी ब्रह्मांडांची सृष्टिरचना स्वेच्छाविहारार्थ, निर्माण करून तो सर्वात्मस्वरूपानें रममाण जाहला आहे; ह्या त्याच्या अघटित घटनेकडे आणि अगाध वैभवाकडे या मानवी प्राण्यानें विचारपूर्वक अवलोकन केल्यास त्याची अल्पमति अगदीं कुंठित होऊन आश्चर्यचकित होते. असंख्य प्राणी आणि नानाविध पदार्थ निर्माण करण्यांत जगदीशाचा कोणता हेतु असावा हें कळणें अगदीं अशक्य आहे ! ज्याप्रमाणें **परमात्मा** अतर्क्य आहे, त्याप्रमाणें त्याचे हेतु व शक्ति हीं जाणण्याचें महा दुर्धर आहे. तथापि अखिल जीवमात्रांत हा मानवी प्राणी निर्माण करण्याचा ईश्वराचा खास उद्देश असा दिसतो कीं, "या माझ्या अगाध वैभवास आणि सामर्थ्यास पूर्णपणें अन्य कोणी मजवांचून जाणण्यास समर्थ होऊंच शकत नाहीं; करितां अंशतः तरी तीं समजण्याची कोणास शक्ति दिल्यास, तो प्राणी विचारपूर्वक चिंतनावलोकन करील तर त्यास माझ्या स्वरूपाचा व ऐश्वर्याचा आनंद जाहल्यावांचून कधींच राहणार नाहीं." असें समजून इतर जीवांप्रमाणें, या मानवी प्राण्यास बुद्धितत्त्व देऊन, त्यांत सारासारविचार करण्याची मो-

ठी अपूर्व शक्ति आणि ज्ञानसंपादनाची पूर्ण नरशरीरादिक–सामुग्री दिली. हा या मानवी प्राण्यावर परमात्म्याचा महदुपकार झाला आहे; यांतून हा कोणतेही प्रकारें उत्तीर्ण होऊंच शकत नाहीं, म्हणून, " मी कोण आहें, " आलों कोठून, जाणार कोठें ? मला कोणी आणि कशाकरितां निर्माण केलें आहे ? माझें अवश्य कर्तव्य कोणतें ? " याचा या जीवांनीं कांहींच विचार न करतां, केवळ बाह्य विषयासक्तींत आयुष्याचा क्षय केल्यास याच्यासारखा कृतघ्न आणि अधम दुसरा कोणी असूं शकेल काय ? एवढ्याकरितां या मानवी जीवानें जगन्नियंत्याच्या हेतूस ओळखून त्यानें दिलेल्या अपूर्व विचारशक्तीच्या देणगीचा उपयोग करून त्या परमात्म्याचें यथार्थ **स्वरूप** आणि **सच्चिदानंद** गुणांचा शोध करून, त्यापासून होणाऱ्या लाभानें कृतार्थ झालें पाहिजे. या ठिकाणीं कोणी अशी शंका घेतील कीं, परमात्म्याच्या स्वरूपाचा व गुणांचा शोध, श्रुति, शेष, शारदादिकांस लागला नसून, तुह्मीं अल्पमति प्राणी काय लावणार ? याचें उत्तर असें आहे कीं, गरुडाच्या उड्डाणानेंही गहन आकाशाचा थांग लागत नाहीं, ह्मणून क्षुद्र मशकानें आपल्या शक्त्यनुसार उडूं नव्हे कीं काय ? कोणी प्रतिबंध तर केला नाहींना ? यास्तव आपल्या अल्प बुद्ध्यनुरूप सारासारविचारशक्तीच्या बलावर स्वकृतार्थतेकरितां, श्रुति–शास्त्रसंमत आणि पूर्वाचार्यांनीं दर्शित केलेल्या मार्गांनीं त्या परमात्म्याच्या व्यापक स्वरूपाचा आणि **सच्चिदानंद** गुणानुवा-

दांचा लाभ होण्याचा पूर्ण प्रयत्न करून स्वजातीय बांधवांसही तोच आनंद प्राप्त होण्यांत करवेल तितकी मदत करणें हेंच माझें अवश्य कर्तव्य आहे, असें समजून मी या लेखास प्रारंभ करितों. हा लेख कोणत्याही ग्रंथाचें भाषांतर नसून केवळ सद्गुरुकृपेच्या आणि बुद्धिप्रकाशकाच्या बलावर लिहीत आहें, ह्मणून बुद्धिमानांनीं व विचारी पुरुषांनीं या लेखापासून पराङ्मुख न होतां याचा अवश्य लक्षपूर्वक विचार करून स्वजनांसही या विषयाची अभिरुचि उत्पन्न करून त्यांस आत्माभिमुख करावें, आणि स्वतः व्हावें, हेंच प्रत्येक वाचकाचें अवश्य कर्तव्य आहे; व तें त्यांनीं करावें, अशी माझी त्यांना सविनय प्रार्थना आहे.

॥ गुरुर्नसस्यात् स्वजनो नसस्यात्पिता नसस्याज्जननी ॥
न सास्यात् ॥
॥ दैवं नतत्स्यान्न पतिश्च सस्यान्नमोचयेद्यः समुपेत-
मृत्युम् ॥ १ ॥

श्रीमद्भागवते ऋषभोक्तिः

रामराव कृष्ण जटार

## विशेष सूचना.

यांतील विषय चांगला समजेपर्यंत हें पुस्तक वाचण्याविषयीं सूज्ञ वाचकांस वरील प्रस्तावनेंत सविनय प्रार्थना केलीच आहे. परंतु बरेच वेळां वाचूनही या पुस्तकांतील विषय ज्यांना दुर्बोध वाटून किंमत देऊन घेतल्याचा पश्चात्ताप होईल अशा लोकांनीं हें पुस्तक आमच्याकडे परत केल्यास मोठ्या आनंदानें आह्मीं त्याचा स्वीकार करून डांकेचा व व्ही. पी. चा खर्च वजा जातां त्यांची त्यांस किंमत वापस केली जाईल. पुस्तक परत करणारांनीं सदरीं पुस्तक न मळण्याविषयीं व न फाडण्याविषयीं विशेष खबरदारी ठेवली पाहिजे. हीं पुस्तकें विकत मिळण्याचीं ठिकाणें पुस्तकाच्या शेवटीं दिलेल्या सूचनेंत लिहिलींच आहेत, त्याप्रमाणें मागणी केली असतां व्ही. पी. नें पुस्तक रवाना केलें जाईल.

रामराव कृष्ण जटार.

# ॐ तत्सत् ब्रह्मणे नमः

## आर्यागीति.

॥ सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म विशुद्धं परं स्वतः सिद्धं ॥
॥ नित्यानंदैकरसं प्रत्यगभिन्नं निरंतरं जयति ॥

**श्रीमच्छंकराचार्यपादाः**

**जगदीशानें** जडचैतन्यात्मक चराचरसृष्टि निर्माण करून, आपले स्वयंसिद्ध स्वरूपभूत असे **सच्चिदानंद** गुण, उपाधिरूप जहालेल्या सृष्टपदार्थांच्या स्वभावानुरूप न्यूनाधिक भावानें प्रकट केल्यासारखे दिसत आहेत. पण विचारदृष्ट्या, न्यूनाधिक भाव आहे, असें मुळींच ह्मणतां येणार नाहीं. कारण, त्याचे हे गुण अविभक्त स्वरूप असल्यानें, अखिल पदार्थमात्रांत ओतप्रोत भावानें सारखे भरले आहेत. त्यांचा यथार्थबोध होण्याकरितां, पदार्थांचा भिन्न स्वभाव आणि त्यांच्या ( गुणांच्या ) व्याप्तीचा न्यूनाधिकपणा, अगदीं पृथक् पृथक् दाखविणें भाग पडलें. याचा सूक्ष्म विचार केला ह्मणजे पदार्थांचा स्वभाव आणि परमात्म्याचे गुण यांच्यामध्यें भिन्नभाव दिसत असूनही कसें अत्यंत ऐक्य आहे हें पूर्णपणें लक्षांत येईल—याकरितां आपण प्रथम **सच्चिदानंद** गुणांचा विचार करूं.

**जगद्व्यापि परमेश्वराचे** स्वतःसिद्ध तीन गुण आहेत. ते कोणते तर **सत्, चित्** आणि **आनंद.**

जसा परमात्मा सर्वव्यापक, अखंड, अनंत आणि त्रिकालाबाधित आहे, तसेच त्याचे गुणही व्यापक आहेत; दिसण्यांत मात्र पृथक् दिसतात, परंतु ते एकरूपच आहेत; भिन्नता मुळींच नाहीं; त्यांची अभिन्नता कशी आहे ती पहा. **सत्** ह्मणजे सदैव असणारें. ज्या वस्तूचा भूत, भविष्य, वर्तमान कालीं कधींच अभाव होत नाहीं, तीच वस्तू **सत्** असूं शकेल. एक कालांत आहे, आणि दुसऱ्या कालांत नाहीं, अशा वस्तूला **सत्** ह्मणतां येत नाहीं. अबाधित स्वरूपच **सत्** वस्तू असली पाहिजे.

आतां **चित्** ह्मणजे चलन वलन होणें, आणि सजीवपण असणें, यालाच चैतन्य असें ह्मणतात. ज्या वस्तूंत एक कालीं चलनवलन आहे, आणि दुसऱ्या कालीं तें नाहीं, अशा वस्तूस मृत किंवा जड झाली, असें आपण ह्मणतों; ह्मणून, सदैव चैतन्यरूप असणारी व कोणत्याही कालीं जड नसणारी अशीच वस्तू **चैतन्य** असूं शकेल; आणि त्रिकालाबाधित **असणेंपण** जिच्या ठिकाणीं असेल, तीच वस्तू **चैतन्य** ह्मणतां येईल; अर्थात **सत** ह्म० **असणेंपण,** याला सोडून **चित्** ह्म० **चैतन्यपणास** वेगळें राहतां येत नाहीं; यावरून जें **सत्** असेल तेंच **चित्** होऊं शकेल, व जें **चित्** असेल तेंच **सत्** राहूं शकेल; ज्याअर्थीं दोन्ही गुणांस परस्परांना सोडून भिन्न राहतां येत नाहीं, त्याअर्थीं हे दोन्हीही एकाच वस्तूच्या आश्रयानें असले पाहिजेत, अथवा दोघांचें स्वरूप एकच असलें पाहिजे **ही गोष्ट** सिद्ध झाली.

आतां तिसरा गुण जो **आनंद** याचा विचार करूं:-

**आनंद** ह्मणजे कोणत्याही प्रकारचा खेद अथवा न्यूनपणा कधींच प्रतीत न होणें, यालाच **आनंद** असें ह्मटलें पाहिजे. एक कालीं आनंद आहे आणि दुसऱ्या कालीं तो नष्ट झाला, तर त्याला खरा आनंद ह्मणतां येत नाहीं; आनंद तर तोच कीं, ज्याचा विरोधी **खेद** याचा सदैव अभावच असला पाहिजे; अर्थात् ज्या वस्तूचा अभाव ह्मणजे नाहींसेंपण असेल, ती वस्तू कधींच **चैतन्य** होऊं शकत नाहीं; व जी वस्तू **सत्ता** आणि **चैतन्य** यांरहित असेल, ती **आनंदरूप** होणार नाहीं. ज्या **आनंदा**च्या अंगीं नुसतें अस्तित्व असून, **चैतन्य** नसेल अशा प्रकारच्या आनंदाचा अनुभव होणार नाहीं; तो होण्याकरितां त्याच्याबरोबर **सत्ते**-प्रमाणें **चैतन्य**ही असलेंच पाहिजे; या दोन्ही गुणांस सोडून, एकट्या **आनंदा**ला पृथक् रूपानें राहतां येत नाहीं; यावरून काय झालें कीं, ज्या व्यक्तीच्या आश्रित **सत्** व **चित्** हे दोन गुण आहेत, तिच्याच आश्रित **आनंद** हा तिसरा गुण असावा, अथवा, **सत्**, **चित्** आणि **आनंद** हे तिन्ही गुण एकच असावेत; कारण हे भिन्नरूपानें अनुभवास येत नाहींत. ह्मणून, या तिन्ही गुणांचें मिश्र **तत्त्व** अथवा हे तिन्ही गुण ज्या **विभूती**च्या आश्रित आहेत, तोच **सच्चिदानंद-घन** परमात्मा आहे असें ह्मटलें पाहिजे. याप्रमाणें **सच्चिदानंद** या शब्दाची व्याख्या झाली; आतां **सत्**, **चित्** आणि **आनंद** हे तिन्ही गुण कोणत्या उपाधीं-

च्या न्यूनाधिक भावानें कसे व्यक्त होतात याचा विचार करूं.

**परमात्म्या**पासून अखिल सृष्टि जडचैतन्यात्मक निर्माण झाली असें ह्मणण्याचा प्रचार आहे; परंतु त्याच्या अंगीं जडत्व नसून, सृष्टींत जडत्व कोठून आलें व तें कसें आलें, याचा विचार सृष्ट्युत्पत्तीच्या प्रकरणांत करूं. प्रस्तुत गुण कसे व्यक्त होतात, याच गोष्टीचा विचार करणें आहे; ह्मणून **परमात्म्या**पासून जडचैतन्यात्मक सृष्टि झाली असें ह्मणण्यापेक्षां, **सच्चिदानंदात्मक** सृष्टि निर्माण झाली असेंच ह्मणणें फार सयुक्तिक होईल; कारण सृष्टींतील कोणताही पदार्थ अवलोकन करूं लागलें असतां या तिन्ही गुणांचे बाहेर तो कधींच आढळणार नाहीं; ह्मणून सृष्ट पदार्थांचें वर्गीकरण करून त्यांत गुणांचा न्यूनाधिक भाव उपाधीच्या भेदानें कसा होतो तो पाहूं. प्रथम वर्गांत मृत्तिका, काष्ठ, पाषाण व धातु इत्यादि येतात; दुसऱ्या वर्गांत पर्वत, नदी, वृक्ष आणि वल्ली इ० येतात; आणि तिसऱ्या वर्गांत मनुष्य, पशु, पक्षी, जलचर, कीटक, दंश आणि मक्षिका, इत्यादिकांचा समावेश होतो. असे हे तीन वर्ग झाले. यांत प्रथम वर्गाचा समावेश द्वितीय वर्गांत होऊं शकतो, असें जरी आहे, तथापि एकच गुण स्पष्ट दाखविण्याकरितां, वेगळाच वर्ग करणें भाग पडलें. असो. मृत्तिका ह्म० (भूमीपासून वेगळी झालेली.) काष्ठ (वृक्षापासून वेगळें झालेलें.) पाषाण व धातू (पर्वतापासून व खाणीपासून वेगळे झालेले.) हे पदार्थ मूळापासून वेगळे झाले, ह्मणजे त्यांच्या वृ-

द्धीची क्रिया बंद पडते; अशा प्रकारच्या जड पदार्थमात्रांत **असणेंपणाची** जी **सत्ता** प्रतीत होते, ह्म॰ कोणताही पदार्थ आहे, असें जें वाटणें हाच परमात्म्याचा एक **सत्** गुण प्रकट होतो. दुसऱ्या वर्गांतील पर्वत, वृक्ष, वल्ली इ॰ कांचें छेदन केलें असतां, पुन्हां वृद्धि पावतात; व भूमींत पडलेला खळगा कालांतरानें बुजून जातो. या पदार्थांचे अंगीं वृद्धि पावणें व चलनवलन होणें हे स्वभाव असल्यानें परमात्म्याचा पहिला गुण जो **सत्** ह्म॰ असणेंपण हा तर आहेच, परंतु याच्याशिवाय **चित्** ह्म॰ **चैतन्य** हा दुसरा गुणही त्यांत व्यक्त होऊं लागतो. आतां तिसरा गुण जो **आनंद** हा मात्र बुद्धितत्त्वावलंबी आहे; आणि हें बुद्धितत्त्व तृतीय वर्गांतील जीवमात्रास ईश्वरानें दिलें आहे; याच्या योगानें, प्राण्यांस इच्छित पदार्थ प्राप्तींत व अनिष्ट दुःखनिवृत्तींत जो हर्ष होतो, जें सुख वाटतें, आणि जी तृप्ति होते, हींच चिन्हें **आनंद** गुणाचीं द्योतक असल्यानें, जीवमात्रांत दोन्ही वर्गांतील **सत्** आणि **चित्** हे गुण तर आलेच, पण यांच्याशिवाय **आनंद** हा तिसरा गुणही त्यांत आल्यानें, हा जीव **सच्चिदानंद** गुणविशिष्ट अशी ईश्वराची अति सूक्ष्म प्रतिमा आहे असें म्हटल्यास काय बाध आहे? जसें, वणव्यांतील अग्नीची बारीक ठिणगी ज्याप्रमाणें अग्नीची प्रतिमा असून, तिला अनुकूल दाहक उपाधी मिळाल्यास, तीच ठिणगी वणव्याच्या रूपाला प्राप्त होते. तसेंच, ईश्वरानें बुद्धि देऊन तिच्यांत सारासारविचारशक्ति, जी केवळ मानवी प्राण्यासच दिली आ-

हे, तिचें अवलंबन करून चालल्यास तो ईश्वररूपास प्राप्त झाल्यावांचून कधींच राहणार नाहीं. असो. आतां या वरील सिद्धांतावरून, अशी एक शंका उत्पन्न होई-ल कीं, जर गुणांच्या न्यूनाधिक भावानें अखिल सृष्टि ईश्वरापासूनच निर्माण झाली, तर त्रिगुणात्मक ईश्वरापा-सून झालेल्या सृष्ट पदार्थांत पहिले वर्गांत **सत्**, दुसरे वर्गांत **सत्–चित्** आणि तिसऱ्या वर्गांत **सत्–चित्** आणि **आनंद** असे न्यूनाधिक गुण कां व्यक्त व्हावेत? प्रत्येक पदार्थमात्रांत तिन्ही गुण असावयाला पाहिजेत, ते कां दिसत नाहींत? तर याचें उत्तर असें आहे कीं, पदार्थांत गुणांचा न्यूनाधिकपणा दिसतो मात्र, एरवीं तें दिसणें यथार्थ नसून, प्रत्येक पदार्थांत तिन्ही गुण कसे ओतप्रोत भरले आहेत, न्यूनाधिकभाव मुळींच नाहीं; केवळ व्यक्त होण्याचे उपाधीची ह्मणजे साधनाचीच न्यूनता आहे; ती कशी आहे तें पहा. उदाहरणार्थः आपण एक **आम्र**फल घेऊं; यांत रूप, रस, स्पर्श आणि गंध असे चार गुण आहेत. आतां या फळास हातानें स्पर्श केल्यावांचून त्याचा कठोर किंवा मृदुपणा समजूं शकत नाहीं; जिव्हेनें स्वाद घेतल्यावांचून रस कळणार नाहीं; नाकानें हुंगल्यावांचून गंध समजणार नाहीं; आणि डोळ्यानें पाहिल्यावांचून रूप दिसणार नाहीं; अर्थात ज्या इंद्रियानें जो गुण व्यक्त होणें श-क्य आहे, तो गुण दुसऱ्या इंद्रियानें कधींच व्यक्त हो-णार नाहीं. डोळ्याचें काम कान किंवा नाकाचें काम तोंड कधींच करूं शकणार नाहीं. जसें, एक अंध मनुष्य आहे, आणि ज्वरामुळें त्याच्या जिव्हेचा स्वाद गेला,

पडशामुळें नाक बंद झालें व काहीं वातविकारानें त्याची त्वचाही शून्य झाली; अशा व्याधिग्रस्त स्थितींत तो असतांना जर तें आम्रफल त्यास दिलें, तर त्या गरिबानें हा अमुकच पदार्थ आहे, असा बोध दुसऱ्यास कोणत्या साधनानें करून द्यावा बरें? गुण व्यक्त करणारीं इंद्रियें नष्ट झालीं ह्मणजे पदार्थांत गुण भरले असतांही, स्पष्ट बोध होऊं शकत नाहीं; आणि जड पदार्थांस इंद्रियाभाव असल्यामुळें, त्यांस स्वतःचे गुण व्यक्त करतां येत नाहींत, आणि याच कारणानें आसले पदार्थ जड ह्मणविले जातात. जसें, दुधांत दहीं, लोणी आणि तूप हे पदार्थ अव्यक्त आहेत; पण अनुकूल क्रिया केल्यावांचून, ते दुधांतून आपोआप बाहेर पडूं शकत नाहींत. तसेंच कोणत्याही पदार्थांत स्वतःसिद्ध असलेले गुण क्रियेवांचून बाहेर पडत नाहींत. सारांश, गुण व्यक्त होण्यास जें अनुकूल साधन अथवा ज्या क्रियारूप उपाधीची आवश्यकता असेल, त्यांचे योजनेवांचून तो कधींच व्यक्त होणार नाहीं. याचप्रमाणें, परमात्म्याचे तिन्ही गुण व्यक्त होण्यास उपाधींची आवश्यकता आहे. याची घटना करण्याकरितां वर सांगितलेल्या आम्रफलाचेंच आपण उदाहरण घेऊं. हें फल जोंपर्यंत वृक्षावर कायम होतें, तोंपर्यंत त्याच्या वृद्धीची क्रिया चालू होती; पण हेंच फल वृक्षापासून भिन्न होतांच तें जड पदार्थांत आलें; अर्थात त्याचें बीजही जडच असल्यामुळें, त्यांत केवळ अस्तित्व ह्म० **सत्ता** हाच एक गुण प्रकट दिसतो. नंतर याच बीजास भूमींत रोंपून जलसिंचनाची

उपाधि लागतांच, कोंब वर येऊन वृक्षाची तयारी होऊं लागली ह्मणजे **सत्ता** हा गुण कायम राहून, **चैतन्य** गुणही व्यक्त होऊं लागतो; पुढें त्याच वृक्षाचे पर्ण, पुष्प आणि फलांचा उपभोग प्राण्यास मिळूं लागतांच, ह्म० त्यांच्या बुद्धितत्त्वाच्या उपाधीचा संयोग त्या वृक्षाशीं होतांच, त्यांतील **सत्ता** आणि **चैतन्य** या दोन गुणांप्रमाणेंच **आनंद** हा तिसरा गुणही व्यक्त होऊं लागतो. या ठिकाणीं कोणी अशीही शंका घेईल कीं, जर जिवाचे ठिकाणीं बुद्धितत्त्व नसतें, तर त्या वृक्षांतील **आनंद** हा गुण कसा बाहेर पडला असता ? याचें उत्तर असें आहे कीं, जेव्हां एकादा प्राणी कडक उष्णाच्या तापानें, अत्यंत व्याकुल होतो, त्या वेळीं त्याचें बुद्धितत्त्व त्याचे जवळच असतें; पण वृक्षाच्या आश्रयावांचून क्लेशनिवृत्ति व आनंदप्राप्ति होत नाहीं; वृक्षाच्या आंगची टवटवी आणि सुशोभितपणा, हीं चिन्हें त्याच्यांत स्वतःसिद्ध आनंद असल्याचीं द्योतक आहेत. यावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, वृक्षांत **सत्–चित्** या दोन गुणांप्रमाणेंच तिसरा गुण **आनंद**–ही आहे. या नियमावरून, प्रत्येक पदार्थमात्रांत परमात्म्याचे **सच्चिदानंद** हे तिन्ही गुण ओतप्रोत भरल्यानें, ही सर्व सृष्टि **सच्चिदानंदघन** परमात्मस्वरूपच आहे, ह्मणजे तो **परमात्माच** सृष्टिरूपानें व्यक्त झाला आहे; असें ह्मणण्यास कोणताच बाध नाहीं; आणि याच उपाधीच्या योगानें त्याचे गुण व्यक्त होऊं लागल्यामुळें, तो **परमात्मा** सगुणरूपी ह्मणवूं लागला, आणि अखिल **सृष्टि** हेंच त्याचें **सगुणरूप**

होय; व ही सृष्टि ज्या क्रमानें निर्माण झाली त्याचे उलट क्रमानें पुन्हां लय पावली, ह्मणजे तो **परमात्मा** स्वतःसिद्ध **निर्गुणच** आहे; जोंपावेतों तो सगुणरूपी आहे, तोंपर्यंतच त्याचें स्वरूप श्रुतिस्मृत्यादिक वर्णन करूं शकतात, आणि त्याच्या निर्गुणस्वरूपीं पंगू होऊन बसतात. कांहींच बोलतां येत नाहीं, तेव्हां गुणाच्या निषेधरूपानेंच निर्गुणस्वरूप उमजविण्याचा **श्रुति** प्रयत्न करूं लागते. हिच्याच साह्यानें, व बुद्धिच्या सारासारविचारशक्तीनें, त्या **परमात्म्याच्या** निर्गुण स्वरूपाचा जो अनुभव होतो, तो वाणीनें वर्णन होऊं शकत नाहीं; आणि ह्मणूनच तो स्वसंवेद्य राहतो. व्यवहारांतच पहा कीं, ज्या मनुष्याला जन्मादारभ्य शर्करेचा अथवा कोणत्याही प्रकारच्या मिष्ट पदार्थाचा स्वाद ठाऊक नसेल, अशाला शर्करेच्या स्वादाचा कोणत्याही प्रकारच्या वाक्यांनीं बोध होऊं शकणार नाहीं; शर्कराच त्याच्या मुखांत घातली पाहिजे, तरच त्याला गोडीचा अनुभव कळणार आहे; आणि याच कारणामुळें सुलभ रीतीनें बोध होण्याकरितांच श्रुतीला तीन गुणांचें पार्थक्य दाखवावें लागलें. वस्तुतः **'एकमेवाद्वयं ब्रह्म'** अशा परमात्मस्वरूपीं तीन गुणांच्या कल्पनेची कांहींच जरूर नाहीं; जसा तो एक अद्वय, तसाच त्याचा गुणही एकच ह्मणजे **आनंद** हाच असला पाहिजे; **सत्–चित्** हे पृथक् गुण ह्मणण्याची कांहींच आवश्यकता नाहीं; **आनंद** हा एक शब्द उच्चारतांच **सत्–चित्** हे त्याच्या अंतर्गत येतातच. कारण **आनंद** यांत जी स्फूर्ति ह्मणजे अनु-

भव होतो, हाच त्याच्या अंतर्गत असलेला **चैतन्य-भाव,** आणि कधींच खंडित न होतां सदैव एक रूपानें राहणें, हाच त्याच्या अंतर्गत **सद्भाव;** असा **सत्-चित्**-स्वभावरूपच **आनंद** असल्यानें तीन गुण न ह्मणतां एकच **परमात्मा** व त्याचा एकच **आनंद** गुण व त्यापासून अखिल **सृष्टि** केवळ आनंदरूपच झाली, व आनंदरूपच आहे, व आनंदांतच लीन होईल; आनंदाव्यतिरिक्त कोठेंच कांहीं नाहीं, असा श्रुतीचा परमसिद्धांत आहे. या सिद्धांतावरून, **परमात्म्याचे** गुण सृष्टींत कसे व्यापिले आहेत, व कसे व्यक्त होतात, हें ह्मणण्यापेक्षां, **परमात्मा** कसा व्यापला व कसा व्यक्त होतो असेंच ह्मटलें पाहिजे; कारण, **गुण** या शब्दाचा स्वभावच व्यक्त होणें, हा आहे, व व्यक्तता गुणावांचून होणें शक्य नाहीं. कोणत्याही व्यक्तीच्या गुणावरूनच स्वभावाचा बोध होत असतो. किंबहुना गुणानुरूपच स्वभाव असतो, ह्मणजे स्वभाव आणि गुण यांचा अभेद ह्मटला तरी चालेल; हा अभेद झाला ह्मणजे व्यक्ति आणि स्वभाव यांचाही अभेदच सिद्ध होतो; अर्थात स्वभावावरूनच व्यक्तीच्या गुणांचा बोध होतो, आणि गुणावरूनच व्यक्तीचा यथार्थबोध होतो. गुणांवाचून पूर्ण बोध होणार नाहीं. परमात्म्यास गुणांची उपाधि आहे. ह्मणूनच तो व्यक्त होतो, ह्मणजे व्यक्त होण्याकरितांच गुणांच्या उपाधीची जरूर आहे, पेक्षां त्याच्या स्वतःसिद्धतेस गुणांची मुळींच जरूर नाहीं; ह्मणूनच तो **परमात्मा** निर्गुण, निर्विकार, निःसंग, आणि स्वयंबोध-

स्वरूप आहे, हें श्रुतीचें परमगुह्य रहस्य आहे. याप्रमाणें **परमात्म्याच्या** सगुणनिर्गुणतेचा विचार झाला. आतां तो सृष्टींत ओतप्रोतभावानें कसा भरला, याचा विचार करूं:—

**व्यापकता** दोन प्रकारची आहे; एक **सापेक्ष**, आणि दुसरी **निरपेक्ष.** व्यापण्यास जसजशी जागा अथवा वस्तू मिळत जाईल, तसतशी व्यापित जाऊन वस्तूची आणि जागेची सीमा संपली ह्मणजे व्यापण्याची शक्ति बंद पडते, आणि व्यापिलेल्या वस्तुमात्रांतच जी सदोदित रहाते तिला **सापेक्ष** व्यापकता ह्मणावी; व व्यापण्याकरितां दुसरी वस्तू अथवा जागा असो वा नसो, अखिल पदार्थमात्रास अंतर्बाह्य ओतप्रोतभावानें व्यापून उरणारी, आणि कधींच कुंठित न होणारी अथवा न सरणारी जी व्यापकता ती **निरपेक्ष** व्यापकता ह्मणावी; उदाहरणार्थ, सूर्याचा प्रकाश अखिल जगास प्रकाशित करतो खरा, परंतु तळघरांत अथवा विवरांत प्रकाशाच्या गतीचा रोध होतो, आणि ती जागा अंधारानें व्याप्त राहते. अर्थात प्रकाशाला व्यापण्याकरितां अकुंठित अवकाशाची अपेक्षा असल्यानें, त्याची (प्रकाशाची) **सापेक्ष** व्यापकता झाली. आकाशाला ही गोष्ट लागूं नाहीं; त्याच्या व्यापकतेचा कोणत्याच प्रकारानें आणि कशानेंही रोध होणें अशक्य आहे; कारण सकल वस्तु त्याच्या आंत निर्माण होतात व तें (आकाश) त्या वस्तूंच्या आंतबाहेर व्यापक स्वभावानें भरलेलेंच असतें. या ठिकाणीं कदाचित् कोणी अशी शंका काढील कीं, अत्यंत घनी-

भूत द्रव्यांत ह्म० तोफेच्या ढाळीव लोखंडी गोळ्यांत आकाश कसें प्रवेश करूं शकेल ? याचें उत्तर असें आहे कीं, गोळा निर्माण होण्यापूर्वीं, आकाश तर आहेच, व त्या आकाशांतच गोळाही तयार झाला, त्या गोळ्यावर घणाचे प्रहार केल्यास वर पोंचे पडतील, याचें कारण काय ? तर लोखंडाच्या सूक्ष्म परमाणूंनीं स्वतःच्या एकीकरणार्थ आकाशापासून जागा घेऊन गोळारूप होऊन बसले, ते एकमेकांस इतके चिकटले कीं, दुसऱ्या पदार्थांच्या अति सूक्ष्म परमाणूंसही ते आंत येऊं देत नाहींत; पण आकाश मात्र त्यांच्यांत शिरल्यावांचून राहत नाहीं; ह्मणूनच ते परमाणू जितके आंत परस्पर चिकटले होते, तितकेच ते गोळ्यावर घणाचा प्रहार बसतांच जास्त एकमेकांवर चेंदले जाऊन आंतील आकाश जास्त आडलें गेलें; आणि त्यामुळें गोळ्यावर पोंचा दिसूं लागला. एवंच आकाशाचा कोणत्याच प्रकारानें व कोणाच्यानेंही रोध होऊं शकत नाहीं; त्याला वस्तू व्यापण्याकरितां असो वा नसो, तें स्वयम् व्यापकरूपच असल्यानें त्याची **निरपेक्ष** व्यापकता जाणावी.

यावरून, आतां ही गोष्ट लक्षांत आणली पाहिजे कीं, जिच्या अंगीं **सापेक्ष** व्यापकता असेल, ह्मणजे व्याप्य वस्तूमात्रांतच जी राहूं शकेल, व जिला निराधार राहातांच येत नाहीं, ती शक्ति लहान, कुंठित होणारी व सांत अशीच समजली पाहिजे; आणि जी व्याप्य वस्तु कितीही आल्या तरी त्यांना पोटांत गिळून स्वतः रिकामीच आहे, व जिच्या अस्तित्वास व्याप्य वस्तूची

गरजच नाहीं, उलट वस्तूमात्रालाच अस्तित्वांत येण्याकरितां जिचा आश्रय करावा लागतो, ती शक्ति निरपेक्ष, व्यापक, स्वतःसिद्ध, अकुंठित रहाणारी, अनंत आणि मोठी समजली पाहिजे. हीं सर्व लक्षणें, **ब्रह्माच्या** स्वयंव्यापकपणांत असल्यानें त्याची **निरपेक्ष व्यापकता** स्वयंसिद्ध आहे असेंच ह्मटलें पाहिजे. आतां आपण आणखी थोडासा सूक्ष्म विचार करून पाहूं, ह्मणजे आपल्याला समजून येईल कीं, मोठ्या वस्तूच्या पोटांत, नेहमीं लहान वस्तूचा अंतर्भाव होत असतो. या नियमाप्रमाणें, अपेक्षिकव्यापकतेनें, वस्तुमात्राच्या सीमेपर्यंत जागा अडविली व पुढें व्यापण्यास वस्तु नसल्यामुळें कुंठित झाली. या कुंठित झालेल्या सीमेपासून निरपेक्ष व्यापकतेचा भाग पुढें किती रिकामा आहे याचा अंतच नाहीं, अर्थांत ही निरपेक्षव्यापकता अनंत जाहली व यावरून निरपेक्ष व्यापकतेंत अपेक्षिक व्यापकतेचा अंतर्भाव झाला; एवढेंच नव्हे, तर अपेक्षिक या शब्दाच्या उपाधीनेंच निरपेक्षिक या शब्दाची उत्पत्ति झाली असेंच ह्मटलें पाहिजे. याला एक व्यावहारिक दृष्टांत आपण घेऊं. पहा कीं, एखादें उत्तम स्वच्छ वस्त्र भूमीवर पसरून ठेविलें आणि त्यावर एखादे ठिकाणीं जर एकच संध्येच्या पळीभर पाणी टाकलें, तर त्या वस्त्राची थोडीशी जागा एकदम भिजून मग हळू हळू तें जल पसरत जाऊन आपल्या शक्तीप्रमाणें त्या वस्त्राचा भाग ओला करवेल तितका करून नंतर कुंठित होतें. यावेळीं आपण ह्मणतों कीं, हें वस्त्र इतकें

भिजलें, बाकीचें कोरडें आहे. या ठिकाणीं कोरडेपणा हा वस्त्राचा भाग किंवा गुण नव्हे, तर त्या ओलेपणामुळेंच हा कोरडेपणा आला, एरवीं वस्त्र आहे तसेंच आहे. केवळ त्या जलबिंदूनेंच आपल्या संचारार्थ वस्त्रापासून जागा घेऊन आपलें ओलेपण त्या वस्त्राच्या डोक्यावर बसवून जें कोरडेपण नव्हतें तेंही आणखी लादण्यास कसर केली नाहीं. हें जरी झालें, तथापि त्या वस्त्रानें त्या ओलेपणाचा अथवा कोरडेपणाचा स्वीकार न केल्यामुळें कांहीं कालानें तो जलबिंदु वाळून जातांच त्यावरचें तें अगांतुकरूपानें आलेलें ओलेपणही नाहींसें झालें. आणि हें ओलेंपण नाहींसें होतांच, कोरडेपण हाही शब्द चालता झाला. वास्तविकरीत्या तें वस्त्र पूर्वीं होतें तसेंच आतांही आहे. याचप्रमाणें अनंत कोटी ब्रह्मांडांची सृष्टिरचना, त्या **परब्रह्माच्या** पोटांतच निर्माण होऊन त्याच्या स्वतःसिद्ध ओतप्रोत भावांत हा अंतर्बाह्यपणाचा भेद उत्पन्न केला; ह्मणजे आपण व्याप्यता घेऊन, **ब्रह्मावर** व्यापकपणा लादला. आपण त्याहून लहान होऊन, त्यास ( ब्रह्मास ) मोठेपण आणलें. आपण सुखसंचारानें व्यवहार करण्याकरितां जागा अडवून, आपलेकडे सापेक्षिक व्यापकता घेतली व निरपेक्षिक व्यापकता ह्मणजे पुरून **उरणेंपणा** ब्रह्मावर आणला. आपण सदैव असावें, हवें तसें करावें, व केल्याचा आनंद भोगावा, या हेतूनें आपल्या उपाधी त्यास लावून **सच्चिदानंदरूप** गुणी त्याला ठरविलें. इतकी प्रचंड खटपट जरी या सृष्टीनें केली, तथापि सर्वांस पुरून उरणारें असेंच तें **पूर्णब्रह्म**

असल्यामुळें तें सृष्टीच्या तडाक्यांत कां सांपडणारें आहे? तें तर स्वतःसिद्ध स्वरूपच राहिलें. सृष्टि मात्र आपल्या मर्यादेपर्यंत वाटेल तशी नाचली, आणि शेवटीं आल्या वाटेनें परत जाऊन, पुनः लीन होतांच ब्रह्माचा अंतर्बाह्यपणा गेला. व्याप्य गेल्यानें व्यापकपणाही गेला, मग अपेक्षिक व निरपेक्षिक व्यापकता कोठें राहिली? **पुरणेंपण** जातांच त्याच्या बरोबर **उरणेंपण**ही गेलें. तसेंच, **सत्**, **चित्** आणि **आनंद** हे गुण व्यक्त होण्याच्या उपाधी नाहींशा होतांच तें निर्गुण स्वरूप **परब्रह्म** स्वतःसिद्ध आहे तसेंच आहे, त्याला कोणत्याही प्रकारच्या विकाराचा स्पर्श सुद्धां होऊं शकला नाहीं; कारण जर तें कांहीं अपेक्षेनें सृष्टींत आलें असतें, तर मात्र विकारवश झालें असतें; पण सृष्टीच त्याच्यांत व्यक्त झाल्यामुळें तें ब्रह्म सृष्टींत आल्यासारखें भासूं लागलें, आणि ह्मणूनच **श्रुतीनें** ब्रह्माची निरपेक्ष व्यापकता आहे असाच सिद्धांत केला. असो.

यावरून आतां हें दिसून येईल कीं, **ब्रह्म** हें निर्गुण, निर्विकार, निःसंग, स्वसंवेद्य, बोधरूप आणि निरुपाधिक आहे; असा बोध करून दाखविण्याकरितांच **श्रुतीनें**, त्याला निषेधक गुणांचीं विशेषणें दिलीं; परंतु वास्तविकरीत्या ब्रह्माच्या ठिकाणीं वाणीचा अथवा शब्दाचा प्रवेशच होऊं शकत नाहीं. या ठिकाणीं कोणी अशी एक जबरदस्त शंका काढतील कीं, जें निर्गुण व मनवाणींला अगोचर ह्मणजे कोणत्याही प्रमाणानें उपलब्ध होऊं शकतच नाहीं, अशा **तत्त्वास** अस्तित्वांत आणणें ह्मणजे वंध्यापुत्रास जिवंत करण्यासारखी को-

रडी थाप देणें होय; या पलीकडे जास्त कांहीं नाहीं; व यांत कांहीं तथ्यांशही नाहीं. या प्रचंड शंकेचें समाधान असें आहे कीं, आपण एखाद्या माडीवर शांतपणानें कांहीं विचार करीत बसलों असतां अथवा शांत अंतःकरणानें स्वस्थ बसलों असतां एकदम कोणी दुसऱ्यानें खालच्या मजल्यांतून हाक मारून विचारलें कीं, **वर माडीवर कोणी आहे काय?** याला काय उत्तर द्याल? तर **मी आहें.** यांत बारीक विचार करून पहा कीं, दुसऱ्यानें आपलें अस्तित्वाविषयीं प्रश्न केल्यावांचून आपल्या ठिकाणीं आपण **मी आहें, मी आहें** असें चिंतन करीत होतों काय? किंवा उत्तर देतांना कांहीं विचार करावा लागला होता काय? नाहीं. प्रश्नाबरोबरच उत्तर दिलें ना? कीं, **मी आहें.** किंवा कोणी विचारलें कीं, कांहो, अमुक वस्तु तुमच्या जवळ आहे काय? होय–नाहीं–थांबा–पाहून सांगतों. अशींच कांहीं तरी उत्तरें देऊं. त्याचप्रमाणें **मी आहें** हें उत्तर देतांना कांहीं विचार पडला काय? नाहीं. तो कां? तर स्वतःच्या अस्तित्वाची कधींच विस्मृति नाहीं ह्मणून. कधींच विस्मृति न पडणें ह्मणजे काय? तर सदैव अस्तित्व असणें हेंच होय. असें जें सदैव अस्तित्व आपलें आपल्याला स्फुरत असतें, तेंच अस्तित्व **मी आहें** या शब्दानें दुसऱ्यास बोध होण्याकरितां उत्तराच्या रूपानें सांगितलें; यावरून काय झालें कीं, खालून हांक मारणारास वरतीं कोणाचें तरी **अस्तित्व** आहे असा बोध झाला–ह्मणजे माडी रिकामी नाहीं; कोणी तरी वर आहे, इतकें वाटलें–आतां

या ठिकाणीं थोडासा विचार करा कीं, खालून विचारणाराच्या व वरून उत्तर देणाराच्या मध्यें **शब्द** आहे, व परस्परांच्या अस्तित्वाचें ज्ञान परस्परांस शब्दांनींच झालें, आणि **शब्द** कोणाचा असावा ह्मणून दोघेही आपल्या ठिकाणीं विचार करीत आहेत, व कोण आहे पाहूं तर खरें, अशी जिज्ञासा जेव्हां त्या **शब्दानें** झाली, तेव्हां हांक मारणारा त्या **शब्दाला** ओलांडून पलीकडे जातांच उत्तर देणारा साक्षात् दिसला ह्मणजे त्याचा प्रत्यक्ष अनुभव होतांच, मोठा आनंद होऊन आहा! काय **माधवराव**? आपण आहांत काय? फार चांगलें झालें. वाः **जीवनराव**, काय गोष्ट आहे! एकूण बहुत दिवस झाले म्हणून आपण आमच्या **शब्दा**ची सुद्धां ओळख विसरलांत ना?

**जीव०**—छे, छे, तसें नाहीं.

**माधव०**—नाहीं ह्मणून काय होतें, आपण मला विसरलांत व माझ्या शब्दालाही विसरलांत! कारण जर शब्दाची आपल्याला ओळख रहाती तर **मी आहें** हा माझा शब्द कानीं पडतांच आपल्यास आनंद झाला असता! असो. आपण माझ्या **शब्दाच्या** जिज्ञासेनें तरी वर येऊन मला भेटलांत हें फार चांगलें केलेंत!

**जीव०**—असें कां ह्मणतां बरें? आपण आणि मी दोन कां आहोंत? अहो आपण जन्माचे स्नेहीना?

**माधव०**—तें सर्व खरें, पण आपण **शब्द** ओलांडून अलीकडे आलांत, म्हणूनच हा परस्पर आनंद झाला; नाहीं तर कोणी तरी हांकेचें उत्तर देत आहे

असें समजून परतच गेलां असतां, मग पुन्हां जेव्हां भेट होती तेव्हां होती ! असो. मी प्रकृत विषय सोडून बहकलों तर नाहींना ? नाहीं, जवळच आहें. वाचकहो, मीं काय सांगितलें, हें तुमच्या लक्षांत आलेंना पण ? ही वंध्यापुत्र सजीव करण्याची कोरडी थाप नव्हे बरें ! दुसऱ्यानें प्रश्न केल्यावांचून आपलें **अस्तित्व** वाणीनें उच्चारण्याची आपल्यास आवश्यकता नसते, कारण तें आपलें आपल्यांत स्फुरतच असतें,–असेंही म्हणण्याची कांहीं जरूर नाहीं,–कारण, तें स्वतःसिद्ध आहेच आहे; निद्रेंत सुद्धां त्याची विस्मृति पडत नाहीं; कारण, जागा झालेला मनुष्य **मी निद्रेंत होतों** असें सांगतों, यावरून निद्रेंत सुद्धां आपलें अस्तित्व सिद्ध होतें, दुसऱ्यास बोध होण्याकरितां आपल्या वाणीचा शब्दरूपी व्यापार आपण करतों मात्र, वस्तुतः आपण त्या शब्दाच्या अलीकडेच आहोंत. याचप्रमाणें, स्वयं आनंदघन **परमात्मा**, स्वस्वरूपीं लीन असतो, निर्गुण असतो, अव्यक्त असतो आणि स्वयंबोध असतो; परंतु हा **जीव** जेव्हां, आपल्या सभोंवतीं असलेल्या जगद्वैचित्र्याची अतर्क्य रचना पाहून, चकित व कुंठित होतो, तेव्हां हें काय अद्भुत प्रकरण आहे ? केवढी ही अवाढव्य सृष्टि ? काय ही हिची अचिंत्य रचना ? ही निर्माण तरी कोणी केली ? अथवा कशी झाली ? आणि हें आहे तरी काय ? अशा प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात. (असले प्रश्न सारासारविचारशक्तीनेंच उत्पन्न होतात. आणि ही शक्ति परमात्म्यानें आपल्या स्वरूपाचा बोध व्हावा ह्म-

णून मनुष्यालाच फक्त दिली आहे. ) त्या **सर्वांतरात्मब्रह्मानें** स्वतःच्या साक्षात् **वेदवाणीनें** या सर्व प्रश्नांचें एकच उत्तर दिलें आहे. तें कोणतें तर **मी आहें** हेंच. या ठिकाणीं सूज्ञ वाचक विचार करून पाहतील, तर त्यांना एवढें खास कळेल कीं, जितके प्रश्न वर केले आहेत, त्या सर्वांचीं उत्तरें या एकाच उत्तरांत आलीं. पुढें जसजशी जिज्ञासा वाढत गेली, तसतशीं **श्रुतीनें**ही समाधानकारक अशीं सविस्तर उत्तरें दिलीं आहेत. तात्पर्य काय कीं, **परमात्मा स्वयंसिद्ध** आहे तसाच आहे. **असा** किंवा **तसा** हें त्याचे ठिकाणीं कांहींच म्हणतां येत नाहीं. शब्दाची उपाधि लागली तेव्हांच तो दुसऱ्यास व्यक्त झाला. अर्थात त्याला व्यक्त होण्यास लावण्याकरितां दुसरा कोणी तरी कारण झाला. या ठिकाणीं मार्मिक वाचक असा प्रश्न करतील कीं, **स्वयमव्यक्तस्वरूप** परमात्म्यानें आपली वाणी जी **श्रुति** हिच्या योगानें आपली व्यक्तता प्रकट केली खरी, पण प्रकट होण्यास लावणारा दुसरा कोण ? हा प्रश्न खरोखर मोठा महत्त्वाचा व गूढ आहे; कारण, व्यवहारांत आपण नेहमीं असें पहातों कीं, अति श्रेष्ठ पदवीच्या मनुष्याशीं दळणवळण ठेवण्याकरितां त्याच्याच जोडीचा व योग्यतेचा दुसरा मनुष्य लागतो. सार्वभौमास सार्वभौम आणि राजास राजाच पाहिजे; इतराचें काम नाहीं. सारांश श्रेष्ठपणाच्या समानतेवांचून त्यांचा परस्परसंबंध बरोबर जुळावयाचाच नाहीं. तेव्हां, जगत्पतीच्या जोडीस दुसरा तर कोणीच नाहीं; तो तर स्वतंत्र आणि स्वेच्छाचारी

आहे. त्याला जागचें उत्थान देण्याला योग्य असा दुसरा त्याच्या बरोबरीचा कोण आहे ? त्याचें उत्थान केवळ त्याच्या **इच्छेनेंच** होणार आहे. आतां या ठिकाणीं आणखी थोडासा सूक्ष्म विचार केला असतां, एवढी गोष्ट ध्यानांत येईल कीं, याच ठिकाणीं इच्छारूप द्वंद्वाचें बीज निर्माण जाहलें. आपल्याला कोणी विचारलें कीं, काहो तुह्मीं हें असें कां केलें ? याचें उत्तर आपण काय देऊं ? **माझी इच्छा. इच्छा** उत्पन्न होतांच दुसरेपणा आला. **मी** आणि **माझी** हें एक छानदार अव्यक्त जोडपें झालें असें ह्मटलें असतां चालेल. अव्यक्त कसें ? तर **मीपणा**चा दुसऱ्यास बोध होण्याकरितां जसा **शब्द** उच्चारावा लागला, तसेंच **इच्छा** व्यक्त होण्याकरितां कांहीं तरी क्रियाच करावी लागेल, त्यावांचून दुसऱ्यास कधींही बोध होणार नाहीं. **कोण आहे** ? हा प्रश्न होतांच **मी आहें** हें जें उत्तर मिळालें यांत दुसऱ्यास आपला बोध व्हावा, अशी आपली **इच्छा** आहे, तेव्हांच आपण **मी आहें** हे शब्द उच्चारण्याची क्रिया केली. आतां, पहा कीं, या एकाच वाक्यांत दोन्ही दृष्टांतांचा समावेश झाला. चोर चोरी करीत असतांना जर त्याला कोणी प्रश्न करील कीं, **कायरे, कोण आहे तिकडे** ? असा प्रश्न होतांच त्या चोरास व्यक्त होण्याची इच्छा नसल्यामुळें उत्तर न देतां तो लपण्याची क्रिया करूं लागतो. अर्थात इच्छेवांचून क्रिया होत नाहीं; व क्रियेवांचून प्रकटता येत नाहीं. कर्त्यावांचून क्रिया होत नाहीं; व इच्छेवांचून कर्ता होत नाहीं; आणि **अहं** ह्म० **मीप-**

णावांचून इच्छा संभवत नाहीं. आतां यांत काय सिद्ध झालें कीं, प्रथम **अहंपण** आलें, पुढें **इच्छा** आली, नंतर इच्छेप्रमाणें क्रिया घडतांच **व्यक्तता** जाहली; असा क्रम चालला. आतां **अहंपण** जेथें स्फुरण पावलें, तो **मूलाधार पुरुष;** ह्मणजे **परब्रह्म परमात्मा** आणि त्याच्यांत स्फुरण पावलेली जी त्याची **इच्छा** तीच **प्रकृति मूळमाया** आणि **अदिशक्ति.** हा उभयतांचा संयोग होतांच प्रथम क्रिया नामरूपात्मक झाली. असें हें आमचें **पुरुष–प्रकृति–नाम** आणि **रूप** मिळून एक निर्गुण ह्म० **अव्यक्तचतुष्टय** तयार झालें. यांत **पुरुष** परमात्म्याविषयींच्या निर्गुणतेचा व अव्यक्ततेचा विचार पूर्वीच झाला आहे, तो आमच्या मार्मिक वाचकांच्या ध्यानांत असेलच. आतां, आपण **प्रकृति–मूळमाये**विषयींचा विचार करूं.

**परब्रह्म** निर्गुण व अव्यक्त आहे, परंतु उपाधीच्या योगानें त्याचें **सत्, चित्** आणि **आनंद** हे गुण व्यक्त होतात; ह्मणजे त्यास व्यक्त होण्याची इच्छा होतांच या तीन गुणरूपानेंच आपण व्यक्त झाला. अर्थात् इच्छेनें त्याला व्यक्त होण्यास लाविलें. ही **इच्छा** जावत्कालपर्यंत उत्पन्न झाली नव्हती, तावत्कालपर्यंत आपल्या आधार **पुरुषांत** लीन होती; ह्मणजे अभिन्न होती; अभिन्न म्ह० **पुरुषरूपच** होती; किंबहुना व्यक्त होण्यापूर्वी **पुरुष** हें नांवच नव्हतें. तिच्या व्यक्ततेमुळेंच **पुरुष** आणि **प्रकृति** हीं नांवें आलीं. अथवा पुरुषच प्रकृतिरूप झाला ह्म० त्यानेंच हीं दोन्ही रूपें धारण केलीं. एखादा **नट** जेव्हां स्त्री-

वेष धारण करून रंगभूमीवर खेळ करतो, तेव्हां प्रेक्षक त्या वरपांगी वेषास भुलतो व क्वचित् विकारवशहीं होतो. पण त्यांतल्या त्यांत जो सूज्ञ असतो, तो ही स्त्री नव्हे, पुरुष आहे, असें समजून मोह पावत नाहीं; व त्या नटासही मी स्त्री आहें असें विसरूनसुद्धां वाटत नाहीं. येथें स्त्रीपण दिसण्याची उपाधि केवळ केश, वस्त्र व भूषणादिक अलंकार आहेत; पण हींच भूषणें काढून पृथक् ठेविलीं ह्मणजे त्या नुसत्या भूषणास कोणी स्त्री ह्मणेल काय ? कधींच ह्मणणार नाहीं, आणि नटासही कोणी स्त्री ह्मणणार नाहीं; तो आपल्या इच्छेनें जेव्हां तीं भूषणें घालील, तेव्हांच तो स्त्री दिसूं लागेल. अर्थात पुरुषवेषापेक्षां स्त्रीवेषाचीं भूषणें अगदींच भिन्न स्वभावाचीं झालीं; व भिन्न स्वभावाचीं भूषणें नटाच्या इच्छेनेंच झालीं व तीं त्यानें खेळाकरितांच केलीं, कारण त्यांवाचून रूपांतर होतच नाहीं, व रूपांतर करण्याची जी इच्छा तिच्यांत भिन्न स्वभावाचे गुण व कल्पना आल्यावांचून रूपांतर करण्याचीं भूषणेंही होणार नाहींत. रूपांतराचें कारण आलें ह्मणूनच भिन्न स्वभावाची ही इच्छा झाली, ह्म० इच्छेचा स्वभावच भिन्न झाला; अर्थात इच्छा ही भिन्न गुणवती झाली; अशा प्रकारची जी ही इच्छा तिनें भिन्न गुण आपल्या अंगीं आणून ती स्वतंत्र झाली व भिन्न स्वभावाचे दागिने घालून, नटास पुरुषाचा स्त्री करून खेळ चालविला. कांहीं वेळानें नट कंटाळून खेळ आटोपूं लागतो, तोंच प्रेक्षक ह्मणूं लागले कीं, थांबा ! आह्मीं पैसे दिले आहेत, आमची इच्छा तृप्त झाल्यावांचून खेळ

आटोपतां कामा नये. हें ऐकल्याबरोबर नटाची जी इच्छा **स्वतंत्र** होती ती प्रेक्षकांच्या पैशांच्या ताब्यांत गेली, मग खेळ कसा आटोपूं शकतो ? प्रेक्षक तरी पुरे शौकीनच, उत्तम खेळ पहातांच पैशाची कशी धार लावली, आणि लोकांची दाटीही होऊं लागली. मग काय विचारतां ! हा खेळ केव्हां संपतो अशी त्या नटाची पुष्कळ इच्छा झाली; पण ती याच्या स्वाधीन न राहिल्यानें, व प्रेक्षक आणि पैसे यांची धार न तुटल्यानें, व नटही लोकोत्तर असल्यानें, खेळ अखंडचाच कायम झाला. यावरील उदाहरणावरून इतकेंच तात्पर्य घ्यावयाचें कीं, विरुद्ध स्वभावाची **इच्छा कारणा**मुळें झाली ह्मणजे इच्छेंत विरुद्ध स्वभाव येण्यास कांहीं तरी कारण झालें; किंबहुना कारणांनींच इच्छा उत्पन्न झाली. इच्छेला मूलाधार **मीपण** आहे हें नुक्तेंच वर सांगितलें आहे. जोंपर्यंत केवळ **मीपण** आहे, तोंपर्यंत शांतता आहे. **इच्छा** उत्पन्न होतांच चांचल्य आलें, आणि कारणामुळेंच इच्छा आली. अर्थात, कारणांनींच शांत अशा **मीपणा**स चंचल **इच्छारूप** दिलें ह्मणजे कारणांनींच **मीपण** इच्छारूप झालें. येथें **मी** व **इच्छा** हीं एकच झालीं. कांहींच भेद राहिला नाहीं; अर्थात इच्छेला **मीपणा**हून भिन्न ह्मणतांच येत नाहीं. **मीपणच इच्छारूप** झालें ह्मणूनच दोघांचें ऐक्य आहे. **कारणा**मुळें इच्छेंत **मीपणा**हून विरुद्ध गुण आल्यानें एक ह्मणतां येत नाहीं, ह्मणून भिन्नता आहे. अशी

जी ही **भिन्नाभिन्न**रूपिणी **इच्छा** मीपणांत **स्फुरण** पावली, ती ध्यानांत असेलच. **मीपण** जेथें स्फुरण पावलें तो परपुरुष **परमात्मा** आणि त्याच्या ठिकाणीं स्फुरण पावलेली जी **इच्छा** तीच मूलप्रकृति अथवा **मूलमाया**. हिच्या अंगीं **पुरुषा**पेक्षां भिन्न स्वभावाचे गुण कसे आले हें वर निर्दिष्ट केलेंच आहे. आतां या गुणांच्या व्यक्ताव्यक्ततेचा आणि विरुद्ध स्वभावाचा विचार करून नंतर निरीच्छ पुरुषास इच्छा होण्याचें काय कारण झालें, या गोष्टीचा विचार करूं.

मूळ **परमात्मा** स्वयंसिद्ध होता तसा होताच, **पण** उपाधीच्या योगानें त्याचे **सत्, चित्** आणि **आनंद** हे गुण व्यक्त झाले. तसेंच **मूलमायेचेही सत्व, रज** आणि **तम** हे तीन गुण क्रियेच्या योगानें व्यक्त झाले. या गुणांच्या क्रियेपासून निर्माण झालेल्या पदार्थरूप उपाधी परमात्म्यास लागून, त्याचे गुण व्यक्त झाले ह्म० झाल्यासारखे नुसते भासूं लागले. मायेनें **तमोगुणा**पासून, चलनवलनशून्य असे अखिल जड पदार्थ निर्माण करतांच, त्यांत परमात्म्याचा **सत्** ह्म० अस्तित्व हा गुण प्रकट झाला. दुसरा **रजोगुण**, यापासून चलनवलनसमर्थ अखिल पदार्थ निर्माण करतांच, त्यांत परमात्म्याचा **चैतन्य** गुण व्यक्त होऊं लागला; आणि तिसरा **सत्वगुण**, यापासून **बुद्धितत्त्व** उत्पन्न होतांच परमात्म्याच्या **आनंद** गुणाची स्फूर्ति होऊं लागली. आतां याठिकाणीं थोडासा विचार केला पाहिजे, तो असा कीं, **मायेनें** क्रियेची उपाधि स्वीकारून पदार्थ निर्माण केल्यावांचून तिचे **सत्व, रज**

आणि **तम** हे गुण व्यक्त होत नाहींत; ह्मणजे काय कीं, मायेला व्यक्त होणें असल्यास गुणानुरूपच तिला क्रिया केली पाहिजे; आणि व्यक्त होणें नसल्यास क्रिया न करितां तिला **अव्यक्तरूपानें** राहतां येतें. **परमात्म्याच्या** स्वतःसिद्धतेस जशी **सत्, चित्** आणि **आनंद** या गुणांच्या उपाधीची जरूर नाहीं, तशीच मायेलाही ब्रह्माच्या आश्रयानें अव्यक्त राहण्यास गुणानुरूप क्रियेची जरूर नाहीं. असें हें वर सांगितल्याप्रमाणें एक अपूर्व जोडपें तयार झालें. वाचकहो, हें जें अव्यक्त जोडपें तयार झालें, त्याचें एकवार सिंहावलोकन करून, सार मुद्दे ध्यानांत आणून, नंतर पुढील विचारास लागूं, **मीपण** जेथें स्फुरण पावलें **तो** पुरुष **परमात्मा** या शब्दानें बोलिला जातो. त्या **मीपणांत** स्फुरण पावलेली जी **इच्छा** ती **प्रकृति** अथवा **माया** या शब्दानें बोलिली जाते; या दोघांच्या संयोगापासून तिसरें **जग** निर्माण झालें. जग ह्म० आरंभींच जे तीन वर्ग ( जड पदार्थ, सजीव पदार्थ आणि प्राणी ) करून दाखविले याहून वेगळें कांहीं नाहीं. कारणापासून कार्याची उत्पत्ति होत असते, आणि कार्यावरून कारणाचा बोध होत असतो, असा नियम आहे. घट मातीचा होत असतो. येथें मातीं **कारणरूप** आहे, व घट **कार्यरूप** आहे. मातीपासून घट निर्माण झाला; तो दुसऱ्यानें पाहिल्यावर त्यास बोध होतो कीं, घट हा मातीचा बनतो, व तो तयार करण्यास माती लागते. येथें घट पाहिल्याबरोबर त्याचें **मूळ** जी माती तिचा बोध झाला. अर्थात घटरूप कार्यावरून

मूळकारण जी माती तिचा बोध झालाना ? बरें, आतां पुढें चला. जो घट पाहिला त्याच्या आंत बाहेर, मातीवांचून दुसरें कांहीं सांपडलें काय ? नाहीं. मग घट मातीरूपच झाला ना ? ह्म० घट ही मातीच आहेना ? अर्थात घटरूप कार्य मूळकारण मातीरूपच झालें. ह्म० कार्य हें कारणरूपच असतें, व सदैव कारणरूपच राहतें, भिन्न होत नाहीं; ह्म० काय कीं, घट मातींतून निघतो, मातीरूपच राहतो, व फुटल्यावरही पुन्हां मातीच होतो. यावरून घटांत मातीव्यतिरिक्त दुसरें काय आलें ? कांहीं नाहीं. तर मग घट हें **नांव** आणि वाटोळेपण हें **रूप**, हीं दोन्हीही त्या घटाचा कांहीं भाग किंवा अंश नसून घट निर्माण झाल्यावर आलीं, व तो घट फुटून मातींत मिसळतांच नाम आणि रूप हीं दोन्हींही गेलीं. हें नाम आणि हें रूप वरच्यावर आल्या गेल्यानें मातीच्या स्वरूपांत यत्किंचित् तरी बदल झाला काय ? मुळींच नाहीं. उलटें, घट हें नांव आणि वाटोळेपण हें रूप, या दोघांसही ती मातीच आधारभूत झाली, व स्वतः आहे तशीच आहे. तर मग आतां मृत्तिकेंतून जितके घट निर्माण व्हावयाचे असतील, तितके निर्माण होण्यापूर्वी मृत्तिकेंत अव्यक्त आहेतना ? व्यक्त झाल्यावर मृत्तिकारूपच आहेतना ? आणि फुटतील तेव्हां मृत्तिकारूपच होतील ना ? असेंच जर आहे, तर तिन्ही काळांत **घट** मृत्तिकारूपच झाला. आतां थोडा विचार करा कीं, घटाची आकृति मातींतून निघूं लागतांच, त्याच्या बरोबरच **नामरूपें** हीं निघूं लागलीं; व

तो तयार झाल्यावर त्याला व्यापून बसलीं; आणि घटाचा लय झाल्याबरोबर तींही मृत्तिकेंतच लीन झालीं. तर मग अर्थांत घट जसा मृत्तिकेंत अव्यक्त आहे, तसेंच त्याचें **नामरूप**ही मृत्तिकेंतच अव्यक्त आहे; ही गोष्ट पक्की ध्यानांत ठेवून आपण आतां मूळ पदावर येऊं.

अखिल **जग** मायेपासून निर्माण झालें, येथें मायेचा आणि जगाचा कार्यकारणभावसंबंध झाला ह्मणजे माया ही जगाचें कारण झाली; आणि जग हें मायेचें कार्य झालें; आतां आपण पूर्व दृष्टांताशीं मेळ घालूं:—पहा, **घट** मृत्तिकेंतून निर्माण झाला, मृत्तिकारूपच राहिला, आणि पुन्हां मृत्तिकेंतच लीन झाला ह्मणजे **मृत्तिका** घटरूपच आहे, यापेक्षां दुसरें काय ह्मणावयाचें आहे ? त्याचप्रमाणें **जग** हें मायेंतून निर्माण झालें, मायारूपच राहिलें, आणि पुन्हां मायेंतच लीन झालें, अर्थांत **मायाच** जगरूपानें दिसत आहे; ह्मणजे **जग** हेंच कायतें मायेचें व्यक्त स्वरूप आहे; आणि हेंच जग निर्माण होण्यापूर्वीं, ( घट जसा निर्माण होण्यापूर्वीं मृत्तिकेंत अव्यक्त ह्मणजे मृत्तिकारूपच असतो ) मायेंत अव्यक्त आहे; हेंच मायेचें अव्यक्त स्वरूप झालें. **जग** हींच **माया** आणि **माया** ह्मणजेच **जग**, फरक काय तो व्यक्ताव्यक्ततेचा मात्र, स्वरूपांत कांहींच अंतर नाहीं. दिसूं लागली ह्मणजे जग ह्मणावयाचें आणि दिसेनाशी झाली ह्मणजे माया ह्मणावयाची. आतां ती न दिसल्यानें तिचें अस्तित्व नष्ट जाहलें असें नाहीं, तर ती आपल्या कारणांतच

लीन आहे ह्मणजे कारणरूपच आहे; अर्थात **जग** आणि **माया** यांचा जसा कार्यकारणभावसंबंध झाला त्याप्रमाणेंच परमात्म्याचा आणि मायेचा कार्यकारणभावसंबंध कसा झाला तो पहा. माया व्यक्त होण्यापूर्वी परमात्म्यांत अव्यक्तरूपानें आहेच; व्यक्त झाल्यावरही परमात्मरूपच आहे, आणि लीन होतांच पुन्हां परमात्मस्वरूपच झाली. जसा घट तिन्ही कालांत मृत्तिकारूपच आहे, तशीच **माया**ही तिन्ही कालांत **परमात्मस्वरूपच** आहे. यत्किंचित्‌ही भेद नाहीं. कारण कार्य जें असतें तें सदैव कारणरूपच असतें असें वर सांगितलेंच आहे, त्याप्रमाणें आतां आपण सारा मेळ घालून पाहूं. **जग** हें मायेचें कार्य, कारणरूप ह्मणजे मायारूप झालें; आणि माया हीं परमात्म्याचें कार्य, कारणरूप ह्मणजे परमात्मस्वरूपच झाली; अतएव जग मायारूप, **माया** परमात्मरूप आणि **परमात्मा** माया-जगरूप याप्रमाणें तिघांचें ऐक्य आहे. या ऐक्यरूपाचा बोध झाल्यावर **सर्वं खल्विदं ब्रह्म** असेंच ह्मणावें लागतें. **जग, माया** आणि **परमात्मा** ही कांहीं भेदरूप प्रतीति होत नाहीं. अशी अभेदप्रतीति येण्याकरितां परमात्म्याच्या, वेदवाणीचा आणि स्वतःच्या सारासारविचारशक्तीचा जर माझे प्रिय सूज्ञ वाचक अवलंब करतील तर त्यांना आनंद झाल्यावांचून कधींच राहणार नाहीं. असो.

याठिकाणीं कोणी असाही आक्षेप घेतील कीं, हें जर सर्व एकच आहे तर **परमात्मा, माया, जग** इ० नांवें आणि व्यक्ताव्यक्त स्वरूपें होण्याचें कारण काय?

हें तर सर्व एकच आहे, असें जें आतां सांगतां त्यापेक्षां पूर्वींच सांगितलें असतें म्हणजे तुमची लिहिण्याची व आमची वाचण्याची सारी खटपट वांचली असती. त्यास मी सविनय उत्तर देतों कीं, या सर्व घडामोडीस कांहीं तरी कारण आहे व तें सांगावयाचें म्हणून वर लिहिलेंच आहे. तथापि जसा **प्रकृति, पुरुष,** आणि **जग** यांच्या व्यक्ताव्यक्ततेचा विचार झाला, तसाच त्यांचे **नामरूपाच्या** व्यक्ताव्यक्ततेचा विचार करून नंतर **कारण** सांगण्याची मी परवानगी घेतों. पूर्व दृष्टांतांत घट निर्माण होण्याची क्रिया सुरू होतांच त्याच्याच बरोबर नाम व रूप हीं दोन्ही आलीं; आणि घटाचे लयाबरोबरच गेलीं, म्ह० मृत्तिकेंतून निघालीं, आणि मृत्तिकेंतच लीन जहालीं असें दिसतें, अर्थात घट जसा निर्माण होण्यापूर्वी मृत्तिकेंत अव्यक्त आहे, तसें त्याचें नामरूपही तिच्यांतच अव्यक्त असलें पाहिजे.

आतां, **नामरूपांच्या** अव्यक्तस्थितींत प्रथम नाम, किंवा प्रथम रूप, याचा निवाडा होणें अति कठिण आहे, कारण दोघेही एकमेकांस सोडून पृथक् राहूं शकत नाहींत. रूपाश्रित नाम, व नामाश्रित रूप, असा अन्योन्याश्रय आहे; पण नामरूपाच्या व्यक्तस्थितीचा विचार केल्यास प्रथम **नाम** व नंतर **रूप** असाच व्यवहारक्रम दिसतो. कुलाल मृत्तिका घेऊन आरंभ करीत असतांना कोणी त्याला **प्रश्न** करितो कीं, तूं हें काय करितोस? तर तो ह्मणतो कीं, मी घट करतों. असें सांगून तो आपली कृति चालू करतो. यावेळीं

जरी कुलालाच्या मनांत घटाची आकृति व नाम हीं सिद्धच आहेत, तथापि तीं अव्यक्त आहेत, आणि व्यक्ततेची क्रिया सुरू करतांना, प्रथम नाम व नंतर रूप असाच क्रम म्हटला पाहिजे. असो. आतां आपण प्रथम नामाच्याच व्यक्ताव्यक्ततेचा विचार करूं. कोणत्याही आकृतीचें **नाम** ह्मटलें ह्मणजे तें वर्णरूप असतें. वर्णावांचून म्ह० अक्षरावांचून कोणतेंही **नाम** सिद्ध होत नाहीं. कोणताही **वर्ण** म्ह० अक्षराचा उच्चार स्वराच्या साहाय्यावांचून होतच नाहीं. मुख्य **स्वर–अ इ–उ–ए–ओ** हेच आहेत. **क. च. ट. त. प. इ० वर्ण** आहेत. स्वराचा उच्चार करण्याकरितां कंठांतून निघणाऱ्या ध्वनीस कांहीं विकृति करावी लागत नाहीं; पण क. च. ट. त. प. इ. वर्णोच्चार करतांना दंतोष्ठकंठताल्वादिक स्थानांत विकृति करावी लागते; स्वराच्या साहाय्यावांचून त्यांचा पृथक् उच्चार करतांच येत नाहीं, आणि अक्षराच्या उच्चाराच्या शेवटीं **स्वर** शेष रहातोच. **क. ख.** हे जरा दीर्घ म्हटले म्हणजे शेवटीं " **अ** " येतो. हाच **अ–ग घ** च्या उच्चारांत मागें पुढें आढळतो. म्हणजे काय कीं, वर्णांत स्वर अअनुस्यूत आहे, तो अक्षराच्या उच्चारांच्या संधींत व्यक्त होतो. जसें आधारावांचून कोणतीच वस्तु राहूं शकत नाहीं, तसेंच स्वरावांचून वर्णांसही राहतां येत नाहीं; ही गोष्ट वाचकांच्या ध्यानांत आलीच पाहिजे. लघु व्याकरणांतील नियम ज्यांनीं तोंडपाठ करून ध्यानांत ठेवले असतील, त्यांना तर हें सांगावयासच नको. आतां सूक्ष्म विचार करून पहा कीं, कंठांत कां-

हीं विकृति न करतां जो **स्वरोच्चार** होतो तोच स्वर विकृतींची उपाधि लागतांच **वर्णरूप** होतो; आणि स्वतःची **स्वररूपता** जाऊं देत नाहीं; म्हणूनच वर्ण स्वतंत्र उच्चारिला जात नाहीं. वाचकहो, आतां आपण आपली चालू रीति या ठिकाणीं लागूं करून पाहूं; ती अशी कीं, स्वरास वर्णरूपानें व्यक्त होण्याकरितां विकृतींची उपाधि लावून घेऊन, वर्णरूप होणें भाग पडलें, व वर्णासही अव्यक्तरूपानें स्वरांत राहतां आलें; अर्थात स्वरांचा आणि वर्णांचा कार्यकारणभावसंबंध झाला, आणि कार्य कारणरूप असतें, हें आपलें वर ठरलेंच आहे. यावरून **वर्ण** हा **स्वररूप** झाला, आणि तो अव्यक्तरूपानें स्वरांत आहेच हें सिद्ध झालें. आतां **स्वर** हा केवळ ध्वनिरूप आहे, म्ह० याचे अंगीं नादरूपता आली. आपण जड पदार्थांतून निघणारास ध्वनि म्हणतों व प्राण्यांनीं उच्चारलेल्यास **स्वर** म्हणतों, इतकाच काय तो भेद. वस्तुतः स्वरूपांत कांहीं एक अंतर नाहीं. आतां नादाची व्यापकता पहा कशी आहे ती? मनुष्यांत वर्णरूप, स्वररूप, आणि नादरूप अशा तीन प्रकारानें ध्वनि व्यक्त होतो. मनुष्यांत नादरूप कसा अशी शंका आल्यास तिचें समाधान असें आहे कीं, हातांनीं टाळी वाजविल्याबरोबर जो ध्वनि निघतो तोच नादरूप होय. मनुष्येतर प्राणीवर्गांत बहुधा स्वररूपच असतो, आणि क्वचित् शुकसारिकादि पक्षीवर्गांत वर्णरूपही आढळतो. जड पदार्थांत तर नुसता नादरूपच असतो. यावरून ध्वनि हा शब्दरूपानें आणि अक्षररूपानें,

जडचैतन्यात्मक सृष्टींत ओतप्रोत भरला आहे; परंतु केवळ विकृतिरूप उपाधीनें स्वर, वर्ण, नाद असे वेगवेगळे प्रकार दिसूं लागतात. ध्वनीचीं, **शब्द** आणि **अक्षर** अशीं दोन रूपें जरी दिसतात, तथापि कार्यकारणभावसंबंधानें अक्षर हें ध्वनिरूपच आहे; व्यक्त झालें म्हणजे अक्षर, आणि अव्यक्त राहिलें म्हणजे ध्वनि, इतकाच काय तो भेद. अखिल जडचैतन्यात्मक **सृष्टि मायें**त लीन होतांच तिचें वर्ण आणि ध्वनिरूप नाम हेंही मायेंत लीन झालें. **माया** परमात्म्यांत **लीन** होतांच तिचें ध्वनि–वर्णरूप **नाम** हेंही तिच्याबरोबर लीन झालें. परमात्म्यांत माया अव्यक्त होऊन बसली म्हणजे परमात्मरूप होऊन बसली; तसेंच ध्वनि, वर्ण आणि शब्दरूप जें **नाम** तेंही तिच्या आश्रयानें **परमात्मरूप** होऊन बसलें. असें परमात्म्याचें अव्यक्त **नाम** तें कोणतें ? तर ॐ हें होय. पहा, या नामाची कशी अद्भुत घटना झाली आहे ती ? प्रथम ॐ यांतील स्वरांचा विचार करून नंतर वर्णांचा विचार करूं.

ॐ यांत **अ. उ. म्.** अशा तीन **मात्रा** आहेत, त्यांत अ. उ. ह्या **स्वररूप** आहेत आणि म् ही **वर्ण**रूप आहे, असे दोन भाग झाले. **सृष्टींत** ही **जड–चैतन्य** असे दोन भाग आहेत. जडांतून नादरूप आणि चैतन्यांतून वर्णरूप असा ध्वनि व्यक्त होतो. शब्दासहित **सृष्टि** मायेंत लीन म्ह० अव्यक्त झाली; आणि शब्द–सृष्टिसहित **माया** परमात्म्यांत लीन म्ह० अव्यक्त झाली. यावरून **परमात्मा**. **शब्द, सृष्टि** आ-

णि **माया** अशा तीन अव्यक्त उपाधींनीं युक्त झाला. वृक्षाचें अस्तित्व जसें अव्यक्तरूपानें **बीजांत** आहे, तसेंच शब्दसृष्टिसह मायेचें अस्तित्व परमात्म्यांत आहे. अशा प्रकारचें जें मायेचें अस्तित्व हेंच **द्वैताचें बीज** होय; आणि याच बीजानें मायारहित **निर्गुण** आणि मायेसहित **सगुण** असा भेद केला. या दोघांच्या बोधक शब्दांतही स्वररूप **निर्गुण** आणि वर्णरूप **सगुण** असा भेद केल्यानें स्वररूप **परमात्मा** आणि वर्णरूप **माया** असें वाच्यवाचकरूप झालें. वाच्यवाचकांचा सदा अभेद असल्यानें, **प्रकृतिपुरुष** बोधक **स्वरवर्णरूप** ॐ हें त्याचें नांव झालें; आणि म्हणूनच ॐ **इत्येकाक्षरं ब्रह्म** या वाक्यानें श्रुति बोध करीत आहे. याप्रमाणें ॐ या शब्दाचा विचार झाला. आतां ॐ या अक्षराचा विचार करूं.

ॐ हें नाम ॐ अशाच आकृतीनें कां लिहिलें जातें, **ओं** असें कां न लिहिलें जावें ? अशी एक शंका उत्पन्न होईल, तर तिचें समाधान असें आहे कीं, **ओं** हें जसें अक्षर आहे, तसें ॐ हें अक्षर नसून केवळ परमात्म्याचें नामबोधक निर्गुण चिन्ह आहे. प्रथम शब्दोच्चार आणि नंतर अक्षर असा नियमच आहे. मुलगा उत्पन्न होण्यापूर्वीं जसा बापाची तसबीर काढूं शकत नाहीं—पण बापांत मात्र मुलाची तसबीर अव्यक्त आहेच—तसें अक्षर स्वतः निर्माण होण्यापूर्वींच जें ॐ चें चिन्ह स्वतःसिद्ध आहे, त्यास तें **ओं** या आकृतींत कसें आणूं शकतें ? उलट आपण त्या चिन्हांत अव्यक्त आहे; कसें तें पहा. स्वर निर्गुण व अक्षर स-

गुण आहे, हें वर सांगितलेंच आहे. निर्गुण म्हणजे **अव्यक्त**; आणि सगुण म्हणजे **व्यक्त**. सगुणापासूनच निर्गुणाचा बोध होतो. आतां ह्या आपल्या ॐ मध्यें **म्**कार सगुण आहे. या **म्**काराचें मूळ अव्यक्त स्वरूप **बिंदु** रूप आहे. याच बिंदूपासून रेषागणित निर्माण झालें. **बिंदु** म्ह० ज्या थेंबाचे कोणत्याही साधनांनीं विभाग होऊं शकत नाहींत, म्ह० दृग्गोचर होण्यास सुद्धां अशक्य असा जो **थेंब** तो **बिंदु**. याचप्रमाणें जिच्या रुंदींतून कसाही आडवा भाग होऊं शकतच नाहीं. ह्म० जो दृष्टीला अगोचर आणि जी पृथक् दोन बिंदूंशीं संयोग करते, तीच **रेषा** असा रेषागणिताचा सिद्धांत गणिताचार्यांनीं आपल्यास अनुकूल असा करून घेतला आहे. असो. माझी समजूत तर अशी आहे कीं, एकंदर शब्दव्यापाराचें केंद्रस्थान **बिंदुच** आहे म्ह० कारणरूप आहे. **बिंदु** स्वस्थानीं कायम राहून गतीची उपाधि लागतांच तो सरळरेषारूप होतो, आणि याच **रेषेला** विकृतीची उपाधि लागली कीं, तोच **बिंदु** **अक्षर**रूप होतो. रेषा आणि अक्षर हीं बिंदूचींच विकारी स्वरूपें आहेत, आणि हीं दोन्ही अव्यक्तरूपानें बिंदूंत आहेतच. आतां या सर्वांचा एकमेकांशीं आपण मेळ घालून पाहूं.

कल्पना करा कीं, कापसाचा गोळा **बिंदुरूप** आहे, त्याच्या एके बाजूस बोटानें पीळ घालून लांब ओढला कीं, त्यापासून दोरारूप **रेषा** निर्माण झालीच. याच दोऱ्यास वांकडी तिकडी अनुकूल विकृति लावतांच **अक्षर** बनलें. कां बनलें कीं नाहीं ? नीट आपल्या

मनांत विचार करून पहा. आतां पुनः त्याच दोऱ्याचें टोंक ओढतांच अक्षराकृतीचा लोप होऊन, सरळ रेषाकृतिरूप झाला; नंतर त्याचा पीळ काढून मागें सारितांच दोरेपण जाऊन कापसांत मिळाल्यावर पुनः बिंदूचा बिंदु कायम आहेच. तात्पर्य काय? कीं, **बिंदु** हाच मूल कारणरूप आहे; आणि त्यापासून होणारी **रेषा, अक्षर** इ० हीं सर्व त्याचीं कार्यें होत. कार्य कारणरूप असतें, हा तर आपला नियम ठरलाच आहे. असो. आतां आपण आणखी थोडासा विचार करून पाहूं. **शब्द** आणि **अक्षर** या उभयतांपासून अर्थबोधरूप कार्य सारखेंच होतें. जें दुसऱ्यास शब्दांनीं आपण बोधूं इच्छितों, तेंच अक्षरांनीं लिहून बोधूं शकतों ह्म० बोधकशक्ति दोघांतही समान असल्यानें दोघेही समान गुणी झाले. शब्दापेक्षां अक्षराची जास्त गति आहे असें म्हटल्यास कांहीं हरकत नाहीं. या ठिकाणीं एवढें मात्र ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, मुखांतून जो निघतो तो **शब्द** आणि कागदावर जें लिहिलें जातें तें **अक्षर.** अंतरावर श्रोता असला ह्मणजे त्याच्याजवळ शब्द पोंचूं शकत नाहीं. अशा वेळीं अक्षरांनींच त्यास सुलभ रीतीनें बोध होतो. किंबहुना शब्दाला चिरकालत्व आणण्याकरितांच **अक्षर** निर्माण झालें. वक्ता ज्या वेळीं श्रोत्यांच्या समुदायांत शब्दानें बोध करितो त्यावेळीं त्याच्या संनिध बसलेल्या श्रोत्यांस स्पष्ट रीतीनें शब्द ऐकावयास येतो; परंतु जे श्रोते दूर अंतरावर बसतात, किंवा मुळींच त्या ठिकाणीं हजर नसतात. त्यांना वक्त्याचा शब्द ऐकूं येत नाहीं; मग ते निकट

बसलेल्या श्रोत्यांस वक्त्यानें काय सांगितलें म्हणून विचारतात. मग भाषण ऐकलेला श्रोता मीं अमुक ऐकिलें तें तुम्हाला सांगतों, असें म्हणून ऐकिलेले शब्द सांगूं लागतो. आणि हजर नसलेले जिज्ञासूकरितां तेच वक्त्याचे शब्द अक्षररूपानें लिहून ठेवितो. असें झालें ह्मणजे प्रत्यक्ष ऐकणारांप्रमाणेंच अक्षर वाचणारांसही बोध होतो. ( या ठिकाणीं जेवढे मुद्दे लिहिले आहेत, तेवढे वाचकांनीं फार मार्मिक रीतीनें वाचून लक्षांत ठेवले पाहिजेत, अशी त्यांना माझी शिफारस आहे. या मुद्यांचा पत्ता या लेखाच्या शेवटीं श्रुतीची स्वतःसिद्धता ज्या ठिकाणीं दाखविली आहे—त्या ठिकाणीं लागेल. ) आपण जे शब्द तोंडानें बोलतों तेच अक्षररूपानें हातांनीं लिहितों व तींच अक्षरें वाचूं लागलों, म्हणजे तेच शब्द तोंडांतून निघूं लागतात. यावरून शब्दांत व अक्षरांत बोधकशक्ति सारखीच असल्यामुळें **शब्द** व **अक्षर** हीं दोन्हीं एकच आहेत असेंच म्हटलें पाहिजे. आतां या उभयतांच्या स्वरूपाचें ऐक्य कसें आहे, तें पहा. बिंदूत्र-गतीरूप विकृतीच्या योगानें रेषा व अक्षररूप होतो, हें वर सिद्ध झालेंच आहे. आतां अनुच्चरित **शब्द** बिंदूरूपच आहे; त्यास आघाताची उपाधि लागतांच, **स्वर** आणि **नाद**रूप रेषा ह्म० लांब झाला; आणि दंत, तालू इ० च्या उपाधीनें **वर्णरूप** झाला; ह्मणून शब्द आणि अक्षर यांत कांहींएक भेद नसून, दोन्ही एकच आहेत असें ह्मणण्यास कोणताच बाध नाहीं. याप्रमाणें ‘ ॐ ’ हा **शब्द** आणि **अक्षर** हीं दोन्हीं एकरूपच


आहेत, हा सिद्धांत ठरला; ह्मणजे मुखानें उच्चारले जाणारे यच्चयावत् शब्द आणि हस्तव्यापारानें होणारीं अक्षरें, आकृत्या इ० कांचें ॐकारांत अव्यक्तरूपानें अस्तित्व सिद्ध आहे व ही सर्व रचना त्याच्यापासूनच निर्माण होते. आणि पुनः ॐ कारांतच तिचा लय होतो; हा **श्रुतीचा सिद्धांत** आहे. हा सिद्धांत आजपर्यंत अव्यक्त होता, तो मी आपले वाचकांस अनुभवसिद्ध व्यक्त करून दाखवितो. आणि आतां पुढें ॐकाराचें स्वरूप जें मी व्यक्त करून दाखविणार आहें तें अक्षरशः खरें आहे, असेंच वाचकांनाही कबूल करावें लागेल—

ॐकाराचें अव्यक्त स्वरूप बिंदुरूपच आहे हें तर सिद्ध झालेंच आहे. आतां पहा. ं हा बिंदू आणि  ही रेषा—हींच दोन चिन्हें मिळून, विकृतिरूप उपाधीनें "ॐ" हें अक्षर झालें; यांत रेषा व बिंदूचीं अगदीं पृथक् रूपें स्पष्ट दिसत आहेत तीं पहा.













यांत सगळे तुकडे अगदीं वेगळे वेगळे दिसत आहेतना? तर मग ॐ या अक्षरांत या तुकड्यांपेक्षां, जास्त तर कांहीं आलें नाहींना? आतां, पूर्ण "ॐ" काराचे सर्व तुकडे मांडून दाखवितों, त्यांत वरच्या अर्ध चंद्राकार मात्रेचे मी दोन तुकडे करतों, याचें कारण मी पुढें स्पष्ट करून दाखवीन. आतां फार सूक्ष्म दृष्टीनें विचार करून पहा.


" ॐ " हा तर मूळ " ॐ " झाला यांत



हे आठ तुकडे झालेना ?

आतां  हे तीन तुकडे मिळून **क** हें अ-
क्षर झालें ना ?  **च**  **ट**  **त**
 **प**  **य**  **र**  **ल**
 **ह** याप्रमाणें अनुकूल, सुधे, आणि उलटे
असे तुकडे जुळवून मांडले असतां सारी वर्णमाला तयार होते—मात्रा, वेलांटी, उकार, विसर्ग इ० आकृत्याही तयार होतात. पण मजा ही आहे कीं, हवें तें अक्षर तयार होऊन, दोन तीन तुकडे तरी शिल्लक राहतातच. ही झाली वर्णमाला. आतां संख्येचा मासला पहा.—

 मिळून **एक**,  मिळून **दोन**, 
मिळून **तीन**,  मिळून **चार**,  मिळून
**पांच**,  मिळून **सहा**,  मिळून **सात**,

 मिळून आठ,  मिळून नऊ, आणि बिंदु स्वयं सिद्ध आहेच. ही संख्या फक्त ॐ इतक्याच अक्षरांच्या पांच तुकड्यांतून निघाली. पण अक्षर म्हणजे वर्णमाला निर्माण होण्यापूर्वींच संख्या निर्माण झाली आहे, असेंच म्हटलें पाहिजे. कारण, संख्येचे आंकड्यांत १—२—३ हे बिंदू-रेषेचे तुकडे मुळींच न येतां अंक बनले आहेत. आतां सूक्ष्म विचार करून पहा कीं, फक्त बिंदू  व रेषा  असे जे तीन तुकडे आहेत, त्यांतील प्रथम तुकडा बिंदूचा एके ठिकाणीं कायम करून नंतर रेषेचे बाकीचे दोन तुकडे त्या बिंदूच्या सभोंवतीं अनुकूल रीतीनें फिरवून फिरवून लावित चला, ह्मणजे बिंदु जागच्या जागीं कायम राहून अंक तयार होतात. अक्षरांच्या तुकड्यांपर्यंत जाण्याचें कारणच पडत नाहीं. यावरून प्रथम संख्या आणि मागून अक्षर निर्माण झालें असेंच सिद्ध होतें. कारण संख्या जर प्रथम नसती तर क हें पहिलें अक्षर, ख हें दुसरें आणि ग हें तिसरें, असें कधींच ह्मणतां आलें नसतें. आठाच्या अंकांत बिंदु नाहीं अशी शंका आल्यास तिचें समाधान असें आहे कीं, बिंदूवांचून फक्त दोनच तुकड्यांनीं आठाचा अंक होतो, आणि बिंदूच पाहिजे असल्यास खालच्या रेषेचें जाड टोक बिंदूवर बसविलें ह्मणजे बिंदु झांकला जातो. यावरून आठांतही बिंदु आहे असें ह्मणतां येईल. असो, तात्पर्य काय कीं, संख्या व अ-

क्षरें हीं हातानें लिहिण्यापूर्वीं तोंडानें उच्चारण्याच्या शब्दांत लीन होतीं; आणि तोंडानें उच्चारावयाचे शब्द व अक्षरें दंत, तालू, ओष्ठ इत्यादिकांच्या विकृतीनें स्पष्ट होण्यापूर्वीं केवळ स्वररूपच होतीं, आणि स्वराशीं व ध्वनीशीं अभेद आहे. अनुच्चारित ध्वनि बिंदुरूप आहे; तसाच अव्यक्त ॐकारही बिंदुरूपच आहे. **व्यक्त बिंदु** आणि **सगुण परमात्मा** यांचें ऐक्य आहे व **अव्यक्त बिंदु** आणि **निर्गुण परमात्मा** हे व्यापकरूप आहेत. ( या विषयाला मला याहीपेक्षां जास्त स्पष्ट करावयाचें आहे, परंतु या प्रकरणांत तसें न करतां पुढील प्रकरणांत करीन. )

आतां ॐ हें **नाम** परमात्म्याचें वाचक आहे, आणि **परमात्मा** वाच्य आहे. वाच्यवाचकांचा नेहमीं अभेद असतो, असें वर सांगितलेंच आहे; पण तो अभेद कसा आहे तो पहा. नामरूपांसह **सृष्टि** मायेंत लीन होऊन **माया** अव्यक्तरूपानें परमात्म्यांत गुप्त झाली ह्मणजे अस्तित्वरूपानें आहे असेंही सिद्ध झालेंच आहे. यावरून यच्चयावत् घडामोडीचा **केंद्रबिंदु परमात्मा** आहे, ही गोष्ट कायमची ठरली. तोच **बिंदुरूप परमात्मा** उत्थानरूप गतीच्या उपाधीनें त्याचें स्वतःसिद्धतेचें व्यापकस्थान न सोडतां **मायारूप रेषाकृति** झाला. पुढें गुणांच्या विकृतीनें **सृष्टिरूप अक्षर** झाला. आतां वरील कापसाच्या दृष्टांताप्रमाणें अक्षररूप **सृष्टि** रेषारूप **मायेंत** लीन झाली. गुणविकृति टाकून रेषारूप **माया परमात्मरूप** बिंदूंत गुप्त झाली. अर्थात **बिंदूचें** व **परमात्म्याचें** एकीकरण झालें. व

त्यापासून **रेषा, माया, अक्षर** आणि **सृष्टि** यांचें परस्पर ऐक्य झालें. म्हणूनच जडचैतन्यात्मक सृष्टिसह **माया** आणि स्वर, वर्ण, शब्द, अक्षर आणि रेषायुक्त बिंदु, या सर्वांचें ऐक्यरूप **परमात्मा** असल्यानें त्याचें **नाम**ही याच गुणांनीं भरलेलें असें पूर्णैश्वर्यद्योतक असेल तरच शोभेल. असें परमात्म्यास शोभणारें नाम कोणतें? तर अष्ट प्रकृतिरूप ॐ हेंच आहे.

आतां रूपविचार करणार तोंच बुद्धींत एक नव्या कल्पनेचा उदय झाला, ती कल्पना सूज्ञ वाचकांपुढें मांडण्याचें धाडस मी करतों. युक्त वाटल्यास ठीकच आहे, अशुद्ध असल्यास कृपा करून मला कळविण्याची ते अवश्य तसदी घेतील, ह्मणजे तिची दुरुस्ती करतां येईल. ही कल्पना अशी आहे कीं, बिंदुरूप परमात्मा, रेषारूप माया, आणि अक्षररूप सृष्टि, असें वर सिद्ध करून चुकलोंच आहे; तथापि, या गोष्टीचा आणखी सूक्ष्म विचार करून पाहूं. **रेषा** ही जी आपण काढतो, त्याहून कितीही सूक्ष्म काढली ह्म० जी केवळ दृग्गोचर मात्र होऊं लागली, अशी रेषा दृष्टीनें जी एकच दिसूं लागते, तिच्यांतच अव्यक्तरूप **रेषा** तीन आहेत. या दोन अव्यक्त रेषांवांचून, तिसरी एक व्यक्त रेषा होऊंच शकत नाहीं. हें ऐकून वाचकांना मोठें आश्चर्य वाटेल, परंतु, आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. तिसरी व्यक्त रेषा कशी होत नाहीं ती पहा. कागदावर अथवा भूमीवर रेषा काढतांच, त्या स्थलांत दोन भाग ह्म० रेषेच्या अलीकडे व पलीकडे असे दिसूं लागतात. हे दोन

भाग होतांच, त्या रेषेला दोन तट नदीप्रमाणें होतात ह्म० नदी जशी स्वतः प्रवाहरूप मध्यरेषा होऊन, दोन्ही बाजूंस दोन तटरूप रेषा करून, तीन रेषा रूपानें वाहत जाते, त्याचप्रमाणें आपण एक **रेषा** काढली ह्मणजे तिच्या बरोबर दोन बाजूंस दोन अव्यक्त रेषा झाल्याच पाहिजेत हा सिद्धांत. हें तर स्थूल उदाहरण झालें. याच मानानें अति सूक्ष्म रेषेची कल्पना करा ह्मणजे एक व्यक्त रेषा दोन अव्यक्त रेषांनीं कशी युक्त आहे, हें सहज ध्यानांत येईल. आतां आपण **बिंदू**विषयीं विचार करूं.

जशी एक रेषा दोन अव्यक्त रेषांनीं युक्त आहे, त्याचप्रमाणें, व्यक्त **बिंदु**ही एक अव्यक्त **रेषेनें** युक्त आहे; कसा तो पहा. अव्यक्त बिंदूचें स्वरूप स्वतः-सिद्ध आहे तसेंच आहे, तें सांगतां येत नाहीं. **बिंदु** हा शब्द उच्चारतांच आपल्या मनांत वर्तुलाकृति येते; व त्याचप्रमाणें हातांनींही आकृति निवते. याचें स्थूल उदाहरण आपण घेऊं. लेखणीनें एक मोठें **शून्य** काढिलें, ह्मणजे त्याला एका मोठ्या बिंदूची आकृति येते, ( जशी ० ही पहा ) आतां येथें असा विचार करा कीं, या आकृतींत जी काळी **रेषा** आहे ही **बिंदु** नसून त्या रेषेच्या आंतील जो पांढरा भाग दिसतो तोच **बिंदुरूप** आहे आणि या मधल्या पांढऱ्या भागास बाह्य काळ्या वर्तुलाकार रेषेनेंच बिंदुत्व आणिलें आहे. बिंदूची बाह्य वर्तुलसीमा रेषा आहे. बिंदू काळा ह्म० ( ● ) असा असला, तरी त्यास बाह्य पांढरे भागानें, काळी वर्तुल **रेषा** तटरूपानें आलीच.

अर्थात बाह्य वर्तुलसीमा **रेषा** व अंतर्गत भाग **बिंदु** असेंच बिंदूचें व्यक्तरूप सिद्ध होतें. याचा अति सूक्ष्म विचार करा आणि हवा तेवढा अति सूक्ष्म बिंदु काढून पहा, व्यक्त झाला कीं त्यांत रेषा आलीच. रेषेवांचून बिंदूस व्यक्तता येऊं शकतच नाहीं. रेषा अदृश्य झाली ह्मणजे अव्यक्त बिंदूचें व्यापक स्वरूप झालेंच; व तें स्वतःसिद्ध आहे तसें आहेच. वाचकहो, बिंदु-रेषेचे मुद्दे नीट ध्यानांत आणून, आपल्या मूळ पदार्शी कसें अवर्णनीय ऐक्य झालें आहे तें पहा! अव्यक्त बिंदूचें स्वरूप व्यापक आहेच. तसेंच परमात्म्याचेंही मायारहित निर्गुणस्वरूप निरपेक्ष **व्यापक** आहे. वर्तुलरेषेच्या उपाधीनें बिंदूस जशी व्यक्तरूपता आली, तशी अव्यक्तगुण–मायेच्या उपाधीनें परमात्म्यास **सगुणरूपता** आली. पुढें व्यक्तबिंदु स्वस्थान न सोडतां जसा गतिरूप उपाधीनें अव्यक्त तीन रेषांची एकच व्यक्त रेषारूप झाला; तसा सगुण परमात्मा, उत्थानरूप उपाधीनें,–अव्यक्त त्रिगुणात्मक–व्यक्त–**मायारूप** झाला. त्रिगुणरेषेला अनुकूल वळणानें जशी अक्षररूपता आली, तशी त्रिगुणात्मक मायेला अनंतविध उपाधी लागून अतर्क्य **सृष्टिरूपता** आली. अर्थात **व्यापक परमात्माच अव्यक्त बिंदु सगुण परमात्माच व्यक्त बिंदु–त्रिगुणात्मिकामायाच–त्रिगुणरेषारूप–** आणि **सृष्टि–अक्षररूप**–या सर्वांचें अत्यंत ऐक्य होऊन अभिन्नता आली; कांहींच भेद उरला नाहीं; असें माझें ठाम मत आहे. असो. आतां आणखी एक मार्मिक मुद्दा वाचकांच्या पुढें मांडतों. तो त्यांनीं पूर्ण

लक्षांत ठेवावा. बिंदु, रेषा, अक्षर, परमात्मा—माया—सृष्टि यांचें अत्यंत ऐक्य वाचकांच्या लक्षांत आलेंच आहे. आतां तिघांच्याही **गुणांचें ऐक्य** दाखवून हें नामविवेचन आटपतों.

आतां पहा, अव्यक्त **बिंदु** आणि **परमात्मा** दोघेही व्यापक निर्गुणस्वरूपच आहेत. या ठिकाणीं कांहींच बोलवत नाहीं. जसे आहेत तसे आहेत. व्यक्तापर्यंतच वाणीची गति आहे. व्यक्त **बिंदु** प्रकृतिपुरुषरूप आहे. बिंदूची स्वस्थानीं निश्चलता आहे, तिच्यांत मायेची तमोगुणप्रधान **जड** उपाधि असल्यानें परमात्म्याचा **सत्** गुण व्यक्त होत आहे; आणि तोच **बिंदु** गति पावून रेषारूप झाला म्हणजे त्यांत मायेच्या **रजोगुण**प्रधान क्रिया ह्म० चलनवलनरूप उपाधीनें परमात्म्याच्या **सत्** गुणाबरोबर **चैतन्य**गुणही आला; पुढें रेषेला विकृतिरूप उपाधि लागतांच **बिंदु** अक्षररूप झाला. या योगानें मायेच्या सत्त्वगुणप्रधान **बुद्धिरूप** उपाधींत परमात्म्याचे **सत्, चित्** आणि **आनंद** असे तिन्ही गुण आले आहेत, हें सिद्ध झालें. यावरून पहा कीं, **सच्चिदानंदघन परमात्मा** आणि **सत्त्व, रज, तम,** त्रिगुणात्मिका अशी **माया** ह्म० अखिल चराचरात्मक सृष्टि हे प्रकृतिपुरुष **वाच्य** आणि स्वर, शब्द, रेषा, अक्षर, मूल **बिंदु** स्वरूप ॐ हें वाचक **नाम** यांचा अभिन्न एक रूपानें ओतप्रोत भाव कसा झाला तो वाचकांनीं पूर्ण ध्यानांत आणावा; यापेक्षां अधिक वर्णन करण्यास मी असमर्थ असल्यानें **“सर्वं खल्विदं ब्रह्म”** आणि **“हरिरेव जगत् जगदेव हरिः”**

असें ह्मणून प्रकृति, पुरुष आणि नाम यांचें विवेचन यथामति संपवून आतां रूपविचारास लागतों.

'**रूप**' ह्म० रेषेनें अथवा अवयवानें संयुक्त असा कोणत्याही प्रकारचा आकार. हें रूप **व्यक्ताव्यक्त** भेदानें दोन प्रकारचें आहे. व्यक्त रूप ह्म० जें दृष्टिगोचर होतें तें; आणि, अव्यक्त ह्म० केवळ कल्पनेनें ग्रहण होणारें. अखिल चराचरात्मक सृष्टि हेंच परमात्म्याचें दृग्गोचर होणारें **व्यक्तरूप** आहे, तें, रेषा व अवयव यांच्या योगानेंच तयार होऊन व्यक्त होऊं लागतें; आणि हें व्यक्त होऊं लागण्यापूर्वीं, ज्या अचिंत्य पदार्थांत लीन असतें; ह्म० ज्यांत निरवयवतेनें सर्वांचें अस्तित्व असतें; आणि जें कल्पनेनें ग्रहण होतें तेंच परत्म्याचें **अव्यक्तरूप** होय. दृष्टांतः—उत्तम चित्रकलाकुशल कारागिरानें, चित्र तयार करण्याच्या हेतूनें मृत्तिकेचा गोळा तयार करून सन्मुख घेतला, आतां त्याच्या मनांत एक, दोन अथवा अनेक चित्रांची जसजशी कल्पना येत जाईल, तसतशीं सर्व चित्रें अव्यक्तरूपानें समोरच्या गोळ्यांत हजर उभीं राहतील; कारण, तो कारागीर अति कुशल असल्यानें सर्व चित्रांच्या कल्पना त्याच्या हृदयांत पूर्वींच सज्ज आहेत. इच्छेनुरूप जी कल्पना दृढ झाली, तेंच चित्र करण्यास तो आरंभ करूं लागतो, आणि दुसऱ्यांच्या मागणीच्या वश झाल्यास ज्यांची जशी निकड असेल, त्या अनुरोधानें त्याला चित्रें निर्माण करावीं लागतात. मग स्वतःची इच्छा तर एकीकडेच राहते. असो, तात्पर्य काय कीं, चित्रें निर्माण हो-

ण्यापूर्वी जशीं तीं सर्व त्या मातीच्या गोळ्यांत अव्यक्त आहेत, त्याचप्रमाणें अखिल सृष्टि साकार होण्यापूर्वी निराकृत रूपानें **मायेंत** अव्यक्त आहे; आणि माया, त्या निराकृत रूपांसह, परमात्म्यांत गुप्त होऊन बसली; ह्म० सर्व साकार रूपांचा **बिंदु परमात्मा** झाला. चित्रें निर्माण होण्याचा मृन्मय गोळा हा तरी एक स्थूल बिंदूच आहे. अव्यक्त **बिंदु** व्यापक आहे, व व्यक्त **बिंदु** रेषासंयुक्त आहे; हें तर वर सिद्ध झालेंच आहे. व्यक्त बिंदूप्रमाणेंच माया संवलित परमात्म्यास **सगुण**रूपता आली. हेंच परमात्म्याचें आणि बिंदूचें **रूप** सिद्ध झालें, आणि दोन्हेही एकरूपच आहेत हें तर आपलें वर ठरलेंच आहे. अखिल चराचरात्मक सृष्टीला याच परमात्मबिंदूपासून साकारता आली आहे. सर्वांचें मूल उत्पत्तिरूप बिंदुस्वरूपच आहे. हीच गोष्ट स्पष्ट रीतीनें वाचकांच्या पुढें मांडण्याचा मी यत्न करतों. यावत् निर्जीव पदार्थमात्र, ह्मणजे—मृत्, पाषाण, धातू इ० हे सर्व परमाणूंच्या घनीभावानें झालेले आहेत; आणि अति सूक्ष्म परमाणूंचें स्वरूप **बिंदुरूपच** आहे. स्थूल जड पदार्थांची घर्षणानें अथवा कुटून आकृति नाहींशी करतां येते ह्म० तो पदार्थ पिष्ट अथवा भस्मरूप होतो. यांत **भस्म** ह्म० परमाणूंची राशी होय. भस्म केल्यानें आकृति तर गेली खरीच, पण परमाणूची गोल बिंदुरूपता मात्र कोणत्याही उपायानें नष्ट होऊं शकली नाहीं; ह्मणूनच जडपदार्थांचें मूल उत्पत्तिस्वरूप परमाणुरूप **बिंदु** आहे. **जल** हें तर तुषारांच्या घनी-

भावानेंच झाल्याचें सर्वत्र प्रसिद्ध आहेच; आणि तुषार बिंदुरूप आहे. किंबहुना बिंदु शब्दानेंच जलाचा थेंब असाच बोध होतो. असो—

आतां फल–पुष्पवान्–वल्लि, वृक्ष, इ० पहा. या सर्वांची उत्पत्ति बीजापासूनच आहे; हें बीज बहुधा निरवयव आणि वर्तुलाकृति असें असतें.—कोणी ह्मणतील कीं, असाच केवळ नियम आहे असें नाहीं. क्वचित् बीज लांबोळें, चतुष्कोण, अथवा चापट असेंही असतें, यांसही तुह्मीं आपलें वर्तुल बिंदूंत ओढणार कीं काय? त्यास मी असें उत्तर देतों कीं, बीजावर कवटी असते, व आंत बीज असतें, तें निबर होण्यापूर्वीं ओलें बिंदुरूप असतें. प्रथम पुष्प येतें, त्यांत जो मधु असतो, तो परिपक्व ह्म० चाचनीरूप झाला कीं, वरचें पुष्प शुष्क होऊं लागतें, व देंठाच्या मूळाशीं त्या मधूची गोळी होते, आणि देंठाचाच शेंवट वरची कवटी होऊन पुष्प झडून जातें, मग फलाची आकृति जशी कांहीं सिद्ध असेल, तदनुकूल व तिकडे त्याची वाढ सुरू होते व ती कवटी वाढत जाऊन आंतील मधुबिंदुही तसाच दाबला जातो व तदाकृति होतो. मला या ठिकाणीं एक दृष्टांत आठवला आहे, तो वाचून वाचकांना फार हंसें येईल तर खेंरच, परंतु गोष्ट कशी अगदीं सटीप अंतःकरणांत बिंबून जाईल. पहा, पुरणाच्या पोळींत पुरण जसें सारखें पसरतें, त्याचप्रमाणें मधुबिंदु कवटीच्या आकारानुरूप पसरत जातो. असो. कोणी आणखी अशीही शंका काढतील कीं, अनेक औषधी अशा आहेत

कीं, ज्यांस फल, पुष्पें कांहींच येत नाहींत, पण वर्षाकालांत आपल्या आपण हव्या तेथें उगवतात, त्यांस विंदुरूप बीज कोठून आणाल? तर मीच त्यांना उलट असा प्रश्न करतों कीं, अशा वनस्पति ज्या उगवतील त्या भूमीवरचना? आणि त्यांस वर्षाजल अथवा भूमिस्थ जलाच्या आर्द्रतेचें साह्य लागेलना? झालें. आमचें कार्य साधलें. हेंच यावरील शंकेचें समाधान. अहो, पृथ्वीच्या परमाणूरूप बिंदूलाच जलबिंदूचें साह्य मिळून ह्या वनस्पति झाल्या आहेतना? तेच रज बिंदू, आणि जलबिंदू मिळून, बीजरूप बिंदू झाले. यावरून सूज्ञ वाचकांनीं हवीं तर आणखी उदाहरणें जुळवून घ्यावींत. असो. आतां आपण प्राणी वर्गाच्या उत्पत्तीकडे वळूं.

या ठिकाणीं आपण **जारज, अंडज** आणि **स्वेदज** असे तीनच प्राण्यांचे वर्ग घेऊं; कारण, चवथा वर्ग **उद्भिज**, ह्म० वृक्ष, वल्ली, औषधी इ० कांचें वर्णन नुकतेंच झालें आहे.—आतां पहा कीं, जारज आणि अंडज, यांची उत्पत्ति रेतापासून आणि रजापासून आहे. **रेत** हें जलबिंदूसारखेंच आहे, हीं तर गोष्ट निर्विवाद आहे; **रज** हे परमाणूंसारखें आहे, ज्यांना आपण रजःकण असेंही ह्मणतों, व याच कारणानें पुष्पवतीस, रजोदर्शन ह्मणण्याची चाल आहे; असें मला वाटतें. गर्भधारणा, या उभय बिंदूंच्या एकीकरणानेंच होते, त्यावांचून होत नाहीं. यामुळेंच ज्या बिंदूंचें आधिक्य होतें, तशी पुरुष किंवा स्त्रीरूप आकृति निर्माण होते. या आकृती स्वतंत्र स्त्रीपुरुषरू-

पानें जरी पृथक् दिसतात, तरी प्रत्येक आकृतींत प्रधान आणि गौणांग असा भेद होतोच. पुरुषाचें उजवें प्रधानांग असून, डावें गौणांग असतें; व त्याप्रमाणें उजवे डावे अंगांत शक्तीचाही किंचित् फरक पडतोच. स्त्रियांचें डावें प्रधानांग असून, उजवें गौणांग आहे. स्त्रियांचें डाव्या अंगांत जरी उजव्या अंगापेक्षां किंचित् शक्ति जास्त असते, तरी ती पुरुषाच्या डाव्या अंगापेक्षां कमीच आहे; मग उजव्या अंगापेक्षां फार कमी आहे असें ह्मटल्यास फारसें आश्चर्य नाहीं. म्हणूनच कमी शक्ति अधिक शक्तीच्या अधीन असल्यानें स्त्री वामांगी म्हणविली जाते; व ती स्वतःसिद्धच पुरुषाधीन आहे, स्वतंत्र होऊं शकतच नाहीं. हें अत्यंत संलग्न जोडपें आहे. याविषयीं आणखी एक खुबीदार प्रमाण आपण काढूं, म्हणजे जास्त स्पष्टीकरण होईल. असें पहा कीं, मनुष्याच्या अथवा प्राण्याच्या आकृतींत बरोबर उभी मध्यरेषा टाकली म्हणजे कसे अगदीं सारखे दोन विभाग होतात, एक रोमाचाही फरक पडत नाहीं—दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, दोन स्कंध, दोन हात आणि दोन पाय याप्रमाणें शेवटपर्यंत सर्वच अवयवांचे बरोबर दोनच भाग कां व्हावेत? तर गर्भ दोन बिंदूंच्या एकीकरणानें झाला म्हणून. जास्त बिंदूंचें एकदम एकीकरण झालें तर माणसांस जुळीं होतात व पशूस पुष्कळ संतति होते.—असें जरी झालें, तथापि प्रत्येक आकृतींत बिंदूंचें युग्म असतें; हा सिद्धांत. या नियमाचा मात्र कधींच भंग होणार नाहीं. उदर व मुख, हीं दोन कां दिसत नाहींत अशी शंका आ-

ल्यास, ओठांची मध्यरेषा आणि उदराची रोमरेषा पहा म्हणजे या वरील शंकेचें आपोआप समाधान होईल. मनुष्याकृति मूळची विभक्त असून या दोन रेषा सांधा जोडल्याची खूण दाखवीत आहेत. असो, या अवयवांचें द्वंद्व जरी या शरीरांत आहे; तरी क्रिया दोन्हीही अवयवांनीं एकच होते. किंबहुना द्वंद्वांत एकमेकांचें परस्पर साह्यही लागतें, त्यावांचून क्रियेची पूर्णता होऊं शकत नाहीं. ( या ठिकाणीं संसाररचनेचें पूर्ण स्वरूप दाखवितां येईल, परंतु अप्रकृत विषय होण्याच्या भीतीनें तो विचार करण्याचें काम आमच्या सूज्ञ वाचकांवरच सोंपवून पुढें चलतों. ) आतां पहा, डोळ्यांनीं पहाणें, कानांनीं ऐकणें; पायांनीं चालणें; हातांनीं काम करणें इ० क्रियेंत द्वंद्व अवयवांचा आपसांत उपयोग तर होतोच; पण भिन्न भिन्न अवयवही एकमेकांस मदत करतात. जसें पायांनीं चालत जावें म्हणून डोळे त्यांना मार्ग दाखवितात. पायांत कांटा लागला कीं तो काढण्याकरितां हात पुढें सरसावलेच. यावरून बाकीच्या सर्व गोष्टी वाचकांनीं समजून घ्याव्यात. एवंच काय कीं, सर्व शरीराच्या अवयवांची द्वंद्वच रचना आहे, हीं सर्व कार्यें द्वंद्वबिंदूपासूनच झालीं आणि म्हणूनच जारज व अंडज या प्राण्यांच्या उत्पत्तीचें मूळकारण बिंदूच आहे. जारज आणि अंडज यांत भेद इतकाच कीं, जारज प्राणी गर्भांतून सावयव बाहेर पडतो, आणि अंडज निरवयव अंडाकृति गर्भाचे बाहेर पडून, मग अवयव तयार होऊन, अंड फुटून तो बाहेर येतो. म्हणूनच पक्षीवर्गास **द्विज** अशी संज्ञा आहे.

कीटक, पतंग, दंश, इ० क सर्व स्वेदज आहेत. पार्थिवांश, जलांश, आणि उष्णता, या तिघांच्या संयोगापासून जो एक वाफेचा बिंदु होतो, त्यालाच स्वेद ह्म० घाम अशी संज्ञा आहे. उष्ण कालांत अंगाला घाम येतो, यांत शरीराचा मल, जल, आणि ऊष्मा, असे तिन्हीही पदार्थ आहेत. डोक्यांत आणि गलिच्छ वस्त्रांत " ऊं " हा प्राणी घर्मापासूनच निर्माण होतो. अर्थात स्वेदज प्राण्यांच्या उत्पत्तीला मूळ कारण उष्ण बिंदूच झाला. सारांश काय कीं, जारज, अंडज, स्वेदज आणि उद्भिज, या चतुर्विध चैतन्यप्राण्यांस **आर्द्र बिंदु** आणि जड पदार्थांस परमाणूरूप **कठोर बिंदूच** उत्पत्तीस मूळकारण झाला. यावरून काय सिद्ध झालें कीं, अखिल जडचैतन्यात्मक सृष्टीरूप कार्यास, मूळकारणस्वरूप **बिंदूच** झाला; आणि " ॐ " काराचेंही अव्यक्तरूप **बिंदूच** आहे. त्यापासून रेषा व, अक्षररूप ॐ हें व्यक्त होतांच, त्यांच्यांत अखिल जडचैतन्यात्मक सृष्टि ह्म० बिंदु, रेषा, अंक, अक्षर, ध्वनी, शब्द इ० नाद व्यापार, आणि मनुष्य, पशू, पक्षी, कृमि, वृक्ष, वल्ली इ० स्थावरजंगमात्मक अखिल पदार्थ मात्र, या एका " ॐ " कारापासून, निर्माण झाले आहेत. या सर्वांच्या आकृती, या पुस्तकाच्या शेवटीं दिलेल्या चित्रपटांत दाखविल्या आहेत, त्यावरून वाचकांच्या पूर्ण ध्यानांत येईल.

कार्य हें कारण स्वरूप असतें, आणि व्यक्त होण्यापूर्वी कारणांत अव्यक्त असतें असें आपलें वर ठरलेंच आहे; तेव्हां अखिल सृष्टि दृग्गोचर होण्यापूर्वी

आपल्या मूलबिंदूंत ती काल्पनिक रूपानें सर्वसि-द्धच आहे; आणि **कल्पना** हेंच मायेचें ह्म० **प्रकृती-चें** स्वरूप आहे, व, कल्पनारूप प्रकृति ज्या पुरषा-च्या आश्रयानें वास करते, तोच लोकोत्तर कारागीर साक्षात् **परमात्मा** आहे व रेषारूप मायेनें व्यापक, अतएव निर्गुणपरमात्माबिंदूस व्यक्तरूप केलें; ह्म० रेषेनें बिंदूचें व्यक्त होणें आणि मायेनें परमात्म्याचें व्यक्त होणें, हेंच बिंदुस्वरूप परमात्म्याचें **सगुण** रूप होय; आणि, यांतच सृष्टीचें मायारूपानें अस्तित्व आहे, हें वाचकांनीं आतां पूर्ण ध्यानांत आणावें, आ-णि एकवार पूर्व दृष्टांताचें स्मरण करावें. पहा, “ घट मृत्तिकेपासून निर्माण होऊं लागतांच, घट हें नांव, आणि वाटोळें हें रूप, हीं दोन्ही त्याच्या बरोबरच बाहेर आलीं, मृत्तिकाश्रित राहिलीं, व पुन्हां मृत्तिकेंतच लीन झालीं, ह्म० **घट** या नामास, आणि वाटोळें या **रूपास** आधार मृत्तिकाच आहे ” याचप्रमाणें सगुण परमात्म्यांतून सृष्टि निर्माण होतांच, अनंत नामें, आणि अनंत रूपें, तिच्या बरोबरच आलीं; तिच्याच आश्रयानें राहिलीं, आणि शेवटीं तिच्या बरोबरच लीन झालीं; ह्म० नामरूपात्मक **सृष्टि** हेंच मायेचें **नाम-रूप** सिद्ध झालें; आणि, मायासंवलित परमात्मा, अथवा, बिंदु–रेषारूप “ ॐ ” हेंच परमात्म्याचें **नाम**, आणि “ **सगुण** हेंच त्याचें **रूप** असें ठरलें. घटनाम, आणि वाटोळें रूप, आल्यानें मृत्तिकेचें स्वस्व-रूपांत जसा कांहींच भेद झाला नाहीं, त्याप्रमाणेंच व्यक्ताव्यक्त सृष्टि-माया; आणि सगुण परमात्मा, इ०

नामरूपानें युक्त, निर्गुण, निर्विकार, व्यापक, अखंड आणि बोधरूप, असा जो कोणी आहे, तोच सर्वाधार, **सर्वस्वरूप** होऊनही स्वतःसिद्ध आहे तसाच आहे, त्याला कोणते शब्दांनीं संबोधावें, हें माझ्या अल्प मतीस सुचत नाहीं. ह्मणून या अशा अनिर्वाच्य ठि-काणीं कल्पना टाकून स्तब्ध राहणेंच आनंदप्रद आहे असें मला वाटतें; आणि सूज्ञ वाचकांसही या ठिकाणीं आनंदानुभव घेण्याची सविनय प्रार्थना करून हें रूप-विवेचन आटोपतों.

सूज्ञ वाचकहो, येथपर्यंत **प्रकृति-पुरुष** आणि, **नाम-रूप**, यांच्या व्यक्ताव्यक्ततेचा विचार माझ्या अ-ल्प बुद्धीला जसा कांहीं करितां आला तसा करून आपल्या पुढें मांडून ठेविला खरा, परंतु आणखी एक-वार त्यांतील सारांश काढून आपल्यास दाखवितों, ह्मणजे या सर्व घडामोडीचें जें **कारण** मला पुढें सां-गावयाचें आहे, त्याच्याशीं याचा नीट संबंध जुळेल. आतां पहा कीं, मायेच्या वेष्टनानें जरी परमात्म्यास सगुणरूपता आली, तरी तो **निर्विकार**-व्यापक आहे-च. जसा रेषेनें बिंदु व्यक्त होण्यापूर्वी व्यापक आहे, ह्म० कागदाच्या पृष्ठावर शून्य काढलें ह्मणजे आपण त्याला बिंदु म्हणतों, यांत कागद बिंदु नाहीं, रेषाही बिंदु नाहीं; बरें कागद आणि रेषेच्या संयोगास बिंदु म्हणावें, तर सरळ रेषा ओढल्यानें संयोग तर झाला खरा, परंतु बिंदु झाला नाहीं. जर वर्तुलाकार रेषा होईल, तर तिच्यांतील कागदाच्या भागास बिंदु म्ह-णतां येईल. या ठिकाणीं, सूक्ष्म विचार करून पाहिलें,

म्हणजे आपल्या ध्यानांत येईल कीं, वर्तुलरूप तर धारण केलें रेषेनें, आणि कागदाच्या डोक्यावर आलें बिंदुरूप-यांत कागद बिंदु झाला नसून, केवळ रेषेनें त्याच्यावर बिंदुपणाचा आरोप आणिला आहे. इतकें झालें, तरी सर्व कागद कांहीं बिंदुरूप झाला नाहीं, तर रेषेला जितका भाग आंत आणतां आला तितक्यासच बिंदुपण आलें; बाकी कागद स्वतःसिद्ध आहे तसाच आहे. याचप्रमाणें आकार धारण केला मायेनें; आणि ह्मणवूं लागला **सगुणरूपी-परमात्मा.** चरचरात्मक सृष्टि निर्माण केली मायेनें; आणि **कर्ता** म्हणवूं लागला **परमात्मा**—

अनंत नामरूपें धारण केलीं मायेनें आणि तीं गेलीं परमात्म्यावर. या ठिकाणीं थोडा पूर्व दृष्टांत आपण मनांत आणूं. पहा, प्रेक्षकांच्या पैशाच्या अधीन झाली इच्छा, तिनेंच स्त्रीवेषाचीं भूषणें केलीं; आणि नट पुरुष असतांही त्याला स्त्री बनवून हें अखंडचें जगन्नाटक दाखविलें. तसेंच चित्रकाराची इच्छा लोकांच्या मागणीच्या अधीन होऊन लागली हवीं तीं चित्रें निर्माण करावयास आणि पैसे उपटण्यास. अशी ही इच्छा अनिवार, स्वतंत्र आणि यथेष्टाचारी होऊन आतां आटोपत नाहीं, असें त्या नटास व चित्रकारास समजतांच, तो लोकोत्तर युक्तिवानच ( साक्षात् परमात्मा ) असल्यामुळें त्यानें तिच्या हातूनच तिचे हात पाय मोडवून तिला लुली करून टाकली. मग नुसती चळवळ करून करून शेवटीं कंटाळून तो आपला खटपटी स्वभाव सोडतांच अक्रिय, निर्गुण, निर्विकार, अतएव व्यापक-

स्वभाववती झाली. आतां हे स्वभाव आल्यावर मग झाली किंवा झाला काय ह्मणावयाचें तें मी सूज्ञ वाचकांवरच सोंपवितों. असो. पण इच्छेच्याच हातून तिचे हात पाय कसे मोडविले, ती युक्ति मार्मिक विचार करूनच समजून घेतली पाहिजे. असें पहा कीं, रंगभूमीवर प्रत्यक्ष नाटकच होऊन राहिलें आहे; आणि त्यांतले त्यांत प्रसंगानुरूप एक पात्र येऊन बोध करीत आहे कीं, मुला, नाटकास जाऊं नये बरें, कारण पैसा खर्च होऊन त्यांत वेळही फुकट जातो. जाग्रणाचे श्रम होऊन प्रकृति बिघडते, आणि नित्य पाहूं लागलें ह्मणजे संवय लागून तेंच गोड लागूं लागतें. मग आपलें कर्तव्य कार्य सर्व बुडतें व तें करण्याची पुढें इच्छा देखील नाहींशी होते. आज नाटक पाहिलें एवढेंच पुरें आहे. रोज पाहिलें तरी तेंच आहे. ह्मणून बाबा या नादीं न लागतां आपला विद्याभ्यास कर, यांतच तुझें कल्याण आहे. अशा प्रकारचा उपदेश नाटक चालू असतांना मातोश्री या रूपानें खास नाटकी स्त्रीच आपल्या मुलास करीत आहे, अशीच घटकाभर आपण कल्पना करूं. हा उपदेश ऐकून प्रेक्षक मंडळींत जीं कांहीं सूज्ञ व बुद्धिमान मुलें होतीं, त्यांनीं तो ध्यानांत ठेवून, लागलेंच दुसरे दिवशीं नाटकास जाणें बंद करून आपल्या सोबत्यांसही प्रतिबंध करूं लागलीं. असा क्रम चालू झाल्यामुळें त्यांचे पैसे व श्रम वांचून विद्याव्यासंगानें ते सुखी होतात; ही गोष्ट त्या नटीस जरी समजली तरी होईल तोंपावेतों, ती आपले तऱ्हेतऱ्हेचे खेळ करतेच आहे; पण हीं उमजलेलीं मुलें मात्र ति-

च्या तावडींतून बाहेर गेलीं ह्मणजे यांच्याविषयीं मात्र ती निराश होऊन बसते. मुलें खेळास न गेल्यानें सुखी राहतात आणि कोणत्याही प्रकारची त्यांची हानि होत नाहीं. (हीं सर्व भाषणें आध्यात्मिक आहेत)— अशा प्रकारची युक्ति नटानें काढली. आतां चित्रकाराची युक्ति पहा; मायारूप इच्छेनेंच अनंतविध सृष्टिरूप चित्रें निर्माण केलीं व त्यांना आपले गुलाम करून सोडलें. ज्यांना ज्यांना ह्मणून ही निर्माण करणार ते ते हिचे गुलाम बनलेच. पण त्यांतल्या त्यांत तिच्याच हातून मनुष्यरूप चित्र असें निर्माण करविलें आहे, आणि त्याला सारासारविचारशक्तिही अशी विचित्र आणि खुबीदार तिच्याकडून देववून ठेवविली आहे कीं, जर तो असार विचारांत गुंतला, तर तिचा गुलाम बनलाच; आणि चालला नाटकाला! परंतु सार काय आहे या विचारांत तो गुंतला, ह्मणजे नाटक पहाणें वाईट आहे, हा त्या नटीनेंच केलेला उपदेश पुरतेपणीं एक रात्र जागून डोळे व मस्तक दुखवून घेऊन अनुभवानें बळकट पाहून मग मोठ्या रागाच्या आवेशानें त्या नटीस ह्मणतो, अगे, कपटपटु धूर्त नटी, एकूण आमचे पैसे, आमचें अरोग्य आणि आमची विद्या, हीं सर्व बुडविण्याकरितांच तूं हा खेळ मांडलास काय? थांब, आह्मी आमच्या जिवलग सोबत्यांस बरोबर घेऊन येतों आणि हा तुझा सर्व कपटमंडप आतां जाळून फस्त करून टाकतों. अशीं हीं स्वबलप्रतापयुक्त व पुरुषार्थाचीं भाषणें ऐकतांच घाबरून (किती झालें तरी स्त्रीच ती!) ह्मणतेः—हां! हां! हें असें काय?

अहो ! मी तर तुमच्या करमणुकीकारितांच हा खेळ करितेंना ?

**जीवनराव:**—( विचारशील जीव ) ह्मणतो, बया ! करमणूक कसली, आमचा सर्वस्वीं नाश होतोना? चल, उचल आपलें बिऱ्हाड येथून !

**नटी:**—हो उचलतें. पण तुमच्या आणखी नादी बंधुवर्गापासून मीं अगाऊच पुष्कळ पैसे घेतले आहेत, त्या सर्वांची सोडचिठ्ठी जर आपण देत असाल, तर हा आतांच खेळ बंद करतें !

**जीव०**—सोडचिठ्ठी कशाला पाहिजे ? त्यांचे पैसे त्यांना परत दे ह्मणजे झालें !

**नटी:**—तें तर खरेंच, पण हा सर्व मंडप, सामान, सोंगांचे अलंकार इ० हें सर्व त्यांच्याच पैशानें तयार झालें आहे, व तें आपल्या इच्छेनें जसें सांगतात त्याप्रमाणें मी नुसता खेळ करणारी आहें; यांत माझ्याकडे दोष तो कोणता ?

**जीव०**—ते आमचे बंधू महामूर्ख आहेत ! त्यांना आपलें हितानहित कळतें, तर ते असे पैसे कां खर्च करते ? तें कांहीं असो. पण तूं चालती हो येथून, ह्मणजे मग ते खेळ काय पहातील ?

**नटी:**—महाराज, ते तर मूर्ख आहेतच, पण आपणही एकवार मूर्खपणांत आला होता ना ?

**जीव०**—पण याला कारण तूंच ! तूं खेळ नसता मांडलास तर आह्मी मूर्ख कां झालों असतों ?

**नटी:**—मीं तर खेळ मांडला खराच, पण पहाणें न पहाणें हें तर आपल्या इच्छेवर आहे ना ?

जीव०—हें मात्र तूं खरें बोललीसः—पण करावें काय ? हा तुझा सुंदर वेष पाहिला म्हणजे मोहच पडतो. परिणामाकडे पाहून विचार केला म्हणजे स्वतःचा सर्वस्वीं नाश दिसतो.

नटीः—महाराज, अशी जर आपल्याला सारासारविचारशक्ति आहे, तर मग आपणच खेळांतून चालते व्हा म्हणजे झालें ? दुसऱ्यानें कोणी पाहूंच नये, असा तरी विनाकारण आपला आग्रह कां ?

जीव०—नटी, शाबास तूं धूर्त तर खरीच ! पहा मी तुझा मंडप जाळणार होतों; पण तूं हळूं हळूं आपल्या मृदु भाषणांनीं मलाच गचांडी देण्याचा बेत आणला आहेस ! छेः छेः तुझें बोलणें सुद्धां ऐकून उपयोग नाहीं, तें नुसतें ऐकिलें तरी मोह पडतो. तूं मोठी दगाबाज व विश्वासघातकी आहेस. प्रथम तर मोहित करून टाकतेस ! आणि मागून फांशीं लावतेस.

नटीः—( रागानें ) शिव ! शिव ! अरे, सारासारविचारशीला तुझ्या मुखांतून अशीं दुर्भाषणें निघावींतना ? अरे मी जगन्नाटक सूत्रधाराची स्त्री महा नटी असून, तुम्हां क्षुद्र जीवांचा नाश करीन काय ? असें करण्यांत मला कोणता पुरुषार्थ मिळणार आहे ? हें माझें जगन्नाटक बोधरूप असून तुम्हांला आनंद देण्याकरितांच आहे. यांतून तुम्हीं चांगला बोध घ्याल, तर तुमचें पैसे सार्थकीं लागले असें तुम्हांला वाटेल, आणि वाईट बोध घ्याल तर तुमचे पैसे व्यर्थ गेले असें समजून स्वस्थ बसा. अरे कशाला, फार लांब जावयास नको ! तूंच आपला विचार करून पाहीसना ? सर्वांप्रमाणें तूंही पैसे

भरले होतेस ना? मग तुला जी ही सदसद्विचार करण्याची शक्ति आली, व नाटकास कंटाळून येणें बंद केलेंस, याला कोणाचा उपदेश कारण झाला हें सांग पाहूं?

**जीव०**—हो, हें मात्र अगदीं खरें! तूं जो नाटक पाहूं नव्हे म्हणून उपदेश केलास, त्याच्याचपासून मीं हा बोध घेतला.

**नटीः**—हें तर अगदीं खरें ना? म्हणूनच माझा उपदेश ऐकून माझाच मंडप, माझेंच सामानसुमान जाळण्यास तयार झालास! दगाबाजी व विश्वासघात जो म्हणतात तो हाच बरें!

**जीव०**—हे, महानटी, आतां मात्र मी अगदीं निरुत्तर झालों खरा! आणि दोषीही ठरलों. तुझ्या अंगांत एवढें अगाध सामर्थ्य आहे हें मला आतां कळलें! तुझी तर सहज लीला होईल, पण माझे मात्र एखादेवेळीं प्राण जातील. मीं एक नाटक पाहिलें इतकेंच पुरें आहे. याचे पैसे वजा करून घेऊन बाकी रहातील ते माझे मला परत दे म्हणजे मी आपला स्वस्थ होईन.

**नटीः**—(मनांत) बरीच पीडा टळते! याच्या नादानें माझे आणखी प्रेक्षक बिथरले असते (उघड) ही तर तुझीच इच्छा. पण माझ्याजवळ रोख पैसे नाहींत. हें सामान आहे, यांतून तुला जें पाहिजे तें खुशाल घेऊन जा. न्यूनाधिकाचा विचार करूं नकोस!

**जीव०**—( मनांत ) हिच्याजवळ तर अपूर्व वस्तू अनंत आहेत! यांतून घ्यावें तरी काय, अशा विचा-

रांत निमग्न आहे तोंच, अत्यंत प्रियसखा जो ( सद्गुरु ) यानें येऊन हळूंच कानांत सांगितलें कीं, अरे, उद्यां तुझें लग्न मुक्ताबाई मुलीशीं लागणार आहे. पहातोस काय ? घाल झडप आणि उडीव हिचा खास शालू व दागिने ! दुसऱ्या कशाला शिवूं नकोस, पहा तर काय मजा होते ती ?

**जीव०**— मित्रा, ही तर परस्त्री आहेना ? हिला स्पर्श कसा करूं ?

**मित्रः**—( सद्गुरु):–अरे ही नांवाची मात्र **परस्त्री** आहे, पण ही नेहमीं **परपुरुषासक्त**च असते; आणि **परपुरुषाच्या** इच्छेनेंच **परपुरुषांत** नाटक रचून मोह पाडते. ही खरी बायको असती तर तुला मीं स्पर्श तरी करूं दिला असता का ?

हीं विश्वासाचीं वाक्यें कानीं पडतांच, एकदम पदर धरून ओढल्याबरोबर भ्रमाचें भांडवल फुटलें ! दागिने काढतांच स्त्रीवेष गेला, आणि नीट न्याहाळून पहातो तोंच आपला **माधवराव** ! मग काय विचारतां ?

**जीव०**—वाहवा ! **माधवराव**, आपल्यास सोंग घेऊन स्त्री होण्याची इच्छा कधींपासून झाली सांगा पाहूं ?

**माधवराव ( ईश्वर ):**—शाबास ! **जीवनराव** ! एकुण हें अपयश आमच्याच डोक्यावर ठेवतां ? तुम्हालाच नाटक पहाण्याची इच्छा होऊन, तुम्हीं सर्वत्रांनीं मिळून पैसे गोळा केलेत व आमच्याकडून खेळ करविलात ! एवढ्याकरितांच स्त्रीवेष घेणें भाग पडलें !

**जीव०**—सारांश तुह्मी तरी मोठें कुशल आहांत ! सोंगांत तुह्मीं अगदींच ओळखूं आलां नाहीं ! तुमचें

रूप अगदींच पालटून गेल्यामुळें आह्मी मोह पावून अगदीं वेड्यासारखे झालों!

**माधव०**—तें खरें, पण मूळ, तुह्मी माझ्या शब्दाचीच अगदीं ओळख विसरलात; ह्मणूनच इतकें व्यामोहांत पडलात! तीच ओळख पक्की ठेविली असतीत, तर तुह्मांला खेळ पहातांनाच वाटलें असतें कीं, अरे, हा तर आपला माधवराव आहे! नुसती सोंगाची बतावणी हा करीत आहे? मग तुह्मीं व्यामोहांत पडला असता काय?

**जीव०**—ही तर माझी चूक खरीच! पण मित्रा, तूं हा नाटकी स्वभाव सोडून दे! ही नसती उठाठेव तुला पाहिजे तरी कशाला?

**माधव०**—काय करूं! मला देखील कंटाळा आहे! पण मी एक खेळ करून जों स्वस्थ निजतों आहें, तोंच सकाळीं पुन्हां प्रेक्षक आपले उशाशीं तयार आहेतच! आज अमुक खेळ होऊं द्या ह्मणून सांगतात, व मागल्याच खेळाचे वेळीं पुढच्या खेळाचे पैसे जमा करून ठेवतात, मग माझा कांहींच उपाय चालत नाहींसा होतो. काय करूं सांगा.

**जीव०**—मित्रा, तूं एकवार यांचे पैसे ठार बुडवून टाक, ह्मणजे हे एकदांचे पोटभर रडतील आणि स्वस्थ होतील! जसें व्यसनाधीन मनुष्याचें व्यसन सुटल्यावर त्याला सुख होतें, तसेच यांनाही होईल.

**माधव०**—मित्रा, युक्ति तर खाशी सांगितलीस. अरे, आपल्याजवळ कांहीं असल्यास दुसऱ्यांस द्यावें हें उत्तम; नसल्यास दुसऱ्यांचें तरी घेऊं नये. मा-

ड्यापाशीं स्वतःचें जर विचारशील, तर कांहीं एक नाहीं. मी आपला **केवल** आहें. माझ्या अंगावर जो तूं हा पोषाख पहातोस, हा देखील दुसऱ्यांच्या पैशांचा आहे; तो सोंगांत उपयोगीं पडतो. मी कोणास कांहीं देत नाहीं, व कोणाचें कांहीं घेत नाहीं. ते बिचारे परिश्रम करतात, जीव गहाण टाकतात, आणि कसे तरी पैसे गोळा करून, माझ्या हातून व्यवस्था करवितात. ती कां ह्मणशील तर, मी निरभिलाष आहें, व स्वतः यांतून कशालाही न शिवतां, त्यांच्या मर्जीप्रमाणेंच व्यवस्था करतों, असा जोंपर्यंत त्यांचा पूर्ण विश्वास माझ्या ठिकाणीं आहे, तोंपर्यंत मला त्यांचे पैसे कसे बुडवितां येतील बरें? त्यांची इच्छा असेल तसें मी अगदीं बरोबर करतों; किंबहुना असेंच ह्मटलें तरी चालेल कीं, जी त्यां सर्वत्रांची इच्छा तीच माझी इच्छा. मला स्वतःला कांहींच कर्तव्य नसल्यामुळें मी अगदीं निरिच्छ आहें.

**जीव०**—मित्रा, तुझा थाट पाहिला, ह्मणजे तूं तर अगदीं साक्षात् लक्ष्मीपति दिसतोस? आणि ह्मणतोस मात्र कीं, “ मी आपला **केवल** आहें, **निरिच्छ** आहें, दुसऱ्यांची **इच्छा** तीच माझी **इच्छा**. ” असेंच जर आहे तर त्या मूर्ख लोकांस आपलें हितानहित कळत नाहीं, त्यामुळें ते मोहांत पडून मरतात. पण अशी जी ही त्यांची घातुक इच्छा, ती तरी तुझीच इच्छा झाली ना?

**माधव०**—मित्रा, तूं तर मला यावेळीं खूपच पेंचांत धरलेंस? पण थोडा विचार कर कीं मीं काय

ह्मटलें तें ? अरे, मी स्वतः अगदीं निरिच्छ आहें. मी तुमचा हितेच्छु आहें, असें तर ह्मटलें नाहींना ? तुह्मी आपल्या हिताची इच्छा ठेवाल, तर हित होईल, आणि वाईट इच्छा ठेवाल, तर वाईट होईल. आरशांत तुह्मी आपलें तोंड सरळ, वांकडें, जसें पहाल तसें दिसेल.

जीव०—हें खरें, पण आरसा कोणास हाक मारून माझ्यांत आपलें तोंड पहाहो ! असें सांगत नाहीं. तूं तर जगन्नाटकसूत्रधार बनून बसला आहेत ? हवी तशी बतावणी करून, आमच्यासारख्या अज्ञ जीवांना वेडे ठरवून फजिती करवितोस ? आणि शेवटीं आपण आपला दूरच्या दूर आणि निरिच्छच. ठीकच आहे, मोठ्यांना सर्व शोभतें.

माधव०—मित्रा, अरे तूं तर सारासारविचारशील आहेस ? मग एकदम माझ्याविषयीं विपरीत कल्पना करून असा रागावतोस कां ? शांतपणें विचार कर. अरे, जसा आरसा तोंड पहाण्यास हाक मारीत नाहीं, तसा मी तरी कधीं म्हणतों कीं मी नाटक करतों आहें, तुह्मीं पहावयास या म्हणून ? तुमचें तुम्हींच नानाविध कर्मरूपी द्रव्य गोळा करून, चतुर्दश भुवनात्मक सृष्टिमंडप निर्माण करवितां, अनंतविध सुखदुःखात्मक, भोग्य विषयरूप भूषणें निर्माण करतां, व कर्मानुरूप त्यांचा उपभोग घेतां, आणि या सर्वांचा व्यवस्थापक म्हणून कोणाला तरी " ईश्वर " असें नांव देतां, म्ह० " जगन्नाटकसूत्रधार " म्हणतां, कोणी सोंगें घेऊन नाचतां म्ह० विषयी जीव होतां,

कोणी नाटकांतलाच उपदेश घेऊन, प्रेक्षकरूपी ज्ञानी बनतां, आणि नट कोठें चुकतो हें पहात बसतां. म्हणूनच मोठ्यांना सर्व शोभतें. ही व्यंगोक्ति तुझ्या मुखांतून निघालीना?

जीव०—मित्रा, क्षमा कर, रागावूं नकोस. जीवांनींच जर ईश्वर केला आहे, तर मग तो जीवांच्याच स्वाधीन असला पाहिजे व हवा तेव्हां दिसला पाहिजे.

माधव०—मग मी इतका वेळ बोललों तें काय? अरे, ह्मणूनच तर नट प्रेक्षकाधीन आहे; व त्यांच्या इच्छेनुरूपच खेळ करतो. त्यांच्या इच्छेच्या अधीन झाल्यामुळें हा जीव त्याचा अनादर करून त्याला विश्वरूपानें न पाहतां नानाविध सोंगांच्या रूपानें पहातो; व तो मी ईश्वर आहें असें ह्मणत नाहीं. त्याचप्रमाणें आरसा माझ्यांत तोंड पहा असें कोणाला ह्मणत नाहीं, कारण तो तटस्थ आहे!

जीव०—मित्रा, तूं मला घोटाळ्यांत फार टाकतोस; व बोलून पुन्हां निसटून जातोस. जीवांनींच आपल्या कर्मांनीं सृष्टि केली, भोग्य विषय केले, तेच आपल्या इच्छेनें हवें तसें करून घेतात, म्ह० ईश्वर सुद्धां तेच बनवितात आणि ही सारी घडामोड तेच करतात. असें जर आहे, तर हे स्वतंत्र जीव तरी कोणी निर्माण केले असतीलना? किंवा ते अपोआपच झाले?

माधव०—अरे, ईश्वराकडे ईश्वरत्व जर **जीवांनीं** दिलें आहे, तर त्यांना आतां निर्माण करणारा दुसरा कोण, व कोठून येणार? ते आपण स्वतःच जीव झाले असें म्हणण्यास कोणता बाध आहे?

**जीव०**—हें तुझें बोलणें अगदीं फसवणुकीचें आहे. ईश्वर कधीं मरत नाहीं. हा जीव नित्य मरणार. जन्म घेणार–हिंडत फिरणार. रडत फिरणार. अशाला का तूं स्वतंत्र म्हणणार ? म्ह० भिकाऱ्यानें राजास राज्य द्यावें आणि आपण स्वतः भिकारी राहून भिक्षा मागत फिरावें ! त्यांतलाच हा प्रकार आहे असें म्हटलें पाहिजे ?

**माधव०**—मित्रा, फार चांगलें बोललास. हीं तुझीं भाषणें अगदीं अक्षरशः खरीं आहेत ! खरोखर, हा जीव मूळचा राजा असून, त्रिभुवनैश्वर्यराज्य हें खास याचेंच असून, यानें आपले इच्छेनेंच आपलेकडे भिकारपण घेऊन हें सर्व राज्य ईश्वराकडे सोंपविलें आहे; आणि रोज भिक्षा मागण्याची संवय गोड लागल्यानें आपलें सर्व ऐश्वर्य विसरून भटकत फिरतो, याला दुसऱ्यानें तरी काय करावें ?

**जीव०**—असेंच जर आहे तर ईश्वरानें याचें राज्य याला परत देऊन सुखी कां न करावें ?

**माधव०**—अरे पण ईश्वरानें तें घेतलें असेल तर देईलना ? जीवांनींच जर दिलें आहे, तर ते आपल्या खुषीनें जेव्हां परत घेतील तेव्हां घेवोत ? मला राज्य द्या असेंही ईश्वरानें ह्मटलें नाहीं व तुह्मी जीव आपलें राज्य परत घ्याल तेव्हांही तो रोंकणार नाहीं ! म्हणूनच तो **निरिच्छ** अतएव निरभिलाष आहे.

**जीव०**—मित्रा, सारांश हा आमचाच मूर्खपणा आहे कीं आह्मी आपलें राज्य सोडून भिक्षा मागत फिरत आहोंत.

**माधव०**—यांत संशय तो कोणता ?

**जीव०**—मित्रा, हें मला कबूल आहे; पण आंधळ्याला मार्ग दाखविणें आणि विसरलेल्यास ठिकाणावर आणणें, हें तर शहाण्यानेंच केलें पाहिजेना?

**माध०**—ठीक, ठीक, ही गोष्ट अगदीं कबूल आहे, पण ज्यांना आह्मी विसरलों आहोंत, इतकेंच जरी वाटेल तरी ते ठिकाणावर येण्याचा उपदेश ऐकतील, आणि ज्यांना आह्मीं चुकलोंच नाहीं असा अभिमान असेल, ते तर उपदेश करणाराच चुकला आहे असें ह्मणतील व यथेच्छ हवें तसें वागतील. आणि त्या वागणुकीपासून जो कांहीं बरा वाईट परिणाम होईल तो ते भोगतील. लांब कशाला! मीं जो काल नटीच्या वेषानें " नाटक पाहणें वाईट आहे " ह्मणून उपदेश केला, हा सर्व प्रेक्षकांसमोर सारखाच केलाना? मग त्यांत उपदेश ग्रहण करून या इतक्या गोष्टींचा निर्णय करून अखेरीस थांग तूंच लावलासना? झालें. आतां तुझें नाटक संपलें, आणि कदाचित् पहाशीलच तर तुला त्यापासून व्यामोह पडणार नाहीं! पण हे जे तुझे दुसरे नादिष्ट बंधु आहेत, ते कधींच उपदेश ग्रहण करणार नाहींत, यामुळें यांच्या वासनाही कधीं तृप्त होणार नाहींत. व त्या तृप्त होण्याकरितां भोगार्थ ते पुनःपुनः कर्में करीत जातील. त्यांच्या फलांचा उपभोग घेतील व पुनः कर्में करतील, असें हें अखंड जगन्नाटग संपावयासच नको! मी एक सृष्टिरूप नाटकाचा खेळ करून प्रलय–निद्रा घेतों, तिच्यांत हे प्रेक्षकही वासनारूपानें निजतात. मला उठावयाची इच्छा नसते, पण या प्रेक्षकांची **कर्मभोगरूप प्रभात** झाली कीं हे लोक जबरदस्तीनें मला जागें क-

रून पुनः सृष्टिरूप नाटकास मजकडून आरंभ करवितात! हें रहाटगाडगें असेंच **अनादि–अनंत** चालणार. यामुळें झालें काय? कीं प्रेक्षक–आणि नट ह्मणजे **जीव** आणि **ईश्वर**–हे पूर्वी एकच स्वभावाचे होते व हल्लींही एकच स्वभावाचे ह्मणजे दोघेही नादिष्ट आहेत आणि दोघांच्या वासना एकदम शांत होतील तर पुनः एकरूप आहेत तसेच आहेत.

**जीव०**—मित्रा, एकूण या दोघांस दोन भिन्न वासना झाल्या; तर मग प्रेक्षक आणि नट ह्मणजे **जीव** आणि **ईश्वर** हे दोन झालेना?

**माधव०**—तूं तर अगदीं माझी चूकच काढण्यास टपला आहेस. अरे, मीं वर काय सांगितलें आहे? कीं आरसा आणि ईश्वर हे दोघेही तटस्थ स्वभावाचे अगदीं निरिच्छ आहेत, ह्मणजे त्यांस ईश्वर आणि आरसा व्हावें अशी मुळांतच वासना नाहीं. तोंड पहाणारा आपल्या वासनेनुरूप आरसा तयार करितो आणि तोंड पाहण्याचें कार्य आरशानें केलें असें म्हणतो. या ह्मणण्यानें आरशाकडे कांहीं कार्य-कर्तृत्व येत नाहीं; त्याचप्रमाणें जीवानें आपल्या वासनानुरूप प्रचंड खटपटी उभ्या करून ईश्वर–माया–नामरूपात्मक सृष्टि निर्माण करून यथेच्छ वागतो, ह्मणून परमात्म्याकडे कर्तृत्वभाव येईल कीं काय? तो **अखंड–चिद्‌घन** व्यापकस्वरूपच आहे.

**जीव०**—मित्रा, एकूण या अनंत कोटी ब्रह्मांडरचनेस मूळ कारण जीवाची ह्मणजे आमची **वासनाच** कारणीभूत झालीना? ही गेल्यावांचून आमचा **जीवभाव** जाऊन परमात्मरूपता येणार नाहीं हें ठरलें तर

मग आतां हा जीवभाव जावा तरी कसा, तें कृपा करून सांग!!

**माधव०**---मित्रा, ज्यानें तुला बुद्धिरूप नटीचे अज्ञानकृत दागिने आणि वस्त्रें हरण करून माझें खोटें व्यक्तरूप नाहींसें करवून, खरें अव्यक्तरूप प्रत्यक्ष दाखविलें, त्या सद्गुरूस शरण जा आणि त्याचे पाय धर, ह्मणजे तो तुला–जीवभाव नाहींसा करून–परमात्मभाव येण्याची युक्ति दाखवील, आणि असें होईल तरच तूं कृतार्थ होशील—

प्रिय सूज्ञ वाचक हो, जीवनराव आणि माधवराव, या नांवांनीं जो हा वर संवाद लिहिला आहे तो प्रश्नोत्तररूपानें जीवाशीं व प्रकृति-पुरुषाशीं झालेला असा दाखविला आहे; यावरून प्रारंभापासून प्रकृति-पुरुष व नामरूप यांच्या व्यक्ताव्यक्ततेचें विवेचन तुमच्या पूर्ण ध्यानांत आलेंच असेल; ही इतकी घडामोड होण्याचें कारण काय? हा जो प्रश्न बाकी राहिला होता त्याचाही शेवटीं निकाल लागलाच; ह्मणजे या सर्वांस मूळ कारण जिवाच्या वासना असल्यामुळें त्या कधींच सर्वांच्या एकदम नाहींशा व्हावयास नकोत, आणि हा जगद्रूपी रहाट पाळणा थांबावयास नको.

याचा आरंभ कधीं झाला आणि शेवट कधीं होणार, याचा पत्ता नसल्यामुळें **जीव–ईश–माया** आणि **जगत्**, हीं सर्व अनादिसिद्ध आहेत असेंच म्हटलें पाहिजे. जीवास जी सारासारविचारशक्ति आहे, तिच्या बळावर आणि सद्गुरूच्या बोधरूपी पाठबळावर आपल्याच अज्ञानानें आणलेला हा जीवभाव टाकून दे-

णें–हाच परमात्मभाव आणणें होय.–अंधक झालेला आरसा स्वच्छ करण्यास प्रयत्न लागतो, तोंड पाहण्यास प्रयत्न नको, तें आपोआपच दिसूं लागतें. तद्वत् हा जीवभाव नाहींसा करण्यासच प्रयत्न केले पाहिजेत; पुढें परमात्मभाव स्वतःसिद्धच आहे. हे दोन पक्ष मूळांत नसून वासनेनेंच जबरदस्तीनें केले आहेत. तिचा नाश करणें इतकेंच काय तें जिवाचें मुख्य कर्तव्य आहे.

यावर आमच्या वाचकांपैकीं कोणी असेंही म्हणण्याचा संभव आहे कीं, लेखकानें प्रपंचरचनेचें एवढें मोठें अवडंबर घातलें, जीवशिवांचा एवढा मोठा खटाटोप उभा केला, आणि म्हणे काय तर " या सर्वांच्या अनादि उत्पत्तीला मूळकारण जीवांच्या वासना ! ! या वासनांचा क्षय करणें ह्मणजे परमात्मभाव येणें म्हणून हेंच अवश्य कर्तव्य आहे. " हें एवढें सांगणें ह्मणजे पहाड कोरून उंदीर काढण्यासारखें होय; यापलीकडे जास्त कांहीं नाहीं. आह्माला वाटलें होतें कीं, या प्रचंड खटल्याच्या निवृत्तीकरितां कांहीं तरी तसाच प्रचंड उपाय योजिला असेल, परंतु हें अशा प्रकारचेंच क्षुल्लक कारण असेल तर यांत कांहींच प्रयत्न नकोत. जेव्हां जेव्हां ज्या ज्या वासना येतील तेव्हां तेव्हां तदनुकूल विषय भोगले ह्मणजे त्या तृप्त होऊन शांतही होतील. आणि एक दिवस मेलें ह्मणजे सर्वच आटोपलें.–मग पुढें वासना यायलाही नकोत व त्या शांत करण्याची काळजीही करणें नको. कारण मेल्यावर कोणी परत येऊन असें सांगत नाहीं कीं, माझी अमुक वासना राहिली ह्मणून मला पुनः यावें लागलें.

झालें. अर्थात् हा जीव मेला ह्मणजे परमात्म्यांत लीन झालाच; आणि तुह्मींही वर सांगितलेंच आहे कीं, "ही सृष्टि परमात्म्यांतून निघते, त्याच्यांतच रहाते व पुनः त्याच्यांतच लीन होते"–चित्रकारानें आपल्या इच्छेनुरूप चित्रें केलीं; पुनः मोडून मृत्तिकेंत मिळविलीं व पुनः केलीं. यांत ज्या मृत्तिकेचें पूर्वी जें चित्र होतें, तीच मृत्तिका पुनः त्याच चित्रांत आली असें होऊंच शकत नाहीं; मग आह्मी मेलों, आणि पुनः आह्मीच आलों हें कशावरून? परमात्मा अनंत आहे, त्यांतून हव्या तितक्या नव्या जीवांस उत्पन्न होतां येत नाहीं कीं काय? आह्मींच जन्मास यावें अशी तरी लेखकाची आमच्यावर जबरदस्ती काय ह्मणून? या शंकेचें उत्तर असें आहे कीं, तुह्मीं जें जीवांचें जन्म आणि मरण पहातां, हें जन्ममरण जीवांचें नसून देहाचें आहे; आणि देह जीव नसून, नुसतें जीवाच्या रहाण्याचें भाड्याचें घर आहे; तेंही सत्तेचें नाहीं. यांत राहणारा जीव हा कोणी तरी वेगळा आहे. देह जीव नाहीं हें तर आपल्यापैकीं प्रत्येकाला कबूल असलेंच पाहिजे; नाहीं ह्मणतां येतच नाहीं. कारण देहच जर जीव आहे असें म्हणावें तर मग प्रेतदहन होतां कामा नये. अर्थात् हा देह जीव नाहीं हें सिद्ध झालें. जीव कोणी वेगळाच आहे ही गोष्ट आपल्याला कबूल केलीच पाहिजे. बरें आपण दृष्टीनें देहाला पहातों किंवा जीवाला पहातों? नेत्रांच्या दृष्टीनें जीव दिसणें कधींच शक्य होणार नाहीं. शरीराचें चलनवलन व क्रिया जोंपर्यंत चालू आहेत, तोंपर्यंतच अमुक मनुष्य जिवंत आहे असें

आपण म्हणतों, आणि तीच क्रिया व चलनवलन हीं बंद पडलीं ह्मणजे याचा जीव गेला हो!! असें आपण ह्मणतों. यांत शरीराचीच क्रिया नेत्रांनीं पाहिली, जीव तर पाहिला नाहींना? तेव्हां शरीरांत जीवाचें अस्तित्व कोणत्याही अन्य साधनानें व्यक्त होण्याचा मार्गच नाहीं. जें कराल त्यापासून क्रियाच दृष्टी पडेल. आणि तिच्यावरून यांत जीव आहे किंवा नाहीं असें आपल्याला **कल्पनेनें**च ग्रहण करावें लागेल, अन्य मार्गच नाहीं. वाचक हो, आतां आणखी थोडेसे अलीकडे या, ह्मणजे तुम्हाला कळून येईल कीं, दुसऱ्याच्या शरीरांतील चलनवलनावरून जीवाचें अस्तित्व किंवा नास्तित्व समजण्यास तुमची कल्पना उपयोगीं पडली. आतां तुमचें शरीर आणि चलनवलनादिक क्रिया हीं सर्व तुमचीं तुह्मीच पहात आहांतना? तेव्हां तुमच्या स्वतः-च्या अस्तित्वाविषयीं तुमची स्वतःचीच कल्पना उपयोगांत आणाल, किंवा दुसऱ्याची उसनवार आणली पाहिजे? जर शरीर आणि इंद्रियादि व्यापार हीं तुमचीं तुम्हालाच दृष्टीनें दिसत आहेत, तर मग दिसणारी वस्तु तुह्मी **जीव** नाहीं हें तर वर ठरलेंच आहे. आतां निर्व्यापार होऊन तुह्मी आपल्या अस्तित्वाचा विचार करूं लागलांत, ह्मणजे **मी आहें** इतकीच तुह्माला कल्पना राहील, या पलीकडे जातां येईल तो सुदिनच समजला पाहिजे!! अर्थात् जेव्हां तुमचें तुम्हाला अस्तित्व स्फुरेल, तेव्हां **मी आहें** या कल्पनेनें वेष्टितच सांपडेल. वेगळी प्रतीति येणारच नाहीं. यावरून तुह्मी **कल्पनारूप**च झालांत; ह्मणजे कल्पना हेंच तुमचें अ-

थवा जीवाचें रूप झालें. आतां कल्पना–वासना–आणि संकल्प हे एकाच अर्थाचे पर्यायशब्द आहेत, त्याअर्थीं **वासना** ज्या दिवशीं मरतील, तोच तुमचा ह्मणजे जीवपणाचा खरा **मृत्यु** आणि या वासना जोंपर्यंत जिवंत आहेत, तोंपर्यंत तुह्मी म्ह० **जीवपणा** जिवंत आहे!! दृष्टीनें जें तुह्मीं जीवांचें जन्ममरण पहात आहांत, हें देहाचें जन्ममरण आणि जीवांचें वेषांतर आहे. यामुळें अनंत कोटी कल्पापर्यंत सृष्टिचक्रांतून या जीवाची सुटका होत नाहीं. तो वेषांतरें आणि लोकांतरें करीत भटकत फिरत आहे. त्याला क्षणभर सुद्धां बसण्याकरितां निर्वेध विश्रांतिस्थान कधींच व कोठेंच सांपडत नाहीं, एकसारखा वासनाप्रवाहांत अति वेगानें धांवत जात आहे. कधीं थांबेल तो थांबो!! असो. आतां जीवांच्या वासनात्मकरूप सिद्ध्यर्थ वाचकांस आणखी दोन गोष्टी सांगतों, त्या नीट रीतीनें लक्षांत ठेविल्या पाहिजेत.

पहा, आपल्यास जेव्हां गाढ निद्रा लागते, तेव्हां कोणतीही वासना नसते, ह्मणून मोठें सुख होतें असें आपल्याला वाटतें, व कांहीं अंशीं तें खरेंही आहे; पण खरें निर्वासनिक सुख जें आहे, तें अगदीं वेगळेंच आहे; त्याचा यत्किंचित् लेश यांत आहे असें मात्र ह्मणतां येईल, कारण गाढ निद्रेंत देखील वासना पिंड सोडीत नाहीं. ती तिच्यांत असल्याच्या योगानेंच पुन्हां जागृति येते. रोज रात्रीं निजावयाचें, सकाळीं उठावयाचें, हा नित्याचा दृढ संकल्प, अंगवळणीं पडल्यामुळें तिकडे कोणीच लक्ष देत नाहीं. प्रबळ नैमि-

त्तिक वासना आल्या ह्मणजे पहा कसें होतें तें? समजा, कोणी येऊन सांगितलें कीं आज तुम्हाला रात्रीं सर्पदंश होणार आहे! मग काय विचारावयाचें, सारे रात्रभर रावसाहेबांची मजा पहावी! शिक्यांत अधर लोंबत जागत बसतील! झोंपेचा पत्ता नाहीं! याचें कारण काय? तर सर्पवासना प्रबल झाली ह्मणून! बरें, निजतेवेळीं सकाळीं तीन वाजतां, उठण्याचा प्रबल संकल्प झाला असल्यास, पहाटें तीन वाजतांच्या ठोक्याबरोबर जो डोळा आपला आपण उघडतो, हा कशानें? तर प्रबल वासना जी गाढ निद्रेंत लीन होती तिच्या योगानें. त्याच वेळेवर तिनें बाहेर ढकललें. तुह्मी निजलांत खरें, पण वासना जागी राहून तिनाच्या ठोक्याची वाट पहात बसली होती. वाचकहो, ही गोष्ट ध्यानांत आलीना? असो.

आतां, आपण स्वप्नाचा विचार करूं. या अवस्थेंत तर तुमचा देह, इंद्रियें, भोग्यविषय व अनंत प्रकारचे देखावे इ० सर्वच काल्पनिक आहेत; आणि या सर्वांस निर्माण करणारी केवळ तुमची कल्पनाच आहेना? कीं, बाहेरचे सृष्ट पदार्थ त्या ठिकाणीं येतात? विचार करा. स्वप्नावस्थेंतही तुम्हांला आपलें अस्तित्व कल्पनारूपच भासतें, ह्म० तुह्मीं स्वतः कल्पनारूपच अहांत, आणि तिच्या अचिंत्य बलावर, तुह्मी काल्पनिक सृष्टिही रचूं शकतां, म्ह० त्या सृष्टीच्या अस्तित्वास कल्पनाच कारण झाली. आतां, तुमच्या म्ह० जीवाच्या अस्तित्वास आणि तुमच्या निर्मित सृष्टीच्या अस्तित्वास तुमचीच कल्पना कारण झालीना? ही

गोष्ट तुम्हांला कबूल करावीच लागेल. कारण, कार्य कारणस्वरूप असतें, हा तर आपला पाठ झालेला धडाच आहे. तर मग अर्थात, जीवाला आणि जीवसृष्टीला मूल **बीज** कारण कल्पनाच झालीना? बरें, आतां सूज्ञ वाचकहो, कल्पना, वासना आणि संकल्प, या तिघांचें एकरूप आहे असें मनांत आणून, आपल्या विशाल बुद्धिपटलावर, या लहानशा काल्पनिक सृष्टीच्या नकाशास जितका तुमच्याच्यानें मोठा काढवेल तितका काढून पहा, ह्मणजे शेवटीं अनंत कोटी ब्रह्मांडांचें आणि जीवांचें मूल बीज वासनाच सांपडेल, दुसरें कांहीं हातीं लागणार नाहीं. असो.

आतां एक जागृतीचें उदाहरण देऊन हें प्रकरण संपवितों. वाचकहो, विचार करा कीं आपण एखादे दिवशीं कांहीं घरगुती कामांत अथवा चैनीनें करमणुकींत निमग्न असतां, अरे! मी काय वेड्यासारखा स्वस्थ बसलों आहे! छेः! मोठीच चूक झाली! उद्यां रविवारीं अमुक जरूरीच्या कामाकरितां बरोबर तीन वाजतां घरीं भेटा, म्हणून अधिकारी साहेबांनीं मला आज्ञा केली असून मी या नादांत गुंतल्यामुळें चार वाजले! आतां साहेब काय ह्मणतील बरें? असें जवळ असलेल्या गृहस्थांस सांगून एकदम पोषाख चढवून, जरूरीचे कागदपत्र इ० बरोबर घेऊन, सारी करमणूक सोडून चालते होतां, याचें कारण काय तें लक्षांत आलें का? ह्म० रविवारीं तीन वाजतां जाण्याचा संकल्प काल शनवारींच ठरला. यांत सूक्ष्म विचार करून पहा कीं, दुसऱ्या दिवशींचा वेळ पहिले दिवशींच संकल्पांत

दृढ गुंफला गेला. यांत दुसऱ्या दिवशींच्या तिसऱ्या तासाचें आणि संकल्पाचें अत्यंत ऐक्य झालें ह्मणजे **वेळरूपी भूमींत संकल्परूप बीज** पेरलें गेलें. याचा कोंब उगवण्याकरितां दुसऱ्या दिवशींच्या तिसऱ्या तासाची वाट पहात बसला आहे, आणि वेळ नियमित ठरल्यामुळें मधल्या वेळेंत तुह्मीं निष्काळजीपणानें आपल्या दुसऱ्या संकल्पानुरूप उद्योगांत निमग्न झालांत; तें इतकें कीं, दृढ संकल्पाला सुद्धां विसरलांत ! ! पण तुमचा विसर त्या संकल्पाला कोठें पडला आहे ! ! तो तर त्या वेळेची वाट पहातच बसला होताना ? ती येतांच, जसा वारंटानें कैदी पकडून नेला जातो, तद्वत् तुमच्या दृढ संकल्पानें साऱ्या करमणुकींतून एकदम तुह्माला उचलून नेलें ! ! कां समजलांत ना आतां ? हातांतून बाण सुटल्यावर जसा निशाण उडविल्यावांचून रहात नाहीं, त्याचप्रमाणें अनंत जीवांनीं, अनंत संकल्प व अनंत प्रकारच्या इच्छा धारण करून, अनंत कालापासून अनंत भोगार्थ जें केलें व करीत आहेत आणि करतील या सर्वांचेंही अनादि अनंत **सृष्टि** हें फल आहे; आणि या फलाचें बीज वासनारूप अनंत आहे. भोगरूप–सृष्टि–फलांच्या उपभोगार्थ या जीवांस अनंत कल्पपर्यंत, अनंत प्रकारचीं देहांतरें आणि लोकांतरें करीत सारखें परिभ्रमण करावयाचें आहे. मेला, ह्मणजे देह मात्र पतन पावतो, पण दुसऱ्या देहांत नेणारी वासना, या जीवाचा पिच्छा कोठें सोडते ! ! ती तर राक्षसीसारखी हात धुवून मागें लागली आहे ! सूज्ञ वाचकहो, या राक्षसीच्या तडाक्यांतून सुटणें का पोर-

खेळ आहेत ? इचा नाश करणें ह्मणजे सहज आहे काय ? अथवा असें करणें ह्मणजे पहाड पोंखरून उंदीर काढण्यासारखें झालें कीं काय ? प्रचंड सृष्टीचें हें बीजही प्रचंडच आहे ! व त्याच्या नाशार्थ अति प्रचंडच प्रयत्न झाले पाहिजेत ! ! अनंतकोटी ब्रह्मांडांच्या किमतीपेक्षांही या वासनेची किंमत अधिक असून हिला तुम्हीं क्षुल्लक वस्तू समजलांत काय ? ( राग येऊं नये, ओघास आलेली गोष्ट बोललीच पाहिजे, म्हणून बोलतों. ) जसें एकाद्या रानटी माणसास अति मौल्यवान हिरकणी सांपडली म्हणजे त्याला तिची मुळींच किंमत कळत नाहीं, तो तिला कांच समजतो. पण त्या वेड्याला हें कळत नाहीं कीं, मीं हिला कांच समजल्यानें, हीं तर कांच होत नाहींच, पण मी मात्र मूर्ख व रानटी ठरतों. असो. आतां अशीं अपूर्व व मौल्यवान वासना जर तुमचे तुम्हीच आपल्या अगदीं ताब्यांत घ्याल, तर तुम्हीं इतके श्रीमान् व्हाल कीं, अनंत कोटी ब्रह्मांडें विकत घेऊं शकाल ! ! म्ह० ईश्वरानें जें तुमचें राज्य तुमच्यापासून बळकावून घेतलें आहे असें तुम्हांला वाटतें, तें तुमचें तुम्हीच पुन्हां परत मिळवाल ! आणि मग तुमचें स्वरूप आणि ऐश्वर्य याचें वाणीनें वर्णन होऊं शकणार नाहीं; आणि जावत्कालपर्यंत तुम्हीच वासनेच्या स्वाधीन आहांत, तावत्कालपर्यंत ती राक्षसी रूपानें, तुमच्या पाठीस लागलेलीच रहाणार ! व तुमचें देहांतर, लोकांतर आणि दैन्य हीं स्वप्नांत सुद्धां नाहींशीं होण्याची आशा बाळगूं नका; असेंच चक्रभ्रमण करावें लागेल; कारण, हें चक्र सामान्य नव्हे ! तर

"अखंडमंडलाकारं व्याप्तं येन चराचरं" असें महत् चक्र हें आहे. गोल वर्तुलावर जरी जन्मभर प्रदक्षिणा घातल्या तरी त्याचा शेवट कधींच सांपडणार नाहीं. अशा स्थळीं शहाण्यानें काय करावें? तर जेथें उभा असेल, तेथेंच कांहीं वेळ थांबून खूण ध्यानांत ठेवून पुढें चालूं लागावें, म्हणजे आला आपल्या मूळ पदावर. मित्रहो! या अखंड मंडलांतील हा मनुष्यदेह हीच खूण कायम करून, श्रुतीच्या सरल मार्गानें विचाररूप पावलें टाकित निघालांत, कीं आलांत आपल्या मूल पदावर! म्ह० परमात्म्यांतूनच हा जीव विभक्त झाला, आणि पुन्हां त्याच्यांतच येऊन मिळाला; मग या दोघांच्या ऐक्याचा जो आनंद तेंच तुमचें मूलस्वरूप आणि मूलपद. हीं दोन्ही एकच आहेत. असो. आतां यापेक्षां मला अधीक कांहींच बोलतां येत नाहीं. तुम्हींच शांत मनानें याचा विचार करावा अशी माझी विनंति आहे.

आतां, **प्रकृति-पुरुष-नाम-रूपात्मकसृष्टि** इ० सर्वांचें मूल बीज-कारण-**वासना**, किंवा कल्पना हें आहे. कार्य-कारणस्वरूप न्यायानें, हें सर्व काल्पनिकच आहे; आणि काल्पित पदार्थ कधींच सत्य नसतो असा अनुभव आहे, त्याअर्थीं आतां या सर्वांस मिथ्या ह्मणण्याचा प्रसंग आला. पण यांत असा विचार केला पाहिजे कीं, याला मिथ्या म्हणावें कोणीं? जीवानें म्हणावें, तर जीव हा सृष्टीच्या बाहेरचा नाहीं. जीवानें सृष्टि मिथ्या आहे असें ह्मणणें म्ह० **मी** मिथ्या आहें असेंच झालें. आतां सृष्टींत विचारशील प्राणी काय तो हा एवढा जीवच! हाच जर आपण

आपल्याला मिथ्या म्हणतो, तर सारीच इमारत खचली म्हणावयाची! बरें, जगांत कांहीं सत्य आहे असें तरी म्हणावें कोणीं? आणि तें धुंडून तरी कोणीं काढावें? व त्याचा अनुभव तरी घ्यावा कोणीं? विचार करणारा स्वतः खोटा! विचारार्थ जें हातीं धरावयाचें तेंही खोटें, आणि त्यांतून सार धुंडून काढणार तेंही खोटेंच! मग सत्य ह्मणून कांहीं आहे, असें तरी कशावरून म्हणावें? आणि त्याच्या शोधांत तरी हातीं काय लागणार आहे? अशी महा प्रबल शंका कोणी घेतील, तर मी मोठ्या आनंदानें ही शंका कबूल करून तिचें उत्तर देतों. सूक्ष्म विचार करून पहा कीं, कल्पनारूप बीजापासून सृष्टिरूप वृक्ष निर्माण झाला. हा सामान्य वृक्ष नसून यास **अनंतवृक्ष** हें नांव यथार्थ शोभेल. आतां हा उगवला कोठें हें ध्यानांत आलें का? **जीवरूप** भूमिकेंत वासना–रूप बीज जेथें पडलें आहे, तेथें–भूमीचा आणि बीजाचा संयोग झाला कीं बीजानें बाहेरच्या बाजूस वाढ घेतलीच; म्ह० बीजच वृक्षरूपानें बाहेरच्या बाहेर जोरानें वाढत जातें. ही वाढ कोठपर्यंत? तर फलापर्यंत. आतां जें बीज असतें तेंच फल होतें; आणि पुढें तींच फळें झडून भूमींत पडतात व पुन्हां वृक्ष होतात; असें हें चक्र सारखें चालतें. बीज+वृक्ष+बीज +वृक्ष+बीज–म्ह० वासनेनें भोग–भोगांनीं वासना–पुन्हां भोग; असें हें रहाटगाडगें कल्पनारूप आहे, येथें सृष्टि म्ह० भोग्यविषय असें समजावें. भूमींतून वृक्ष उपटून टाकल्यास नाहींसा होतो, आणि भूमी कायम अ-

सतेच; पण वृक्ष उपटण्याकरितां, भूमीच खणावी लागते. नुसतें फांदीवर बसून किंवा पानें तोडून वृक्ष नाहींसा कधींच होणार नाहीं. बीज स्वतः शुष्कच असतें, पण भूमीगर्भांतील आर्द्र रसानेंच हिरवें वृक्षरूप धारण करून, फल पुष्पवान् होतें; आणि भूमीशीं संयुक्त आहे, तोंपर्यंतच त्यांत वृक्षाचें अस्तित्व असतें. विभक्त झालें कीं शुष्क काष्ठ. आतां पहा, शुष्कबीज व शुष्कफल हीं एकरूपच आहेत; आणि बीजाच्या व फलाच्या मध्य स्थितींत वृक्षाला आर्द्ररूपता आणि अस्तित्व हीं भूमीगर्भाच्या आर्द्ररसानें आलीं; म्ह० बीजसंयोगानें भूमीचा आर्द्ररस वृक्षरूपानें बाहेर आला, त्याला तुह्मी हिरवे रूपानें बाहेर पहात आहां! पण तो स्वस्वरूपानें आंत वेगळाच आहे. असो. आतां मूळ विषय ध्यानांत आणा. वासनारूप बीज मिथ्या; त्यापासून सृष्टिरूप वृक्ष हाही मिथ्या; आणि त्याचें पुन्हां वासनारूप फल हेंही मिथ्याच. पण या सर्वांचा अनुभव जावत्कालपर्यंत होतो, तावत्कालपर्यंत यांत जें सत्यत्व भासतें हें भासण्यापुरतें सत्यत्व तरी मिथ्यापदार्थांत कां आलें? असें जर ह्मणाल, तर पहा कीं तांब्याचा रुपया खोटा असतो; ह्म० त्यांत सोळा आण्यांचें अस्तित्व नाहीं, पण खोटा **रुपया** असें ह्मणवून घेण्यापुरतें तरी निदान रुपयाचें अस्तित्व त्यांत आलेंना? अर्थांत खोट्यासही आपलें खोटेपण राखण्याकरितां **सत्याचा** आश्रय घ्यावा लागतो; त्यावांचून त्याला अस्तित्व येत नाहीं. आणि वर दिसणाऱ्या खोटेपणास हातीं धरल्यावांचून अंतस्थ खरेपणा जवळ पोंच होत नाहीं. रुपया

हातांत घेतल्यानंतर खोटा आहे असें समजलें. याचप्रमाणें **मिथ्याफलरूप–सृष्टिवृक्षाचें वासना–रूप–मिथ्याबीज** ज्या जीवरूप भूमींत पेरलें जाऊन तिच्यांतील **आनंदामृत**–रसाच्या आर्द्रतेनें–मिथ्या बीज फलांतरवर्ती–**सृष्टिवृक्षास** अविचारकालपर्यंत असें जबरदस्त अस्तित्व आलें आहे कीं, सदैव असणारी आत्मभूमि वृक्षमय करून झांकून टाकली, आणि तिच्याच आश्रयानें तिचें अस्तित्व आपल्या अंगीं आणून अनादि अनंतत्व कायम करून घेतलें. या आत्मभूमींत असलेला अमृतद्रव आपल्या अंगीं आकर्षण करून घेऊन, त्याचें यथार्थ आनंदरूप दूषित करून टाकलें, आणि साखर विषांत मिळविल्याप्रमाणें अखिल विषय आनंदरूप दाखवून विचारशीलांना वरचेवर अडकावून टाकलें. मग तो भूमिशोधनापर्यंत जातो कशाला!! वासनाबीज उपटतो कशाला!! आणि सत्य काय आहे हें त्याला सांपडतें कशाला!! आपल्या **सच्चिदानंदात्मक** मूळ भूमिकेला विसरल्यामुळें आपणही कल्पनावेष्टनांत गुरफटून जाऊन मिथ्या झाला. मग हातीं घेणार तेंही मिथ्या, आणि सार काढणार तेंही मिथ्याच झालें पाहिजे. चाळणींत धारोष्ण दुग्ध काढून तें नित्य प्राशन करून पुष्टता आली किंवा नाहीं हें पहाणें जितकें शहाणपणाचें आहे तितकेंच सृष्ट पदार्थांचा शोध करून करून आम्हीं सत्य शोधून काढूं हें म्हणणें होय. आधुनिक विद्वान् लोक असल्या प्रकारचे शोध काढण्यास पुढें सरसावत आहेत ही गोष्ट खरोखर मोठी भूषणार्ह आहे; परंतु त्यांनीं शोध काय काढला, तर ह्मणें

"मनुष्यप्राणी हा मूळचा मासा होता, मग उत्क्रांति होत होत माकड झाला आणि शेवटीं मनुष्य झाला ! !" शिव ! शिव ! असल्या ह्या गहन विचारशक्तीला काय ही भलतीच दिशा लागली आहे ! हिचा शेवट कोणत्या थडीस जाईल हें कांहीं कळत नाहीं ! सृष्ट 'पदार्थ' शोधनार्थच जर हे त्यांचे प्रचंड प्रयत्न असतील, तर ते फार स्तुत्य आहेत, असें मीं वर कबूल केलेंच आहे, परंतु, जर **सत्य**शोधनार्थच ते असतील तर मात्र त्यांची दिशा फारच चुकली आहे, असें मी आपलें **ठाम**मत देतों. अनंतकालपर्यंत अशाच दिशेनें ते जातील तर सृष्टीच्या एका कोंपऱ्यांतील केर देखील झाडला गेला नाहीं असें त्यांना खास वाटल्यावांचून कधींच रहाणार नाहीं; आणि याच हेतूनें साक्षात् सर्वज्ञ **श्रुती**नें सृष्टिशोधन करून शेवटीं थकून **नेति नेति** म्हणून माघार घेऊन मूळ भूमीशोधनाची दिशा धरली, तेव्हांच **सच्चिदानंदघन हें मूल पद** सांपडलें. आणि तिनें ( श्रुतीनें ) जीवांच्या अविचार कालांत आलेल्या भ्रमनिवृत्त्यर्थ, सत्य व मिथ्या असे दोन भेद कल्पून, आपण तटस्थरूपता आपल्याकडे घेऊन, उपदेशास आरंभ केला.

या वरील गोष्टीचें विशेष स्पष्टीकरण करण्याकरितां आपण एक अगदीं व्यवहारांतलें उदाहरण घेऊं. पहा, वादी, प्रतिवादी आणि न्यायाधीश हे तिघेही मनुष्यरूपानें एकाच जातीचे आहेत; परंतु आपापल्या कृतीनें तिघेही भिन्न होऊन वेगवेगळीं तीन नांवें त्यांनीं धारण करून घेतलीं. असे तीन पक्ष होतांच तिघांना-

ही आपापले पक्षाचा अभिमान धरणें भाग आला. अभिमान चढतांच कृतीस बळकटी आली, व ती तशीच पुढें वाढूं लागली; मग तूं खोटा, मी खरा आणि हा न्यायकर्ता असे बळेंच भेद कल्पून आह्मीं मनुष्यरूप एकच आहोंत, अशी जी मूळची कल्पना तिचा विसर पडल्यामुळें खऱ्या स्वरूपांत भ्रांति आली. पण त्यांना हें कळत नाहीं कीं, भेद केला कृतीनें, ह्मणून तो कृतीचा कृतींतच राहूं द्यावा. हा भेद स्वरूपापर्यंत आणल्यास नाशकारक होतो. दोन वकील दोन पक्ष उचलून कसे सडकून भांडत असतात ह्मणून त्यांच्या स्नेहांत अंतर पडतें कीं काय? नाहीं. कारण त्यांनीं कृतीला हातीं धरलें आहे, अभिमान धरला नाहीं, ह्मणून ते दोघेही एकच आहेत. तटस्थाला ( न्यायाधीशाला ) तर अभिमान कोणत्याच पक्षाचा नाहीं. अर्थात दोघे पक्षकार त्यक्ताभिमान आणि हा निरभिमान झाल्यास तिघेही एकच रूप होतील. आतां निरभिमान जो आहे तो तर स्वतः क्रियारहितच आहे, पण या दोघांपैकीं एकानें जरा खोटी कृति केली कीं, तिघांवरही भेदाचें लचांड आलेंच. खोट्यानें चळवळ केली कीं, त्याचा विरोधी खरा पुढें आलाच. असे दोन पक्ष झाले कीं, तिसरा बिचारा तटस्थ विनाकारण ओढला जातो. तो कां? तर ह्मणे आमचा न्याय करा ह्मणून. अरे पण तुह्मी अगोदर भांडतां कशाला आणि विनाकारण तिऱ्हाईताला उपद्रव देतां कशाला? इतक्यावरही दोघांकरितां तिसऱ्या तटस्थास अनिच्छित यावें लागतें; आणि यथार्थ न्याय करून स्वतःस दोन्ही पक्षांपासून अलिप्त

रहावें लागतें. अशा लक्षणांनीं युक्त जो असेल तोच न्यायाधीश; आणि तो सांगेल तोच न्याय. अशा न्यायांत अपील करण्याची मुळींच सवड नसते. ज्या न्यायकोर्टांत अपिलाची सवड सांपडते तें न्यायकोर्टच नव्हें, तर लबाडीच्या शिक्षणाची शाळा आहे असेंच ह्मणावें लागतें. लबाड पुढें खरा ठरला म्हणजे खऱ्यासही आपलें खरेपण राखण्याकरितां कांहीं तरी लबाडीच करावी लागते. यापासून परिणाम काय झाला, तर खरें खोटें मिळून खोटेंच झालें, आणि न्यायाधीश जे आहेत ते अन्यायाधीश बनले. वः! काय लबाडीचा बाजार तयार झाला हो! आतां या बाजारांत तटस्थ लक्षण ठार बुडालें ना? पण असें कोर्ट ईश्वराचें नसून तें तटस्थलक्षणी आहे; म्हणूनच ही सर्व सृष्टि कशी नियमितपणें चालली आहे. असो. आतां दोघांनीं तिसरा जो तटस्थलक्षणी यास न्याय करण्याकरितां आणल्यावर दोन्ही पक्षांपासून अलिप्त राहून यथार्थ न्याय देणें हेंच त्याचें कर्तव्य झालें. हें कर्तव्य तो खरेपणानें बजावितो किंवा नाहीं याची अखेर निकाल होईपावेतों वाट पहाणें, आणि तोंपर्यंत खऱ्या अंतःकरणानें त्याजवर विश्वास आणि पूज्यबुद्धि ठेवणें, हेंच या दोघां पक्षकारांचें अवश्य कर्तव्य आहे. खोटा निकाल झाल्यावर हवें तर खुशाल दूषण द्या, पण त्यापूर्वी दोघांनीं उगीच अविश्वासानें धांदल उडविली, धड ऐकलें नाहीं, आणि उगीच बडबड केली, तर साधारण तटस्थ असला तर दोघेही मूर्ख आहेत म्हणून चालता होईल; पण तोच जर सर्वशक्तिमान् न्यायाधीश असला,

तर न्याय होणें तर बाजूलाच राहील, पण उलटें कोर्टा-ची अवज्ञा केल्याबद्दलचा आरोप येऊन शिक्षा होईल, ही मधल्यामध्येंच गचांडी धरली जाईल. यावर कोणी अशी शंका घेतील कीं, ज्याअर्थी दोन पक्ष झाले, त्या-अर्थी एक लबाड आहेच, तो न्यायाधीशाला दोष देई-लच; मग त्यानें आपल्यासारखा न्याय मिळण्याकरितां अपीलकोर्टांत कां न जावें ? या शंकेचें समाधान असें आहे कीं, ज्या न्यायाधीशापुढें खोटा आपलें खोटेपण कायम करून गेला, तो न्यायाधीशच नव्हे, तें आप-लें केवळ न्यायदेवतेचें सोंग न्यायासनावर बसविलें आहे असेंच म्हटलें पाहिजे. खोट्याचें खोटेपण त्या-च्या अंगीं लावून त्याला कुंठित केलें पाहिजे आणि ही माझी चूक झाली असेंच त्याच्याकडून कबूल करवून तो आपलें खोटेपण टाकून खरेपणास आनंदानें स्वीकारून न्यायाधीशाचे आभार मानील, तरच तो न्यायाधीश असें झालें ह्मणजे अर्थात् दोन्ही पक्षकार खरे होऊन तटस्थ लक्षणांत येतील, मग तीन भेद नाहींसे होऊन तिघेही एकच रूप झाले असेंच म्हटलें पाहिजे. असो. या उ-दाहरणावरून माझ्या वाचकांपैकीं जे न्यायाधिकारा-वर असतील त्यांनीं राग मानूं नये अशी माझी त्यांना सविनय प्रार्थना आहे. कारण अशा प्रकारचा खरा न्याय करणें हें केवळ सर्वज्ञ जो ईश्वर त्याच्याकडेसच आहे. अल्पज्ञ मनुष्य प्राणी असा न्याय काय करूं शक-णार आहे? तथापि आपापल्या बुद्धिबलानुरूप सर्वच न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांनीं आपल्या न्या-याची कसोटी स्वतःच्या खऱ्या अंतःकरणावर आणि

लोक-प्रियतेवर ताडून पहात जावी. न्यायाधीशाच्या हातून खरा न्याय झाला ह्मणजे दोघेही पक्षकार खुष होऊन जाण्याचा प्रसंग येतो, तेव्हां " न्यायाधीशानें केवळ ईश्वरी न्याय केला " असेच धन्यवाद त्यांच्या मुखांतून ऐकूं येतील. असो. मी प्रकृत विषय सोडून फार लांब तर गेलों नाहींना ? आणि असें असेल तर माझे सूज्ञ वाचक मला क्षमा करतील अशी आशा आहे. या वरील उदाहरणांतून आपापल्या इच्छेनुरूप सार असेल तेवढेंच ते घेतील, तरी माझें काम झालें असें मी समजेन. आतां आपण आपल्या मूळ विषयाकडे वळूं.

घटकाभर असा विचार करा कीं, एक चार हातांचा आणि ज्याचा नीलवर्ण असून रूपही फारच मनोहर आहे असा नवा मनुष्य आपल्या गांवांत आला आहे अशी वदंता उठली आहे. ही वार्ता ज्यांच्याज्यांच्या ह्मणून कानांवर गेली, त्यांना अशी जिज्ञासा उत्पन्न झाली कीं, हें काय अद्भुत प्रकरण आपल्या गांवांत आलें आहे बरें ? कांहीं असो, एकवार आपल्याला तें अवश्य पाहिलेंच पाहिजे. इतक्यांत एक विश्वासूक मनुष्य येऊन सांगतो कीं, होय खरेंच, मीही त्याला पाहून आलों, लोकोत्तर चमत्कार आहे खरा ! मीं त्याला विचारपूस देखील केली, पण त्याची भाषा अवघड असल्यामुळें त्याचें बोलणें उमजत नाहीं. तथापि अटकळीनें तो काय ह्मणाला तें मी समजलों. तो श्वेतद्वीपचा राहणारा आहे. इतक्यांत एक जवळ बसलेला गृहस्थ ह्मणतो.—अहो, तुह्मी काय याच्या नादीं लागतां ? सृष्टि-नियमाविरुद्ध कधीं कांहीं होतें काय? ही नुसती

गप्प आहे. यावर तो पाहून आलेला गृहस्थ ह्मणतो, अहो, मी तुह्माला तेथपर्यंत नेतों, तुह्मी माझ्याबरोबर चला तर खरें! मग खरें खोटें काय असेल तें म्हणा, उगीच घरांतले घरांत शास्त्रार्थ करीत काय बसलां आहांत? असें म्हणून तिघेही बरोबर जाऊन पाहतात तों खरोखरच तो शामसुंदर चतुर्भुजरूप दृष्टीस पडला. मग काय खोट्याचा तर भ्रम गेलाच, पण खऱ्या जिज्ञासूला जो खोट्यानें भ्रम घातला होता तोही नाहींसा झाला. पाहून आलेला अथवा सदैव पहाणारा तर निर्भ्रमच आहे. त्याला एकदम खोटें म्हणण्याचें धाडस करणें किती मूर्खपणाचें काम आहे बरें? तद्वत् परमात्म्याच्या सदैव संनिध असणारी, त्याचें सदैव ध्यान व स्तवन करणारी, त्याचें यथार्थ स्वरूप जाणणारी, जिच्याहून अधिक परमात्म्याचें निकट सांनिध्य आणखी दुसऱ्या कोणाचेंच नाहीं, आणि जी साक्षात् ईश्वराचीच वाणी, अशी जी सर्वज्ञ श्रुतिमाता ती निःपक्षपातानें आणि तटस्थरूपानें बोध करीत आहे. व्यवहारांत तरी नेहमीं आपण पहातों कीं, भाषणाचें वजन आणि खरेपणा हीं बोलणाराच्या योग्यतेवर अवलंबून असतात. या मानानें पाहूं गेलें असतां ईश्वराच्या एका परमाणूशीं तुळणारा या साऱ्या त्रिभुवनांत तरी दुसरा कोणी सांपडणार आहे काय? छेः कधींच आणि कोणीच सांपडणार नाहीं! मग प्रत्यक्ष त्याचेंच भाषण जी श्रुति हिची योग्यता कशी असली पाहिजे याची नुसती कल्पना तरी कोणाच्यानें करवेल काय? अशा अगाध गंभीर भाषणांत अन्यथा लेश तरी कधीं

असूं शकेल काय ? मुळींच नाहीं. सार्वभौम राजा एखाद्या भिकाऱ्याच्या चिंधीसाठीं खोटें बोलला, हें स्वप्नांत तरी कोणाला खरें वाटेल काय ? पृथ्वीच्या मानाला जसा रजःकण त्यापेक्षांही ईश्वराच्या मानाला हा जीव अति क्षुल्लक असून, यानें भ्रमांत पडल्यापासून त्याला ( ईश्वराला ) कांहीं तरी लाभ होण्याचा संभव आहे काय ? मुळींच नाहीं; त्याच्या ठिकाणीं जर कोणताच हेतु नाहीं, तर त्याच्या तटस्थ लक्षण आणि स्वतः प्रमाण अशा साक्षात् वेदवाणींत अनृत अथवा **भ्रांत** असा एक शब्द सुद्धां येऊं शकणार नाहीं. इतक्यावरही जर कोणी स्वतःच्या पूर्ण अज्ञानानें श्रुतीचें खरें रहस्य न जाणतां, केवळ मूढपणानें व कुत्सित बुद्धीनें असें ह्मणेल कीं, ही खास त्या परमेश्वराच्याच मुखांतली वाणी कशावरून समजावी? तर याचें असें समाधान आहे कीं, जसा तटस्थ लक्षण ईश्वर अहेतुक आहे, तशीच ही त्याची वाणीही अहेतुक बोध करणारी आहे. ज्यांस फलेच्छा झाली, त्यांना ती कर्मपर बोध **'अथातो धर्मजिज्ञासा'** म्हणून करूं लागली; आणि ज्यांस ज्ञानेच्छा झाली त्यांना **'अथातो ब्रह्मजिज्ञासा'** असा बोध करण्यास तिनें आरंभ केला; पण दोघांचेंही तात्पर्य निवृत्तिपरच आहे. आतां जेव्हां त्या परमेश्वरानें ही वाणी उच्चारली, तेव्हां तुह्मीं अव्यक्तदशेनें झोंपा ताणीत होतां. तुमच्यांतील आद्यश्रोता जो ब्रह्मदेव त्यानें ती ऐकली; आणि पुढें येणारांस मीं ईश्वरमुखानें असें ऐकलें आहे असें म्हणून जें सांगितलें, त्यालाच **श्रुति** असें नांव ठेवलें गेलें; आणि पुढें तुम्ही लोकांतरांत दे-

हांतरें करीत फिराल आणि त्रासाल, तेव्हां या मार्गानें आल्यास सुखी व्हाल म्हणून सदैव शब्दरूपानें आणि अक्षर म्ह० ग्रंथरूपानें प्रवासदर्पणाप्रमाणें मोक्षमार्ग दाखवीत बसली आहे. जगाचें प्रवासदर्पण पुस्तक हातीं घेऊन प्रवासाला निघाल्यावर मग कोठेंही जाण्याची माहिती दुसऱ्यास विचारण्याची गरजच राहत नाहीं. याचप्रमाणें श्रुतीनें या संसारयात्रेंत जेथें जेथें जसजशीं स्थळें दाखविलीं आहेत, आणि जसजसे संकेत करून ठेविले आहेत, त्या त्या संकेतांप्रमाणें आणि दाखविलेल्या स्थलमार्गानुरोधानें परत याल तर अगदीं अपरिश्रमानें आपल्या **सच्चिदानंदघन** मूलपदावर दाखल व्हाल. याठिकाणीं येऊन पोहोंचतांच तुमची संसारयात्रा संपली असेंच तुम्हांला वाटून मग तुमचें तुम्हींच म्हणूं लागाल कीं, ही खरोखर साक्षात् ईश्वरीवाणी अगाध आणि गंभीर आहे. अदृश्य असलेल्या मनुष्यास प्रत्यक्ष पहावयाचें असेल तेव्हां तो जें हांकेचें उत्तर देतो, त्या अनुरोधानें शब्द ओलांडित गेल्यावरच तो साक्षात् दिसतो. तुम्हीं पोंचेपर्यंत तो सारखा ओ, ओ, ओ–असें म्हणून ओरडत नाहीं. कदाचित् तुम्ही वाटच विसरलांत तर पुन्हां त्याला विचारतां कीं, काहो कोठें अहांत? मग ज्याच्याकडे जावयाचें असेल तो सांगतो कीं, अमुक वाटेनें या. तसेंच परगांवीं असलेल्या मित्रास भेटण्याकरितां त्याच्या पत्रांत लिहून आलेल्या पत्त्यावर गेलें ह्मणजे त्याची भेट होते. ही गोष्ट प्रचारांतलीच आहे, तेव्हां वाचकांच्या सहज ध्यानांत आली पाहिजे. या पुस्तकाच्या आरं-

मींच जीवनराव माधवरावाचा शब्द ओलांडून वर गेला तेव्हांच, " हा शब्द कोणाचा आहे " असा जो त्याला भ्रम पडला होता तो निवृत्त झाला; आणि दोघांच्या आनंदाचें ऐक्य झालें. अर्थात भ्रमनिवृत्ति करणारें श्रुतिवांचून अन्य कोणीच नाहीं. जावत्कालपर्यंत हा जीव भ्रमांत आहे तावत्कालपर्यंत जरी हें जग वासनामूल अगदीं मिथ्या आहे, तरी यास मिथ्या ह्मणतां येत नाहीं. कारण हा शोधक जो आहे, तोच मिथ्यारूप धारण करून बसला आहे. डोळ्यांस हिरव्या रंगाचें उपनेत्र लावलें ह्मणजे समोर येणारे यच्चयावत् पदार्थ हिरवेच दिसूं लागतात. पण ज्याच्या डोळ्यांस असें उपनेत्र लागलेलें नसेल, तो पांढरें असेल तर पांढरें, काळें असेल तर काळें, हिरवें असेल तर हिरवें, असें यथार्थरूप असेल तेंच पहातो. यासंबंधानें त्या दोघांचीं आपसांत भाषणें होऊन एकमेकांच्या अनुभवांत फरक वाटला कीं शंका आलीच. पण ती कोणाला ? ज्यानें उपनेत्र लावलें असेल त्याला. आतां जे मुळींच अज्ञाननिबिडांधकारांत निमग्न होऊन राहिले आहेत, व जे त्यांतून आपलें डोकेंसुद्धां वर काढित नाहींत, अशांना सत्य काय आणि मिथ्या काय याची कल्पना देखील नाहीं; व तशी कल्पना करण्याची त्यांना जरूरही वाटत नाहीं. पण जे गांवांतील गप्पा ऐकून साशंक होतील, त्यांना तर ही जिज्ञासा उत्पन्न झालीच पाहिजे कीं, अरे ! आपण ज्यांस सत्य मानतों, त्यांस दुसरा मिथ्या म्हणतो. असें त्यानें ह्मटल्याबरोबर दुसरा म्हणतो अहो हें सत्यच आहे,

तुह्मी उगीच भ्रमांत कां पडतां? पहिला म्हणतो, छे हो, यांत कांहीं तरी घोटाळा आहे. झाले दोन पक्ष! आलें आतां तिसऱ्याचें काम! तेव्हां तटस्थ न्यायमूर्ति साक्षात् **परमात्मा** वेदवाणीनें बोध करण्यास आरंभ करूं लागला. पण भाषा दुर्बोध असल्यामुळें ती समजणार नाहीं, ह्मणून तिच्यांतील गुह्यार्थ ज्ञाता आणि शामसुंदर मूर्तीच्या अवलोकनानें ज्याचा भ्रम गेला आहे, अशा सद्गुरूच्या चरणाश्रयानें त्याच्या मागोमाग जा, ह्मणजे भाषा सुबोध होऊन आपल्या मूलपदावर जाऊन पोंचाल, याशिवाय अन्य मार्गच नाहीं. वृथा श्रम करून या अमोल आयुष्याचा व्यर्थ व्यय करणें चांगलें नाहीं, असें मला वाटतें. असो.

प्रिय सूज्ञ वाचकहो, तात्पर्य काय कीं **प्रकृति-पुरुष-नामरूपात्मक सृष्टीचें** बीज कल्पनात्मक आहे. (कल्पना, वासना, संकल्प, आशा, इच्छा, मनोरथ व हेतु इ० सर्व शब्द एकाच अर्थाचे आहेत, भिन्न नाहींत) ह्मणून हें जग "मिथ्या, मिथ्या" अशी चोहींकडून ओरड आहे, पण कोणालाही विचारा कीं, तुह्मीं या जगाला जें मिथ्या ह्मणतां आहांत तें काय ह्मणून? या प्रश्नाचीं उत्तरें अनेक प्रकारचीं ऐकावयाला मिळतील! कोणी ह्मणतील आह्मीं कथा पुराणें ऐकतों, त्यांत हरदासबावा, पुराणिक वगैरे मंडळी हें जग मिथ्या आहे असें सांगतात, ह्मणून आह्मीं जग मिथ्या आहे असें ह्मणतों. येथें सांगणारांची व ऐकणारांची किंमत बहुधा एकसारखीच असते. त्यांनीं सांगावें व यांनीं ऐकावें एवढेंच काय तें, या पलीकडे जास्त कां-

हींच नाहीं. लांब कशाला, माझ्याच या लेखाची मला आतां शंका वाटूं लागली आहे कीं, कदाचित् अर्वाचीन वाचकांपैकीं कित्येक या माझ्या लेखाला कथापुराणाच्याच मालिकेंत गोंवून देतील कीं काय कोण जाणे? असो. कोणी ह्मणतात, खरेंच हें जग नाशिवंत आहे, कारण आज जें पहावें तें उद्यां दिसत नाहीं! क्षीण होतें, अथवा अजीबात नष्ट होतें. कोणी ह्मणतो, मी आजपावेतों या जगाला सत्य मानीत होतों. पण नुकतीच माझी बायको मेली! व तिच्या मागून लागलाच थोड्या दिवसांनीं माझा मुलगाही मेला! तेव्हांपासून या जगाविषयीं माझी बिलकुल अश्रद्धा झाली आहे. कोणी ह्मणतात, अहो, सर्व लोक या जगाला मिथ्या ह्मणतात, ह्मणून आह्मीही ह्मणतों. खरें काय असेल तें असो. कोणी सखीचे लाल असेंही म्हणण्यास चुकत नाहींत कीं, अहो यांत काय अर्थ आहे? साऱ्या गप्पा आहेत. नुसत्या ऐकत जावें म्हणजे झालें. पुराणीक झाले, हरिदास झाले, या भोंदू लोकांनीं उदरभरणार्थ कांहीं तरी गोष्टी रचून ठेविल्या आहेत, यांत जीव काय? हवी तशी चैन भोगावयास मिळते, खूप मजा मारावयास सांपडते, सुख मिळतें, रोज शाल्योदन झोडावयास सांपडतें, त्या योगानें तृप्ति होऊन पुष्टता येते; इतक्या गोष्टी जगांत मिळत असून, त्याला मिथ्या कसें म्हणावें? साधुसंत उगीच जग मिथ्या मिथ्या म्हणून ओरडत फिरतात! हें जग जर तुम्हांला खास मिथ्या आहे असेंच समजलें आहे, तर असल्या खोट्या जगांत राहतां तरी कशाला? आणि आमच्याकडे भिक्षा मा-

गण्यास तरी कां येता ? आतां अंगाला एखादें जळत लांकूड लावूंद्या ह्मणजे दहा हात लांब पळून ओरडत फिरतील. उगीच कांहीं तरी थोतांड रचून बिचाऱ्या भोळ्या भाविक लोकांना मुंडण्याच्या या साऱ्या युक्त्या आहेत. कोणी म्हणतात, आम्हांला तर बोवा खरें खोटें कांहींच समजत नाहीं,व आम्ही असल्या भानगडींतही पडत नाहीं. परमेश्वरानें ज्या स्थितींत आम्हाला ठेवलें आहे, त्याच स्थितींत आनंदानें कालक्रमण करून एकदाचें मेलें म्हणजे सुटलें! तिकडे कांहीं कां असेना, आम्हाला काय करावयाचें आहे. जे अगदींच निकृष्ट ग्राम्य जीव आहेत त्यांना सत्य आणि मिथ्या या शब्दांमधील भेद समजण्याची देखील मारामार. ज्या स्थळीं ते राहणार व जेवढें दृष्टीनें पाहणार तेवढेंच काय तें त्यांचें जग. तेंही 'जग' या शब्दानें नव्हे, तर कांहीं तरी आहे इतकेंच. असो. एवंच काय कीं, जगाच्या दोन्ही टोंकांपर्यंत अशीं अनेक चित्रविचित्र कारणें व भाषणें ऐकूं येतील, पण कमजास्त रूपानें बहुतकरून साऱ्यांच्या किंमतीचा भाव एकच!! अशानें कां सत्यमिथ्यत्वाचा निर्णय होणार आहे ? मुळींच नाहीं. पण यांत एक मात्र मोठा फायदा होतो, तो कोणता, तर या जगांत ईश्वराचे कृपापात्र होणारे जे कोणी खरे मुमुक्षु असतात ते या विचित्र व्यवहारानें अगदीं संशयांत पडून त्रस्त होतात. आणि खरें काय आहे हें धुंडून काढण्याकरितां बिचारे भटकत फिरतात. लवकर पत्ता तर लागत नाहींच, पण परत ठिकाणावर जाण्याचा सरळ मार्ग देखील त्यांना सांपडत नाहीं. गरीब बिचारे गांगरून जाऊन चहूंकडे सैरावैरा धांवत

फिरून करुणास्वरानें हांका मारीत असतात. अशी पूर्ण दीनावस्था झाली ह्मणजे मग तो दीनदयाल, सर्वांतर्यामी **परमात्मा** दूर का आहे? अशा त्रिविध तापानें पोळलेल्या मुमुक्षूनें दीनवाणीनें हांक मारल्याबरोबर **ओ** ह्मणून ओठ मिटतांच **मकार** उत्पन्न झाला. आणि दोन्ही मिळून ॐ हें प्रत्युत्तर आलें. यांतूनच **श्रुति** व्यक्त झाली, यावरून हांकेचें उत्तर देणारा अमुक ठिकाणीं उच्च शिखरावर आहे असा बोध झाला; त्या शिखरावर जाण्याचे अनेक मार्ग आहेत. कित्येक फारच दुर्धर आहेत, कित्येक साधारण कठिण आहेत, कित्येक फेर खाऊन जाण्याचे आहेत, अशा अडचणींत जाणारा सांपडून उतावळा होऊन घसरतो, आणि हातपाय मोडून खालीं पडतो. पण जाणारा वर जाण्याविषयीं अत्यंत उतावीळ व उत्कंठित झाला आहे, आणि हा आतां भलत्याच दिशेनें जात आहे असें दिसतांच ठिकठिकाणीं सुलभ मार्ग दाखविणारा परमात्माच सद्गुरुरूपानें विराजमान आहे. आणि हा जाणाराही उतावळा ह्मणजे श्रद्धालू होतांच मग काय वेळ! **गुरूनें** जरा बोटाचा संकेत दाखवितांच हा जो उडाला तो आपला शिखरावर! आतां खालीं येणें न येणें हें त्याच्या इच्छेवर अवलंबून आहे. खालीं आलाच तर मार्गदर्शक होतो, आणि वाट विसरणारांना केवळ आधारभूत होऊन रहातो. परमात्मा आणि श्रुति यांचें यथार्थ स्वरूप जाणणारा **सद्गुरु** अति दयाळू आहे. त्याला शरण जातांच तो जशी ज्याची इच्छा असेल ह्मणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार

पुरुषार्थांपैकीं ज्याची त्याला इच्छा असेल ती परिपूर्ण करून निजशिखरावर नेऊन पोंचवितो.

वाचकहो, आतां असें पहा कीं, ज्याला जो जिन्नस हवा असतो, तो त्याला ज्या दुकानांत मिळेल तेथें तो जाऊन आणतोच; पण दुकानदाराकडून माल नमुन्या-करितां हातांत घेऊन दलाल ग्राहकांच्या जवळ येऊन अमुक जिन्नस आपल्याला पाहिजे का ह्मणून विचार-तो. ग्राहकास पसंत वाटल्यास घेतो, पसंत नसल्यास नको ह्मणतो. यांत अमुक उणीव आहे, तेवढी पुरी कर ह्मणजे घेऊं, असेंही कोणी सांगतो. कोणी ह्मणतो, माल तर पसंत आहे खरा, परंतु काय करावें जवळ पुरेसे पैसे नाहींत. अशा लोकांना तो दलाल, मी आ-पल्यास हा माल किफायतीनें देईन असेंही सांगतो. कोणी ह्मणतो, बाबा, हा जिन्नस तर माझ्यापाशीं आहे; मीच ग्राहकांची वाट पहात आहें. कोणी ह्मणतो, हा माल आमच्या पसंत नाहीं; आह्माला तो नको. कोणी कारणपरत्वें व्यग्रान्तःकरणानें उगीच त्याच्या अंगावर चवताळून जाऊन शिव्या देत सुटतो. इतकेही प्रकार पतकरून तो दलाल आपलें सवदा दाखविण्याचें काम सोडीत नाहीं!! पण आपल्या ऐपतीच्या बाहेरचा जिन्नस दुकानदाराच्या आज्ञेवांचून कोणास फुकट मात्र देत नाहीं. तसा मीं हा **अव्यक्त बोधरूपी** जिनसेचा नमुना **सद्गुरूच्या पेढींतून** आणून आपल्यासारख्या सूज्ञ ग्राहकांपुढें मांडून ठेवला आहे. आतां आपण मात्र वर निर्दिष्ट केलेल्या ग्राहकवर्गांपैकीं वाटेल त्या वर्गांत ब-सून जशी मागणी कराल तसा जिन्नस माझ्या शक्त्य-

नुरूप मी आपल्यास पावता करीन, शक्तिबाहेर असल्यास साफ नाहीं ह्मणून सांगेन. कांहींतरी खोटेंनाटें दाखवून ग्राहकांस फसविणार नाहीं. माझ्या स्वतःजवळ हा जिन्नस नसून सद्गुरूच्या पेढींत सांठवून ठेवलेला आहे. मी नुसता दलाल आहें. दलाल आणि वकील हे कोणाचे बांधलेले नसून जसे स्वतंत्र असतात आणि आपल्या इच्छेनुरूप वाटेल तोंपर्यंत काम करितात, याच नियमानुरोधानें मीं या विषयाच्या ग्रंथास आरंभ केला आहे. त्यापैकीं हें प्रथम प्रकरण संपवून माझ्या प्रिय सूज्ञ वाचकांची मी रजा घेतों.

ॐ तत्सदिति.

# सूचना.

या पुस्तकांतील विषयासंबंधानें पत्रव्यवहार करणें असल्यास खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.—

**श्री० रा० रा० रामराव कृष्ण जठार,**
मुमताजु दौलाबहादर.
छत्रीबाजार लष्कर,
**ग्वालियर.**


हीं पुस्तकें खालीं लिहिलेल्या पत्त्यांवर पत्रें पाठविलीं असतां व्ह्याल्युपेएबलनें पाठविण्यांत येतील.

**रा० रा० बळवंतराव कमळाकर,**
नाझर अदालत.
प्रांत माळवा,
**उज्जन.**

**रा० रा० गणपतराव अमृत कविटकर,**
छत्रीबाजार लष्कर,
**ग्वालियर.**

**रा० रा० विष्णु गोपाळ भोपटकर,**
मंगळागौरी घाट, जठाराचें मंदिर,
**बनारस सिटी.**

## चित्रपट.




बिंदुरूप परमात्मा, रेषारूप माया, आणि अक्षररूप सृष्टि, असा क्रम असल्यानें, ‘ परमात्मा ’ आणि ‘ माया ’ हे वाच्य व, ॐ हें वाचक, यांचा परस्पर अभेद झाला. यांत परमात्मा अक्रिय, अविकारी, आणि अलिप्त असून गुणविकृति इत्यादि भेद मायेनें केले आहेत. त्याचें प्रत्यक्ष प्रमाण पुढें दिलेल्या आकृत्यांवरून ध्यानांत येईल. रेषारूप मायेपासून, अक्षररूप जडचैतन्यात्मक सृष्टि निर्माण होऊन “ अत्यतिष्ठद्दशांगुलं ” या श्रुतिप्रमाणानुरूप, बिंदुरूप परमात्मा, अखिल जडचैतन्यात्मक सृष्ट पदार्थांत ह्मणजे जारज, अंडज, स्वेदज, उद्भिज, चतुर्विध प्राणी आणि संख्या, अक्षर इत्यादिकांत ओतप्रोतभावानें भरून पुन्हां बिंदुरूप उरलाच आहे; ही गोष्ट पुढें दिलेल्या आकृत्यांवरून स्पष्ट कळून येईल. यांपैकीं कोणत्याही आकृतींत आद्य-


बिंदूचा उपयोग करण्याची आवश्यकता पडत नाहीं. ह्मणून कविश्रेष्ठ मोरोपंतांनीं म्हटलें आहे कीं,

॥ भू, जल, तेज, समीर, ख,
रवि, शशि, काष्ठादिकीं असे भरला ॥
॥ स्थिर, चर, व्यापुनि अवघा, जो
परमात्मा दशांगुलें उरला ॥ १ ॥


तो, 


.........हा परमात्मा..................

ॐ यासून संख्या कशी निघाली ती पहा.




ॐ च्या पांच तुकड्यांतून निघालेली संख्या.






## ॐ च्या तीनच तुकड्यांतून निघालेली संख्या


या संख्ये वरून वर्णमालेच्या पूर्वी संख्या निर्माण झाली असें सिध्द होतें कारण वर्ण-मालेला ॐ च्या ७ तुकड्यांची अवश्यकता लागते– आणि ही संख्या फक्त ३ च तुकड्यांनीं होते.




वरील दोन मात्रांतून निघालेली संख्या.





बिंदूच्या साह्यावांचून केवळ दोनच मात्रां-पासून झालेली संख्या.



ॐ यासून वर्णमाला कशी निर्माण जहाली ती पहा.







वर्णमाला.

ॐ पासून चारी खाणी म्ह० जारज, अंड-ज, स्वेदज आणि उद्भिज, कशा निर्माण जा-ह्ल्या त्या पहा:-





*: मनुष्य: पशु. पक्षी.







*: मनुष्याची शरीरावयवरचना यथायोग्य तत्वानु-रूप असल्यानें हाचजीव सर्वजीवांत श्रेष्ठ झाला; व मोक्षाचाही अधिकारी हाचहोतो-


सर्प.
वृश्चिक.
ढेंकूण अथवा ऊं.
अंडज
स्वेदज
स्वेदज
वृक्ष
कांसव अथवा मगर.
मत्स्य
अंडज
पुच्छरहित कांसव
पुच्छसहित मगर
अंडज
उद्भिज

॥ श्री ॥

## सुज्ञ वाचकांस अगत्याची सूचना.

या अव्यक्तबोध नामक ग्रंथाचे धर्तीवर सरळ भाषेत मोठा ग्रंथ, परमात्मा, माया, ईश्वर, सृष्टि, जीव आणि जीवाचें कर्तव्य असे साहा प्रकरणांचा लिहिण्यास आरंभ केला आहे. त्यांतील ब्रह्म, माया आणि ईश्वर अशीं तीन प्रकरणें लिहिलीं गेलीं आहेत. बाकी प्रकरणें तयार होण्यास निदान आणखी एक वर्ष लागेल. ज्या सुज्ञांस त्याची लालसा वाटेल त्यांनीं आपलीं नांवें आणि पत्ता कळविल्यास त्यांस पुस्तकें तयार होतांच व्ही. पी. नें पावतीं केलीं जातील. ज्यांस या पुस्तकाचें चांगलें ज्ञान झालें असेल त्यांस त्या ग्रंथाचें महत्त्व सहज समजणार आहे. मला जास्त लिहिण्याची जरूर नाहीं.

रामराव कृष्ण जटार.

लष्कर ग्वालेर, छत्रीबाजार.